म. ग्रं. सं. ठाणे.
विषय भू-पृष्ठ
सं. क्र. ७९८

REFBK-00

# ' दोन ' युरोप

अरुण खोरे

REFBK-0026175

उत्कर्ष प्रकाशन, पुणे.

‘दोन’ युरोप
(‘TWO’ EUROPE)

© सौ. शोभा अरुण खोरे

प्रकाशक :
सौ. सविता जोशी
उत्कर्ष प्रकाशन,
रेणुका अपार्टमेंटस्,
कमला नेहरू पार्क जवळ,
पुणे ४११००४

प्रथमावृत्ती :
मार्च– १९९०

मुखपृष्ठ :
धनंजय सस्तकर

(मुखपृष्ठावरील पूर्व बर्लिनचे
छायाचित्र– अरुण खोरे)

टाईप सेटर्स व मुद्रक :
केतकी प्रोसेस
४२७-अ/२, गुलटेकडी,
पुणे ४११०३७.

आतील रंगीत छायाचित्रे :
सुनील कडूसकर

मलपृष्ठावरील लेखकाचे छायाचित्र :
देवीप्रसाद अय्यंगार, नगर.

किंमत :
२० रुपये.

पत्रकार म्हणून युरोप दौऱ्याची
अपूर्व संधी ज्यांनी दिली
ते सकाळचे कार्यकारी संचालक

**प्रतापराव पवार**

या दौऱ्यावर लिहिण्यासाठी
ज्यांनी मार्गदर्शन केले ते
मराठी पत्रकारितेच्या नव्या पर्वाचे प्रतिनिधी
साप्ताहिक सकाळचे संपादक

**सदा डुम्बरे**

यांना स्नेहादरपूर्वक.

**अरुण खोरे.**

# अनुक्रम


१ – परदेश दौऱ्यापूर्वी आणि नंतर — एक
२ – दुसऱ्या यरोपात — आठ
३ – आता युद्धाचे नावही नको ! — वीस
४ – पर्यावरणाचे अभंग ‘ लॅण्डस्केप ’ — एकतीस
५ – देखणे युरोप — एक्केचाळीस
६ – युरोपची युगंधरा — त्रेपन्न
७ – बर्लिनची भिंत इतिहासजमा होईल ? — त्रेसष्ट
८ – ताजा कलम : ‘ नवा युरोप ’ — पंच्याहत्तर
९ – गोर्बाचेव साहेब सलाम ! — अठ्ठ्याहत्तर

## परदेश दौऱ्यापूर्वी व नंतर

सुमारे अडीच वर्षांपूर्वी युरोपला जाण्याची एक अपूर्व संधी मला मिळाली. पूर्व युरोपातील पोलंड आणि पूर्व जर्मनी, पश्चिम युरोपातील हॉलंड, स्वित्झर्लंड, बेल्जियम, फ्रान्स आणि इंग्लंड या सात देशांना तीन आठवड्यांच्या काळात मी माझ्या पत्रकार मित्रांबरोबर भेट देऊन आलो.

भारतीय श्रमिक पत्रकार महासंघाने अभ्यास–दौरा म्हणून प्रवासाची संधी आम्हाला उपलब्ध करून दिली. पुणे श्रमिक पत्रकार संघाने या दौऱ्यासाठी पुण्यातील पाच जणांची नावे सुचवून आम्हाला प्रोत्साहन दिले. या दोन्ही संघटनांचा मी मनःपूर्वक आभारी आहे.

पूर्व जर्मनीच्या इंटरनॅशनल इन्स्टिटयूट ऑफ जर्नालिझम बर्लिन या संस्थेने आम्हाला आमंत्रण देऊन या दौऱ्याची एक चांगली संधी दिली. या संस्थेतले आमचे वास्तव्य हे इतके घरगुती स्वरूपाचे होते की, त्याचे विस्मरण होणार नाही. या संस्थेचे संचालक डॉ. हान्स ट्रेफकॉर्न, उपसंचालक बर्नड् रेयर आणि आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटनेचे सेक्रेटरी कूर्ट होगेल यांचे मी हार्दिक आभार मानतो. पूर्व जर्मनीसंबंधी लिहिताना पीटर मे या तिथल्या प्राध्यापक मार्गदर्शकाचे नाव आम्ही कोणीही विसरू शकत नाही. पन्नाशीतल्या या प्रौढ युवाने आमचे जर्मनीतील वास्तव्य बहारदार करून सोडले. या सर्व दौऱ्यात तो आमचा जिवलग मित्र झाला. आम्हाला खायला–प्यायला काय हवे–नको ते सारे तो पाहात होता. जाण्याच्या आदल्या दिवशी त्याने बर्लिनमधल्या त्याच्या फ्लॅटवर आम्हा सर्वांना आवर्जून नेले. त्याची दुसरी बायको नुकतीच त्याच्यापासून वेगळी राहात होती. हे शल्य बोचत असतानाही आमच्या आतिथ्यात त्याने अजिबात कसूर केली नाही. सामाजिक–सांस्कृतिक व्यवहारात वैयक्तिक सुखदुःखे बाजूला ठेवून वावरण्याचा वस्तुपाठच त्याने आम्हाला दिला.

जवळपास आठवडाभरचा जर्मनीतला मुक्काम संपवून आम्ही परत निघालो; तेव्हा बर्लिन विमान तळावर पीटर आम्हाला निरोप द्यायला आला. जड

अंतःकरणाने तो प्रत्येकाशी हस्तांदोलन करून आम्हाला प्रेमभराने मिठी मारीत होता. आम्हा सर्वांचेच डोळे पाणावले होते. बर्लिनमधले पीटीआयचे प्रतिनिधी अरिफ नकवी आमच्या स्वागताला, निरोप द्यायला याच आपुलकीने आले होते. बर्लिनच्या आंतरराष्ट्रीय वृत्तविद्या संस्थेतील सर्वांचेच सहकार्य आम्हाला सतत होते.

आमच्या दौऱ्यात पूर्व जर्मनीतील भारताचे राजदूत श्री. दोड्डामणि, सौ. दोड्डामणि, फ्रान्समधील भारताचे राजदूत निवृत्त एअर–चीफ मार्शल आय.एच.लतीफ, त्यांच्या पत्नी बिल्कीस लतीफ यांनीही आम्हा पत्रकारांना आग्रहाने बोलावले, आमच्याशी चर्चा केली. श्री. लतीफ महाराष्ट्राचे राज्यपाल असताना त्यांनी पुण्यात येऊन आवर्जून मराठी शिकण्याचा अभ्यास केला होता. निवृत्त शिक्षणाधिकारी ना.गो. शुक्ला हे त्यांना मराठी शिकवत होते. त्यांच्या भेटीत दोघांनीही आवर्जून श्री. शुक्ला यांना नमस्कार कळवण्यास सांगून त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. फ्रान्समधील त्यांचे निवासस्थान जगद्विख्यात आयफेल टॉवरपासून फार जवळ आहे. अतिशय सुंदर वास्तुशिल्प असेच त्यांच्या प्रासादाचे वर्णन केले पाहिजे. त्या वास्तूत प्रवेश केल्यावर खालच्या दालनातच गणेशाची संगमरवरी मूर्ती पाहून मन प्रसन्न झाले.

लंडनमधल्या भारतीय विद्याभवन केंद्राने आम्हाला अगत्याने त्यांच्या वेस्ट केन्सिंग्टन भागातील प्रमुख कार्यालयात नेले. तेथील कार्यकारी संचालक श्री. माथूर कृष्णमूर्ती आणि श्री. कृष्ण शास्त्री यांनी भारतीय विद्या भवनाच्या कार्याची माहिती दिली. संस्कृत भाषेचा प्रसार व अभ्यास करणाऱ्या एका असोसिएशनचे उद्घाटन आम्ही तेथे होते; त्याच काळात झाले. ब्रिटनचे अनेक नागरिक या केंद्राशी आता समरस झाले असून विविध भारतीय कला शिकण्यासाठी ते तेथे येत असल्याचे आम्ही पहात होतो. मराठी, हिंदी, कन्नड अशा विविध भाषा एकाच वेळी तिथे आमच्या कानावर पडत होत्या. भरत नाट्यम्, कथ्थक, तबला–हार्मोनियम वादन, शास्त्रीय संगीत आदींचे वर्ग तिथे भरत असल्याचे आम्ही बघितले. मुंबईचे गायक पं. शरद साठे तिथेच आम्हाला भेटले.

भारताचे शेवटचे गव्हर्नर जनरल लॉर्ड मौंटबॅटन यांनी भवनच्या कामात प्रमुख आश्रयदाते म्हणून मोठी कामगिरी बजावल्याचे आम्हाला कृष्णमूर्तींनी

सांगितले. त्यांच्या निधनानंतर ब्रिटनचे राजपुत्र चार्लस् आता भवनचे प्रमुख आश्रयदाते म्हणून स्थान भूषवीत आहेत.

या दौऱ्यात माझ्याबरोबर तानाजी कोलते ( त्यावेळी दैनिक लोकसत्ता मध्ये उपसंपादक आणि आता लोकसत्ताचा दिल्लीतील विशेष प्रतिनिधी ), सुनील कडूसकर ( त्यावेळी दैनिक सकाळमध्ये बातमीदार आणि आता दैनिक लोकसत्तामध्ये बातमीदार ), निखिल गजेंद्रगडकर ( केसरीत उपसंपादक ), प्रवीण वाळिंबे ( त्यावेळी 'किर्लोस्कर' मासिकात आणि आता स्वतंत्र व्यावसायिक ) आणि श्री. गो. ह. परांजपे ( तरूण भारतचे तत्कालीन वृत्तसंपादक ) हे मराठी पत्रकार सहभागी होते. तानाजी या सर्व दौऱ्यात माझा रूम पार्टनर होता.

आमच्या पत्रकार मंडळाचा नेता होता त्यावेळी इंडियन एक्सप्रेस वृत्तपत्र समूहातील जनसत्ता ( दिल्ली )चा मुख्य- उपसंपादक परमानंद पांडे. याखेरीज अशोक कुमार पांधी ( संपादक हिमाचल टाईम्स डेहराडून- उत्तर प्रदेश ), जगत् पाठक ( उपसंपादक 'भास्कर' भोपाळ- मध्य प्रदेश ), रमेश शर्मा ( सहसंपादक 'जागरण' भोपाळ- मध्य प्रदेश ), जयंतकुमार वर्मा ( पी. टी. आय- प्रतिनिधी जबलपूर- मध्यप्रदेश ) संजीव मजपुरिया ( प्रतिनिधी 'एम. पी. कॉनिकल' भोपाळ- मध्यप्रदेश ); अविनाश चंद्र मॉडवेल ( संपादक दैनिक 'देश- धरम', इटवाह- उत्तर प्रदेश ) आणि सत्येन्द्र गुमास्ता ( विशेष प्रतिनिधी 'देशबंधु'- रायपूर मध्यप्रदेश ) हे हिंदी भाषिक वृत्तपत्रांतील पत्रकारही सहभागी झाले होते.

कर्नाटकमधून सच्चिदानंद हेगडे ( वार्ताहर इंडियन एक्सप्रेस- बंगलोर ), श्रीमती बी. व्ही. उमा ( उपसंपादक इकॉनॉमिक टाईम्स- बंगलोर ), एस. पट्टाभिरामन ( संपादक 'नवधामन्'- म्हैसूर ), के रामण्णा ( संपादक दैनिक 'अरूणा'- म्हैसूर ), एम. एस. श्रीहर्ष ( उपसपादक 'कन्नड प्रभा'- बंगलोर ), एच. मृत्युंजय ( मुख्य मुद्रित शोधक- 'कन्नड प्रभा' बंगलोर ), वीतसेन्द्र चंद्रशेखर ( मुख्य-मुद्रित शोधक- 'प्रजावाणी' बंगलोर ), आणि व्यंगचित्रकार जी. वाय. हुबळीकर ( साप्ताहिक प्रजामाता- बंगलोर ) हे पत्रकार मित्र आमच्याबरोबर होते. तसेच कलकत्त्याच्या आनंद पत्रिकेतील मुख्य मुद्रित शोधक कांती भूषण सिन्हा हाही, या दौऱ्यात सहभागी झाला होता.

आमच्या या तेवीस जणांची या दौऱ्यात एकमेकांशी चांगली मैत्री झाली. प्रत्येकाची स्वभाव – वैशिष्ट्ये जशी समजली; तसेच भारताच्या उत्तर आणि दक्षिण 'भागातल्या लोकांचे व्यक्तिमत्त्व कसे आहे; त्यातला फरक ठळकपणे लक्षात आला. परदेशात जाऊनही काही लोक आपली आग्रही (खरं तर दुराग्रही) वृत्ती सोडत नाहीत; याचे काही नमुने आम्ही बघितले. आपण भारताचे दूत म्हणून परदेशात जात आहोत; हे सतत भान ठेवा; असे दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर निरोप देताना महासंघाचे अध्यक्ष विक्रम राव यांनी आम्हाला सांगितले होते. त्यांचे हे म्हणणे किती महत्त्वाचे आहे; हे आम्ही क्षणोक्षणी अनुभवत होतो. तुम्ही जेव्हा परदेशात असता तेव्हा तुमच्या प्रत्येक हालचालीकडे तिथले नागरिक पाहात असतात. तिथली हायवेवरच्या दुकानात काम करणारी सेलसगर्लही तुमच्याकडे कटाक्षाने पाहात असते. आम्ही स्वित्झर्लंडमधल्या एका हायवेवर असलेल्या भांडारात चॉकलेटस्‌ची खरेदी करीत होतो. अनेक पत्रकार मित्र त्यातली अनेक पाकिटे चाचपून पाहात होते व परत ती पाकिटे तेथे ठेवत होते. हे पाहणाऱ्या सेल्सगर्लने शेवटी त्यांना तसे न करण्याची विनंती केली. यात त्या मित्रांचा दोष नव्हता. त्यांना आपल्या देशात ज्या पद्धतीच्या वातावरणात, संस्कृतीत वावरावे लागते; त्याचा तो परिणाम होता.

पत्रकार म्हणून आपण बुद्धिजीवींच्या वर्तुळात वावरत असलो तरी अनेक साधे शिष्टाचार, चांगल्या सवयी अंगी बाणतातच असे नाही. त्यामुळे युरोप दौरा ही आम्हा काही जणांच्या दृष्टीने अभ्यासाची संधी असली तरी बऱ्याच जणाच्या दृष्टीने ती मार्केटिंगचीच संधी होती! आम्ही जेव्हा नव्या शहरात जायचो; तेव्हा काही पत्रकारांचा आमचे नेते पांडे यांना एकच प्रश्न असायचा; 'अरे भाई पांडेजी, यहाँ मार्केट कहाँ है; जरा देखो ना!' त्यामुळे पूर्व जर्मनी व इंग्लंड सोडले तर खऱ्या अर्थाने इतर देश आम्ही नुसते पाहून आलो. वेळेचा, दिवसाच्या मुदतीचा असे अनेक प्रश्न त्यात गुंतलेले होते; हे खरे. पण आमची जिज्ञासा वृत्तीही कुंठित झाली की काय न कळे! काही ठिकाणी पत्रकार परिषदांच्या वेळी एक दोन प्रश्नांनंतर आता बस् उठा बुवा; असे काही मित्र सुचवीत होते! अर्थात् तरी देखील परदेश प्रवास करायला मिळाला; हाही एक अपूर्व लाभ मी स्वतः मानतो. याच दौऱ्यात आम्ही हेगडेचा वाढदिवसही स्वित्झर्लंडमध्ये साजरा केला.

आमच्या मित्र मंडळात सर्वांत ज्येष्ठ होते गो. ह. परांजपे, पट्टाभिरामन आणि रामण्णा. या सर्व ज्येष्ठांनी अतिशय आपुलकीने आम्हा सर्वांशी संपर्क ठेवला. परांजपे तर हसत खेळत गप्पा मारीत आमच्यात समरस व्हायचे. त्यांचे खळखळून हसताना कितीतरी फोटो आम्ही काढले! रामण्णा आणि पट्टाभिरामन हे दोघे पत्रकार आम्हा मराठी पत्रकारांवर भलतेच खूष होते. आमची वागण्याची, एकमेकांना घेऊन जाण्याची सवय त्यांना आवडली. जगत पाठक हा त्याचा शाही हुक्का सतत ओढायचा की ज्यामुळे परदेशी तरुण-तरुणी साहजिकच तिकडे आकर्षिले जात असत. त्यावेळी त्याला खूपच भाव यायचा खरा!

हा परदेश दौरा आम्हा सर्वच पत्रकारांचा पहिला वहिला अनुभव होता. आमच्याबरोबर दिल्लीच्या शिकार ट्रॅव्हल्स्‌ची उषा महादेवन् पश्चिम युरोपच्या दौऱ्यात गाईड म्हणून सहभागी झाली होती. अवघ्या पंचविशीतल्या उषाची या दौऱ्यातली धावपळ आणि तत्परता वाखाणण्याजोगी होती. तिच्याहून आम्ही बहुतेक वयाने ज्येष्ठ होतो. आपल्या या ज्येष्ठ भावंडांना तिने आपुलकीने सहकार्य केले. सर्वांच्या छोट्या-मोठ्या गोष्टींकडे तिचे आवर्जून लक्ष असे आणि ती स्वतः अतिशय काळजीने सारे पाहात होती. स्वित्झर्लंडला झुरिच येथे आमच्या एका पत्रकार मित्राचे अमेरिकन एक्सप्रेसचे चेक चोरीला गेले. तेव्हा उषाने सर्वांना एकत्र आणून त्याची नड भागवली. युरोपात सर्वत्र आम्ही स्वयंभू, स्वावलंबी आणि आत्मनिर्भर अशी स्त्री पाहात होतो; त्याच जातकुळीला शोभेल अशा धडाडीने उषा या दौऱ्यात वावरली. दौऱ्याच्या शेवटच्या दोन-तीन दिवसात तिला थोडासा मनःस्ताप झाला; तेव्हा तानाजीने तिला भरपूर हसवून तिचे रडू पळवून लावले..

आम्हा पत्रकारांपैकी जे गरीब अथवा मध्यमवर्गीय होते; त्यांना या दौऱ्याचा खर्च हा एक चिंतेचा विषय होता. मध्यप्रदेश आणि उत्तर प्रदेशातील पत्रकार मित्रांना त्यांच्या राज्य सरकारने प्रत्येकी २५ हजार रुपये दिले होते. त्यामुळे ते सर्वच पत्रकार मोठ्या थाटात होते. महाराष्ट्रात सरकारी मदत अशा दौऱ्यासाठी घ्यायची नाही असे तत्व मानण्यात आल्यामुळे म्हणा किंवा लादण्यात आल्यामुळे म्हणा सरकारी मदतीचा विचार येथे होऊच शकत नाही. मी आणि कडूसकर सकाळमध्ये होतो हे आमचे भाग्य मानतो. सकाळचे धडाडीचे व्यवस्थापकीय संचालक प्रतापराव पवार यांनी आम्हाला प्रत्येकी

१० हजार रुपये मदत दिली आणि उरलेले १० हजार रुपये सकाळमधून कर्जाऊ देण्याची व्यवस्था केली. अर्थात् एवढ्यावर आमची गरज भागत नव्हती. मला स्वतःला सकाळच्या संपादकीय विभागातील, पेस्टिंग, फोटो कंपोझ विभागातील मित्रांनीही मोलाची मदत केली.

प्रतापराव पवारांसारखा धडाडीचा ज्येष्ठ माणूस मागे नसता तर माझ्यासारख्याला या दौऱ्याचा विचारही करता आला नसता हे मला कृतज्ञतापूर्वक नमूद केले पाहिजे.

मी या दौऱ्यात इतर सर्व पत्रकार मित्रांशी बोललो; तेव्हा समजले की; त्यातल्या कोणालाही त्यांच्या पत्रांनी जवळपास काहीही मदत केली नव्हती. बहुतेक सारे ( अर्थातच मध्य प्रदेश व उत्तर प्रदेशातील पत्रकारांचा अपवाद करुन ) स्वतःच्या खर्चानेच आले होते. काही हिंदी आणि कन्नड वृत्तपत्रे खूपच लहान स्वरूपाची होती. त्यामुळे त्यांना मदत मिळणे शक्यच नव्हते. या पार्श्वभूमीवर सकाळने आम्हाला केलेली मदत फार मोलाची वाटते.

अर्थात् पुण्याहून दिल्ली व परत असा प्रवास तसेच दिल्लीतल्या मुक्कामाचे पाच दिवस हाही खर्च होताच. मला या सर्व दौऱ्यासाठी ज्यांनी प्रत्यक्ष मदत केली; त्यांचा इथे कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणे हे मी माझे कर्तव्य मानतो. पंत प्रतिनिधी ट्रस्टने मला रोख अडीच हजार रुपये मदत म्हणून दिले आणि शेंबेकर ट्रस्टने कर्जाऊ दहा हजार रुपये दिले; त्याबद्दल मी त्यांचा शतशः ऋणी आहे. या दोन्ही ट्रस्टचे सेक्रेटरी श्री. सुधीर दोदवाडकर यांच्याबद्दल मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो.

माझे ज्येष्ठ मार्गदर्शक प्रा. देवदत्त दाभोलकर सर, डॉ. मा. प. मंगुडकर सर, कोपरगावच्या संजीवनी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष शंकररावजी कोल्हे, कोल्हापूरचे धनी वालावलकर ट्रस्ट, प्रियादरणीय शशीताई किर्लोस्कर, संध्या देवरुखकर, ज्येष्ठ मित्रवर्य ॲड. वसंतराव पाटील, ॲड. बी. एल. नाईक, पुण्यातील नामवंत दातार क्लासेसचे दातार सर, माझा मित्र चंदू पानसे या सर्वांचा मी अंतःकरणपूर्वक ऋणी आहे.

परदेश दौऱ्यासाठी लागणारी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे अर्थातच पासपोर्ट आणि परदेशी चलन. या बाबतीत श्री. पवार साहेबांनी जातीने लक्ष घालून साहाय्य केले. तसेच त्यांचे स्वीय सहाय्यक श्री. कुलकर्णी यांनीही या कामात खूप मोलाची मदत केली. त्याबद्दल मी त्यांचेही शतशः आभार मानतो.

या सर्वच गोष्टी एका अखंडपणे झालेल्या प्रक्रियेचा भाग आहेत. पण या दौऱ्याचे फलित काय ? ऑगस्ट ८७ मध्ये भारतात परतल्यावर त्याबाबत विचार सुरु केला आणि त्यातून आकाराला आले ते माझे काही लेख. या लेखनासाठी दिशा देण्याचे काम रविवार सकाळचे तेव्हाचे संपादक श्री. सदा डुम्बरे यांनी केले. त्यांच्याकडून कौतुक, प्रशंसा होणे हे किती दुर्मिळ असते याचा अनुभव त्यांचा सहकारी म्हणून मी घेतलेला आहे. म्हणून तर पहिला लेख पूर्ण झाल्यानंतर तो वाचताना त्यांनी जे कौतुक केले व पुढे लिहायला प्रोत्साहन दिले ते मी विसरू शकत नाही. त्यांचे ऋण व्यक्त करण्याचे औद्धत्य मी करणे योग्य नाही.

हे लेख रविवार सकाळच्या ऑगस्ट आणि सप्टेंबर ८७ या काळात प्रसिद्ध झाले. अनेक वाचकांनी प्रत्यक्ष भेटून आणि पत्राद्वारे ही लेखमाला आवडल्याचे कळवले. या लेखांची आकर्षक मांडणी सकाळमधील पेस्टिंग विभागात काम करणारे सर्वश्री ग. आ. माने, बनेश्वर लिंगायत, हिरामण परदेशी आणि खाटपे तसेच चित्रकार राजू पवार यांनी करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यांचे या ठिकाणी अभिनंदन करतो.

पोलंड आणि पूर्व जर्मनी या देशात नव्या प्रवाहांचे वारे वाहात असताना तेथील अल्पकालीन वास्तव्यावर आधारलेले हे पुस्तक प्रसिद्ध होत आहे; याचा मला विशेष आनंद वाटतो. रूढ अर्थाने हे प्रवासवर्णन वाटेल; मला स्वतःला त्यात युरोपचे जीवनदर्शन दिसते. वाचकांनाही तसेच वाटेल ही अपेक्षा.


अरूण खोरे

तेजलकुंज सी– १४
कर्वे रस्ता, संगम प्रेस समोर,
कोथरूड, पुणे ४११०२९.

# 'दुसऱ्या' युरोपात

जिथे पहिल्यांदा प्रबोधनाची पहाट अवतरली आणि जिथे औद्योगिक क्रांतीच्या चाकांनी पहिल्यांदा प्रवास केला, त्या युरोप खंडाकडे आम्ही निघालो होतो. धर्मसत्तेला आव्हान देणाऱ्या विचारप्रणालींनी जिथे आपले वैचारिक पीठ उभे केले अशा भूमीकडे आम्ही निघालो होतो आणि प्रयोगाशिवाय सत्य न स्वीकारणाऱ्या वैज्ञानिकांच्या खंडाकडे आमचा प्रवास सुरू झाला होता. जगाच्या नकाशावर फार मोठी जागा न व्यापणाऱ्या परंतु जगाच्या अस्तित्वावर गेली शेकडो वर्षे आपला अमिट ठसा उमटविणाऱ्या अवघ्या ३४ राष्ट्रसमूहांच्या युरोप खंडाकडे आम्ही जात होतो. विभिन्न भाषा आणि संस्कृती असतानाही रोमन साम्राज्याखाली पुरेशा एकसंधपणे उभ्या राहिलेल्या युरोपातील राष्ट्रसमूहांनी आपली वेगळी प्रतिमा आणि एकसंध रूप रोमन साम्राज्याच्या पतनानंतरही टिकवून ठेवले! रोमन साम्राज्याच्या वैभवी कलासंस्कृतीची आठवण पदोपदी करून देणाऱ्या रस्त्यांवरून आम्ही जात होतो! कार्ल मार्क्स, एंजल्स, चर्चिल, हिटलर, नेपोलियन, फ्रेडरिक (दुसरा), बिस्मार्क, महाकवी गटे, पंचम जॉर्ज अशा इतिहासप्रसिद्ध व्यक्तींच्या कर्तृत्वाने फुललेल्या खंडात आम्ही प्रवेश करीत होतो! आणि जगातल्या सर्वांगसुंदर अशा या गुलाबी खंडाला आम्ही भेट देत होतो ती एक अभ्यासविषय म्हणून!

दुसऱ्या महायुद्धाचा वणवा पहिल्यांदा ज्या वॉर्सा शहरात नाझींनी पेटवला त्या शहरात आम्ही पहाटे ४ वाजता आलो. वॉर्सा विमानतळावर लख्ख उजाडले होते आणि भारतीय वेळेप्रमाणे सकाळचे ८ वाजत आले होते. कस्टम तपासणी संपवून आम्ही विमानतळाबाहेर आलो, लख्ख सूर्यप्रकाश आणि गारेगार बोचरे वारे यांचा हवाहवासा वाटणारा स्पर्श अंगाला होत होता. मुक्कामाच्या हॉटेलपर्यंत बसने निघालो तेव्हा युरोपातील सुंदरतेचे एक एक विलोभनीय दर्शन घडू लागले!




पार्लमेंट हाऊस - लंडन




डोव्हर ते ऑस्टीन प्रवास




बासेल (स्विश) येथील हॉ[illegible]ील
वेटर सुझाना



स्मारक, बर्लीन



सक्सन हाउस



[illegible]

रस्ता अतिशय सुंदर ( अर्थातच स्वच्छही ! ) होता आणि दोहो बाजूला सुंदर हिरवीगार झाडी होती. नुकताच पाऊस पडून गेला होता. प्रशस्त, उंची इमारती उभ्या – आडव्या कोनातून उभ्या होत्या. अठ्ठेचाळीस वर्षांपूर्वी दुसऱ्या महायुद्धाची ठिणगी पडून याच शहराची राखरांगोळी झाली होती, हे मात्र विश्वास ठेवण्याजोगे वाटत नव्हते. कारण या काळात पुन्हा एकदा फिनिक्स पक्ष्याने राखेतून झेप घ्यावी या दुर्दम्य आकांक्षेने वॉर्सा आणि पोलंडही उभे राहिले आहे ! या लढाईत पोलंडला सर्व आघाड्यांवर मदत करणाऱ्या आणि मुक्तता देणाऱ्या रशियाचे नेतृत्व आजच्या आपल्या वाटचालीत पोलंडने मान्य केले आहे.

आणि म्हणून पोलंडच्या या राजधानीची सफर करताना आमचा गाईड वारंवार रशियाच्या या सहकार्याचा उल्लेख करीत होता; त्याचे आश्चर्य वाटले नाही. जवळजवळ १९ – २० हजार रशियन सैनिकांनी पोलिश सेनेच्या मदतीने वॉर्सा मुक्त केले. या धुमश्चक्रीत सुमारे १५ हजार रशियन सैनिक मरण पावले. त्यांची युद्धस्मृती मोठ्या इतमामाने वॉर्सा शहरात जतन करण्यात आली आहे. इथली राज्यपद्धती आणि आर्थिक व्यवहार यांची सगळी घडीच जणू रशियाच्या मदतीने बसविण्यात आली आहे ! त्यामुळेच धर्माची उपेक्षा सहन न करणारे इथले रोमन कॅथॉलिक चर्च मधूनमधून आपला राग व्यक्त करीत असते. त्यातही सध्याचे पोप हे पोलिश आहेत, त्यामुळे त्यांचा प्रभाव विशेष आहे.

तसे पोलंड हे बातम्यांत सतत येणाऱ्या नावांत मोडत नाही. पण पाच – सहा वर्षांपूर्वी लेक वालेसा नावाचे वादळ गोदी कामगारांच्या संपातून उसळले आणि त्याचे प्रतिध्वनी जगाच्या सर्व कोपऱ्यात उमटले ! आज मात्र हे नाव लुप्त झाले आहे. चर्चशी जुळते मिळते धोरण स्वीकारून वालेसांना पुनः एकदा गोदी कामावर गुंतवण्यात आले आहे.

पोलंडमध्ये ९८ टक्के लोक रोमन कॅथॉलिक आहेत. त्यामुळे पोलंडच्या एकूण व्यवहारात धर्माला डावलणे 'पीपल रिपब्लिक ऑफ पोलंड'च्या राज्यकर्त्यांना नेहमीच जड जाते. आणि चर्च विरुद्ध सरकार असे वाद विविध कारणांनी उसळत राहतात !

अर्थात पोलंडची घडी सुरळीत राहावी असा इथला जारूझेलस्की सरकारचा प्रयत्न आहे आणि खरं तर ही घडी सुरळीत ठेवणे हेच एक मोठे आव्हान इथल्या राज्यकर्त्यांपुढे आहे.

पोलंड सरकारचे प्रवक्ते अलेक्झांडर पर्केझिन्स्की यांच्याशी बोलताना तिथल्या गंभीर आर्थिक कोंडीचे चित्र स्पष्ट झाले. राष्ट्रीय उत्पन्नाच्या टक्केवारीत होणारी प्रचंड घट आणि १९८२ पासून तरुणांना राहण्यासाठी जाणवणारी घरांची मोठ्या प्रमाणावरील समस्या हे दोन प्रश्न तिथल्या कोंडीचे स्वरूप स्पष्ट करणारे आहेत. चलन फुगवट्याचे संकट तर किती मोठे आहे याची प्रचीती आमच्या मुक्कामात आम्हाला येतच होती. त्यामुळे सतत पगार वाढवावे लागतात. इथे प्रत्येकाला किमान १० हजार लोटिस ( पोलंडचे चलन २५० लोटीस = १ डॉलर ) पगार मिळतो. श्री. पर्केझिन्स्की यांना ५५ हजार लोटीस इतका पगार मिळतो. पगाराच्या या रकमेमुळे किंमत वाढ हाही या कोंडीमागचा आणखी एक पूरक घटक आहे, असे त्यांनी सांगितले.

कच्च्या मालाची चणचण आणि मागासलेले व्यवस्थापन तंत्र या दोन त्रुटी असल्याचे श्री. पर्केझिन्स्की यांनी सरळ सांगितले. जवळपास सर्व आर्थिक आघाड्यांवर सरकारचे नियंत्रण असले तरी काही प्रमाणात खासगी संस्थांना मुभा देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. शेतीचे सहकारी उत्पादन जसे होते त्यापेक्षा मोठ्या प्रमाणात खासगीरीत्या शेती केली जाते. मात्र प्रत्येकाच्या जमिनीच्या मालकीवर निर्बंध आहेत. शेतीतून मिळणारे उत्पन्न मात्र खूपच मर्यादित असल्याचे त्यांनी सांगितले.

पर्केझिन्स्कींच्या कार्यालयाकडे जाताना आम्हाला प्रत्येक पावलावर पोलिस दिसत होते. पोलंडची सुरक्षा फळी याबाबत अतिशय अभेद्य आहे, हे सतत जाणवत होते. विमानतळावर जी सुरक्षा ती इथल्या सर्वच मोक्याच्या ठिकाणी दिसते. त्यामुळेच वृत्तपत्र स्वातंत्र्याचा प्रश्न विचारावा की नको या संभ्रमात असतानाच त्यासंबंधीच्या प्रश्नाला पर्केझिन्स्की उत्तर देऊ लागले होते. इथली वृत्तपत्रे सरकारी असली तरी त्यांच्याकडे येणारी हजारो वाचकांची सरकारच्या, संस्थांच्या कारभारावर टीका करणारी पत्रे छापली जातात असे त्यांनी सांगितले. १९८२ मध्ये 'पोलिश वृत्तपत्र कायदा' करण्यात आला आहे. यंदा एक नवीन खासगी वृत्तपत्र सुरू झाल्याचे पर्केझिन्स्की यांनी सांगितले. या पत्रातून टीका होते असे ते म्हणाले. आणि त्यांनी पुढे पुस्ती जोडली की चर्चवर या वृत्तपत्राने अलीकडेच खरमरीत टीका केलेली मी वाचली !

प्रसारमाध्यमात पाश्चिमात्य राष्ट्रांची मक्तेदारी असल्यामुळे माहितीचे सतुलन बिघडते अशी टीका करून पर्केझिन्स्की यांनी सांगितले की, याचा परिणाम

आमच्या देशासंबंधी विस्कळित, चुकीची प्रतिमा निर्माण होण्यात होतो आणि पाश्चिमात्य प्रसारमाध्यमांशी तर आम्ही स्पर्धा करूच शकत नाही. याचा साहजिकच परिणाम सामाजिक, सांस्कृतिक विषयांकडे येथील वृत्तपत्रांनी लक्ष देण्यात झाला आहे.

खरोखरच हे योग्य झाले आहे असे वाटून गेले. येथील वृत्तपत्रांनी तरुणांचे प्रश्न, वृद्धांचे प्रश्न, महिलांचे प्रश्न आणि बालकल्याण यासाठी आपल्या विशेष पुरवण्या सादर करून पाठपुरावा केला आहे. दारूचे व्यसन बळावू नये म्हणून इथे अल्कोहोलच्या निर्मितीला मर्यादा आहेत. दुपारी १ पूर्वी बिअर विकत मिळत नाही. रुग्णालये आणि शाळा यांच्या नजीकच्या परिसरात दारूची दुकाने नसतात. सार्वजनिक ठिकाणी नियमांचा भंग करून दारू विकणारा किंवा पिणारा यांना कडक शासन दिले जाते. हीच काळजी मादक द्रव्ये घेणाऱ्या व्यसनाधीन तरुणांच्या बाबतीत घेतली जाते. तरुणांच्या प्रश्नांसंबंधी एक छोटे वृत्तपत्र चालविणाऱ्या एका पत्रकारबाईंनी सांगितले की, सर्वेक्षण करून तरुणांना भेडसावणाऱ्या प्रश्नांचा वेध घेतला जातो. त्यांसंबंधी जाणकारांशी चर्चा करून उपाय सुचवले जातात

युद्धोत्तर काळात या देशाची जडणघडण मोठ्या प्रमाणात रशियाच्या मदतीने होऊ शकली हे खरे आहे. पण इथल्या तरुण पिढीचेही तितकेच मोठे सहाय्य या उभारणीत झाले आहे. या पिढीला आपल्या भवितव्याबद्दल शंका वाटू नये आणि पोलंडचे आकाश सोडून ही महत्त्वाकांक्षी पाखरे दुसऱ्या आकाशात निघून जाऊ नयेत म्हणून जारुझेलस्कींचे सरकार प्रयत्नशील आहे.

दरवर्षी हजाराहून अधिक बालकांना सुटीसाठी पूर्व जर्मनी, रशिया येथे नेण्याची सरकार व्यवस्था करते. लहान मुलांना वैद्यकीय मदत देणे, त्यांच्या पूर्वप्राथमिक शिक्षणाची सोय करणे, शालेय शिक्षणाची काळजी वाहणे, मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे विविध प्रकल्प राबवणे अशा अनेकविध गोष्टी इथले सरकार मुलांसाठी करीत असते. आई–वडिलांना कामात सूट, आर्थिक सुविधा मुलांच्या वाढीसाठीं मिळत असतात. वॉर्सामधल्या आमच्या भ्रमंतीत आपल्या आई–बाबांच्या मायेच्या सावलीत बाबागाडीत शांतपणे पहुडलेली बालके आणि अर्भकेही आम्ही पाहिली! एकही रडके मूल आम्ही बघितले नाही, हे आम्हा भारतीयांना तरी आश्चर्यच वाटले! विविध बागांमधून खेळणारी, मस्ती करणारी, बागडणारी मुले–मुली आम्ही पाहात होतो! त्यांचे

हसरे चेहरे जणू चैतन्याची फुले उधळीत होते! आम्ही हात उंचावल्यावर तेही तितक्याच उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देत होते! आणि हिंदु–मुस्लिम–शीख–इसाई या बंधापलीकडचेही एक मानवीय नाते आहे याची प्रचिती जणू आम्हाला येत होती!

भाषेच्या अडसरामुळे आम्ही पोलिश लोकांशी बोलू शकत नव्हतो. पण त्यांचा जीवनव्यवहार आम्हाला लक्षात येत होता. तिथल्या मोठमोठ्या डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये जीवनावश्यक वस्तूंची खरेदी रांगा लावून पद्धतशीरपणे चालू होती. चलनफुगवटयामुळे साध्या कापडी पिशवीला तिथे ५५० लोटीस द्यावे लागत होते. रस्त्यावर, भिंतीवर कोठेही जाहिराती दिसत नव्हत्या. त्यामुळे आलेली सफाई तिथल्या सौंदर्याला पूरकच ठरत होती. पश्चिमी बाजारपेठेमधल्या प्रचंड नफा देणाऱ्या कोणत्याही वस्तू पोलंडच्या बाजारात, दुकानात विकल्या जात नाहीत. पूर्व जर्मनी, पोलंड, रशिया येथील बनावटीच्या वस्तू व उत्पादने येथे वापरली जातात. बाजारात उपलब्ध केली जातात. जाहिरातींचे रंगीबेरंगी स्वप्नील जग रोजच्या रोज वृत्तपत्रांत, दूरदर्शनवर बघणाऱ्या आम्हा भारतीयांना जाहिरातीशिवायचे रस्ते, इमारती पाहणे हा एक दुर्मिळ अनुभव होता. काहीवेळा चुकल्यासारखेही वाटायचे, पण इथल्या राज्यकर्त्यांनी ज्या पद्धतीने हे सारे अंमलात आणले आहे, त्याची आवश्यकता पटत होती.

पर्केझिन्स्कींच्या बोलण्यात आर्थिक प्रगतीबद्दल जरी निराशेचा सूर असला तरी आम्ही पहात असलेले पोलंड उमदे वाटत होते. सर्वसाधारण रोजचे जीवन लोक मोकळेपणाने, आनंदाने जगताना दिसत होते. स्वातंत्र्याच्या विशेषतः राजकीय स्वातंत्र्याच्या ज्या मूल्याची आपण सतत चर्चा करतो, ते येथे हरवले आहे असे लक्षात आले नाही. विशिष्ट नियंत्रित राजकीय दडपशाहीखाली लोक वावरताहेत असेही आढळले नाही. कदाचित भाषेचा अडसर दूर होऊन बोलता आले असते तर अधिक समजू शकले असते. मात्र बऱ्याच ठिकाणी पोलिस व सैनिकांचा वावर इथे आढळत होता.

याच संपन्न आणि उमद्या जीवनपद्धतीचा अनुभव आम्हाला पूर्व जर्मनीतल्या मुक्कामात आला. विमानातून बर्लिन शहर एखाद्या दाट अरण्यासारखे दिसत होते. आणि विमानतळावर उतरताना तर आपण एखाद्या दाट वनराईत उतरतो आहोत हे लक्षात येत होते.

आमची बर्लिनमधली मुक्कामाची जागा विमानतळापासून खूपच दूर होती. इंटरनॅशनल इन्स्टिटयूट ऑफ जर्नालिझम येथे आमची राहण्याची व्यवस्था केली होती. या संस्थेचे संचालक डॉ. हान्स ट्रेफकॉर्न यांच्या दृष्टीने भारत आणि पूर्व जर्मनी यांच्यातील स्नेहसंबंध दृढ होण्यासाठी अशा अभ्यास–दौऱ्यांचे मोल मोठे आहे. डॉ. ट्रेफकॉर्न भारतात पाच–सहा वेळा येऊन गेलेले आहेत. भारतासमोर कोणते प्रश्न आहेत याची त्यांना चांगली जाणीव आहे. म्हणूनच आपल्या भाषणात त्यांनी आज भारतापुढील भाषिक, जातीय वादामुळे उद्‌भवलेल्या गंभीर समस्येचे पत्रकार म्हणून मुकाबला करण्याचे मोठे काम तुमच्या शिरावर आहे, असे आम्हाला बजावले. उत्तर भारतातल्या जगदीशपूर या आदर्श छोटया शहराला त्यांनी भेट दिली होती. त्याची आठवणही त्यांनी सांगितली.

साडेआठशे चौरस किलोमीटरच्या परिसरात वसलेले बर्लिन शहर ( अर्थातच पूर्व ) एक अतिशय सुंदर शहर म्हटले पाहिजे आणि यंदा हे शहर आपला ७५० वा वाढदिवस वर्षभरात विविध महोत्सवांद्वारे साजरा करते आहे. ७५० व्या वाढदिवसाची पोस्टर्स रस्त्यावर विविध, आकर्षक स्वरुपात लावलेली होती. अनेक ठिकाणी आकर्षक मेळे, प्रदर्शने भरली होती आणि अतिशय उत्साहात आबालवृद्धांचा सर्वत्र संचार चालू होता. बर्लिनच्या सौंदर्याला जणू चैतन्याचे नवे धुमारे फुटले आहेत हे दिसत होते!

पोलंडपेक्षा अतिशय संपन्न आणि समर्थ देशात आपण आलो आहोत याची चिन्हे बर्लिन शहरात ठळक दिसत होती. बर्लिन विमानतळावर आमच्या स्वागताला पीटीआयचे तेथील प्रतिनिधी अरिफ नकवी आले होते. ते म्हणाले, "पंधरा वर्षांपूर्वी जी.डी.आर.ला ( जर्मन डेमोक्रॅटिक रिपब्लिक ) कोणी विचारत नव्हते. आता युरोपातच नव्हे तर सर्व जगातही जी.डी.आर. हे एक ताकदवान राष्ट्र म्हणून मानले जात आहे."

अर्थात याचेही उत्तर आणि गमक इथल्या राज्यपद्धतीतच सापडते. दोन्ही महायुद्धांत फॅसिझम, नाझीझम आणि साम्राज्यवाद या समाजवाद–विरोधी प्रवृत्तींनी जर्मनी हे आपले केंद्र केले होते. आणि बर्लिन शहर हा या प्रवृत्तींचा बालेकिल्ला झाला होता! पहिल्या महायुद्धाच्या काळात याच शहरात मार्क्सवादी गटाने युद्धविरोधी चळवळ उभारली होती. त्याच शहरात दुसऱ्या महायुद्धामुळे फॅसिझमचे भूत जागे झाले!

साम्राज्यवादी शक्तींविरुद्ध चेतना देऊन हिटलरने जर्मन तरुणांना भडकवले आणि नाझी भस्मासुराचा उदय झाला. त्याचवेळी एका द्रष्ट्या माणसाने हिटलरच्या मागे जाऊ नका, त्याचे घातक परिणाम होतील असा इशारा दिला होता. १९३२ मध्ये अर्नस्ट थालमन म्हणाले होते, 'दोज हू वोट फॉर हिटलर, वोट फॉर वॉर.' आणि सात वर्षांतच हे उद्‌गार भीषणपणे प्रत्ययाला आले! पूर्व जर्मनीच्या या राजधानीच्या सुंदर रूपाखाली सुमारे ३६० वेळा विमानांनी केलेल्या बॉम्बहल्ल्यांची राख दडलेली आहे आणि तीस हजार लोकांचे सांगाडेही इथल्या जमिनीखाली गाडले आहेत! बर्लिनच्या मुक्ततेसाठी १९४५ साली सुमारे १ लाख रशियन आणि पोलिश सैनिकांनी प्राण गमावले आणि हिटलरच्या फॅसिझमच्या विळख्यातून जर्मनांची सुटका झाली.

आज बर्लिनमध्ये फिरताना कुठेही हिटलरचे नाव ऐकायला येत नाही. नव्या समाजरचनेचा, राज्यपद्धतीचा आरंभ १९४६ साली येथे फ्री जर्मन यूथ (FOS) या संघटनेने एरिक ह्योनेकर यांच्या धुरीणत्वाखाली केला; तो आजही ते सांभाळत आहेत. (संदर्भ : जुलै–८७) जी.डी.आर. मधील सोशॅलिस्ट युनिटी पार्टी या सर्वांत मोठ्या अशा पक्षाच्या केंद्रीय समितीचे ते सरचिटणीस आहेत. कौन्सिल ऑफ स्टेटचेही ते अध्यक्ष आहेत. अगदी तरुण वयात संघटनेचे काम सक्रियपणे करीत राहून त्यांनी जी.डी.आर. मधील सर्वोच्च पद आज मिळवले आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर आज १३२ देशांशी जी.डी.आर.चे राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले आहेत. परदेशी वृत्तपत्रांची १२० प्रतिनिधी कार्यालये येथे आहेत.

युद्धाची आठवणही आज कोणाही जर्मन माणसाला नकोशी वाटते. मात्र परदेशातील माणूस जेव्हा बर्लिन शहर पाहतो; तेव्हा तो आश्चर्याने थक्क होतो! कारण जवळपास सारेच बर्लिन शहर युद्धाच्या वणव्यात होरपळले होते! आणि असे असूनही आज प्रगतीच्या, नव्या आशेच्या दीपमाळा प्रज्वलित करीत मार्क्सचा समाजवाद स्वीकारीत पूर्व जर्मनीची घोडदौड चालू आहे.

कार्ल मार्क्सने बर्लिन विद्यापीठात तत्त्वज्ञान आणि इतिहास या विषयांत संशोधन करण्यासाठी १८३६ ते ४१ या काळात नाव नोंदवले होते. १८४१–४२ साली मार्क्सचा मित्र एंजल्स हाही अशा स्वरूपाच्या अभ्यासात रस घेत होता. दोघेही मित्र बर्लिनमधल्या बुद्धिजीवींच्या वर्तुळात आपल्या

क्रांतिकारक आणि समाजवादी दृष्टिकोणामुळे बहुचर्चित झाले होते. आज बर्लिन विद्यापीठाचे ग्रंथालय मार्क्सचे नाव अभिमानाने मिरवत आहे.

इतिहासातून मिळालेला कला – संस्कृतीचा वारसा जतन करीत बर्लिन शहर आज एका सुंदर हिरवळीसारखे पसरले आहे! आमच्या संस्थेत बाहेरच्या पटांगणात हिरवळ तर होतीच पण गुलाबाची फुलेही फुलली होती! युद्धाचे ढग इथेच वर्षाव करून कधीकाळी गेले असतील हे इतिहासावरूनच समजत होते! रस्त्याच्या एकेका बाजूला ४।४ लेन्स आणि हिरवेगार वृक्ष केवळ निसर्गच नव्हे तर साक्षात परमेश्वरच या भूमीत वास करतो आहे याची प्रचीती देत होते!

रस्त्यावरील वाहतुकीत तर फारशी वर्दळ नव्हती. पण मेट्रोने प्रवास करावा तर तिथेही फार गर्दी नव्हती! बर्लिनची मेट्रो हे एक आश्चर्यच म्हटले पाहिजे. आम्ही बर्लिन शहराच्या 'अलेक्झांड्रा प्लेस' या सुंदर भागात मेट्रोने गेलो होतो. या ठिकाणी एकाखाली एक सात ट्रॅक्स मेट्रोचे आहेत हे जेव्हा आमच्या जर्मन मित्र आणि मार्गदर्शक पीटर मे याने सांगितले, तेव्हा आपल्याकडील पाताळाची कथा जणू साकार झाल्यासारखे वाटले! एखादे वेगळे जगच मेट्रोमुळे इथे अवतरले आहे. आजदेखील लंडनच्या मेट्रोपेक्षा बर्लिनची मेट्रो आदर्श व आश्चर्यचकित करणारी मानली जाते.

अगोदर म्हटल्याप्रमाणे बर्लिनच्या ७५० व्या वाढदिवसाचे कार्यक्रम अनेक स्तरांवर येथे चालू आहेत. तरुण – तरुणी, ट्रेड युनियन्सचे कार्यकर्ते, बुद्धिजीवी लोक, शिक्षक, व्यापारी या सर्वांच्या प्रयत्नांतून बर्लिन शहर वर्षभर झगमगाटात राहते आहे, आम्ही गेलो तेव्हा 'सायन्स अॅण्ड प्रॉडक्शन' या विषयावरचे प्रदर्शन चालू होते आणि हे प्रदर्शन म्हणजे जी. डी. आरने तंत्रविज्ञानाच्या क्षेत्रात केलेल्या प्रगतीचा एक आलेखच होता. कॉम्प्युटर्स, रोबो यांचा वाढता वापर येथील कारखान्यांमधून, कार्यालयांमधून होतो आहे. पण त्याचा परिणाम कोणी गरजू बेकार होण्यात मुळीच झालेला नाही.

इथला कामगार आठवड्यात ४० तास काम करतो. दरवर्षी त्याला मिळणाऱ्या रजेत वाढ होत असते. लहान मुले/मुली, तरुण जोडपी, वृद्ध माणसे यांना मिळणाऱ्या विविध सवलतींमध्ये सरकारने सतत वाढ केली आहे. ज्याना मुले जास्त होतील, त्यांना घराचे कर्ज बिनव्याजी मिळते. आज मितीला बर्लिन शहरातील १ ते ३ वर्षे वयाची ८० टक्के मुले ३६६ पाळणाघरांतून

सुखरूप सांभाळली जातात. ज्यांना स्वतःला काही कलागुणांत वाढ करायची आहे; त्यांच्यासाठी विशेष योजना आणि उपक्रम राबवले जातात. व्यक्तिमत्त्व विकासाला प्रतिबंध नसावा, असे इथे मानले जाते. त्यासाठी कामात सोयी उपलब्ध करून दिल्या जातात. विविध प्रकारच्या क्रीडांमधूनही रस घेणाऱ्यांना संधी दिली जातो. स्टीफन फौंडेशन हॉस्पिटल, सेंट हेडविग हॉस्पिटल आणि पोस्ट ग्रॅज्युएट मेडिकल स्कूल यांच्याकरवी जर्मनांना उत्तम आरोग्यसेवा पुरविली जाते.

जर्मन डेमोक्रेटिक रिपब्लिक स्थापन झाले ७ ऑक्टोबर १९४९ रोजी. यानंतरच्या काळात आजपर्यंत बर्लिनच्या दृष्टीने सर्वांत मोठी आणि महत्वाकांक्षी योजना यशस्वीरीत्या कोणती पार पडली असेल तर ती आहे घरबांधणीची. आम्ही बर्लिनमध्ये होतो, तेव्हा जाने. ते जूनपर्यंतचा एक इकॉनामिक सर्व्हे टीव्हीवर सादर केला जात होता. त्यात या पहिल्या सहा महिन्यांत ३६ हजार घरे बांधण्याची माहिती देण्यात आली होती. तर ३ लाख १० हजार घरांची दुरुस्ती करण्यात आली, असेही सांगण्यात आले. आम्ही बर्लिनमध्ये जिथे जिथे फिरलो, तेथील अनेक भागात घरांच्या दुरुस्तीची आणि बांधणीची कामे चालू असलेली पाहिली. कुठेही आरडा – ओरडा नव्हता आणि धूळही उडत नव्हती! मर्यादित लोकसंख्येच्या आधाराने अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून घरे बांधण्याच्या मोहिमेत अनेक जर्मन तरुण स्वयंसेवक म्हणून दाखल झाले होते. त्यामुळे १९७१ ते ८५ या अवघ्या पंधरा वर्षांत १ लाख ७० हजार घरे बांधून पुरी करता आली.

समाजवादी जीवनपद्धतीचा एक प्रभावी मार्ग म्हणून जर्मन सरकारने घरबांधणीच्या या प्रचंड प्रश्नात जिव्हाळ्याने लक्ष घातले आहे. आज ज्या इमारती बर्लिनमध्ये दिमाखात उभ्या आहेत; त्यांतील निम्म्याहून जास्त १९४९ नतर बांधण्यात आल्या आहेत. प्रत्येकाला किमान ३ ते ५ खोल्यांचा ब्लॉक पगाराच्या मर्यादेत अत्यंत कमी भाडेपट्टी आकारून राहण्यासाठी उपलब्ध करून दिला जातो.

एवढे प्रचड बांधकाम करताना कुठेही ऐतिहासिक वास्तू, कलात्मक इमारती यांना अजिबात धक्का इथल्या वास्तुशास्त्रज्ञांनी लावलेला नाही. एक प्रगत, महान परपरा जतन करणारे, संस्कृतीची पहाट फुलविणारें शहर म्हणून बर्लिन आजही सुंदर आणि प्रेक्षणीय आहे.

पूर्व जर्मनीच्या स्थापनेनंतर अखंड बर्लिन शहरावर रशिया, अमेरिका, इंग्लंड आणि फ्रान्स या चार राष्ट्रांचा कब्जा होता. हळूहळू ज्या पट्ट्यात रशियाचे वर्चस्व आहे; तिथे उर्वरित राष्ट्रांच्या बाजूने कुरबुरी वाढू लागल्या. त्याचा परिणाम म्हणून शेवटी बर्लिनची भिंत बांधण्यात आली. पण ही भिंत बांधल्यानंतर अनेक बुद्धिमान तरुण, प्रज्ञावंत पळून गेले. आपले भविष्य त्यांना इथे सापडत नव्हते. अशांसाठी मग जी. डी. आर. च्या सरकारने नवनव्या आकर्षक शिष्यवृत्ती, सवलती, कल्याणकारी योजना सुरू केल्या आणि जवळपास गेल्या पंधरा वर्षांत 'ब्रेन ड्रेन' चा प्रश्न संपुष्टात आला. हा प्रश्न जर उग्र बनला असता, तर बर्लिनच्या पूर्व आणि पश्चिम भागाच्या एकत्रीकरणाचा नव्याने विचार सुरू झाला असता, असे जी. डी. आर. च्या पत्रकार संघटनेचे सेक्रेटरी कूर्ट होगेल यांना वाटते. भारत आणि जी. डी. आर या दोन्ही देशांचे अनेक प्रश्न सारखेच आहेत असे यांनी सांगितले. या दौऱ्यामुळे या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी चांगले वातावरण निर्माण होऊ शकेल, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

आम्हा पत्रकार सदस्यांचा परिचय ते करून घेत असताना माझी पाळी आली. मी पुण्यातून निघणाऱ्या 'सकाळ'मध्ये काम करतो असे सांगितल्यावर श्री. होगेल हसले. त्यांनी सांगितले की, पाच– सहा वर्षांपूर्वी मी तुमच्या दैनिकाला भेट देण्यासाठी पुण्यात आलेलो होतो. 'सकाळ'चा आणखी एक प्रतिनिधीही आल्याचे मी सांगितल्यावर त्यांनी समाधान व्यक्त केले. हा बर्लिन भेटीतला एक चांगला क्षण होता.

बर्लिन येथील आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटनेच्या कार्यालयातच आमची पूर्व जर्मनीच्या परराष्ट्र मंत्रालयातील अधिकाऱ्यांशी चर्चा झाली. या चर्चेत मुख्यतः भारताच्या संदर्भात श्री. शुल्टझ् आणि डॉ. क्लेईन वॉछटर यांनी भाग घेतला. दुभाषा म्हणून सौ. म्युझेल काम पाहात होत्या. समाजवादी विचारप्रणाली समोर ठेवून आमची परराष्ट्र नीती आखली जाते असे मत या अधिकाऱ्यांनी या चर्चेत व्यक्त केले.

आमच्या परराष्ट्र नीतीचा भाग म्हणून खंडीय आणि सर्व समावेशक आंतरराष्ट्रीय सुरक्षा प्रणाली तयार व्हायला हवी असा आमचा प्रयत्न आहे, असे चर्चेत सांगण्यात आले.

आता युद्धाचे निमित्तही जर्मनीतून उद्भवू नये म्हणून आम्ही प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहोत असे सांगून हा अधिकारी वर्ग म्हणाला की, युद्ध होऊ नये याची ऐतिहासिक जबाबदारी आम्हाला पार पाडायची आहे. आमच्याकडे आम्ही इतकी कमी लष्करी शक्ती ठेवली आहे की, त्यामुळे आम्हाला एखाद्याविरुद्ध युद्धप्रवृत्त होण्याचा विचारही मनात येऊ नये! त्यादृष्टीने जर्मनीचे दोन भाग जे झाले आहेत, ते इथली शांतता जोपासली जाण्याच्या दृष्टीने पूरक आहेत असे त्यांना वाटते. अलीकडे जी. डी. आर. आणि एफ. आर. जी ( फेडरल रिपब्लिक ऑफ जर्मनी ) या दोन्ही देशांत निःशस्त्रीकरण, अण्वस्त्रांना विरोध यासंबंधी मोठ्या प्रमाणात देवाणघेवाण चालू आहे.

शांतता आंदोलनाचा भाग म्हणूनच पूर्व जर्मनीने भारताने पुढाकार घेतलेल्या अलिप्तता चळवळीचे स्वागत केले आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर शांतता प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नांना वेग आला असे हे अधिकारी सांगत होते. याच संदर्भात भारताशी जी. डी. आर. ने विज्ञान– तंत्रज्ञान, संशोधन, व्यापार, सांस्कृतिक देवाण–घेवाण सुरू केली आहे. जी. डी. आर. तर्फे अनेक शिष्टमंडळे आता भारताला भेट देऊ लागली आहेत.

पोलंडप्रमाणेच बर्लिन शहरातही फिरताना कुठेच जाहिराती दिसल्या नाहीत. फक्त ओर्वो फिल्म तयार करणाऱ्या कारखान्याची इमारत याला अपवाद, तिथे याच फिल्मची जाहिरात होती. अलेक्झांड्रा प्लेस हा इथला मध्यवर्ती भाग. तिथे मधोमध उडणारी कारंजी आणि त्याच्यापुढे गेले की, टीव्ही टॉवर. अतिशय नयनरम्य असा हा परिसर. हे संपूर्ण शहर पर्यावरणाचे आदर्श रूप आहे. रस्त्याच्या कडेला हिरवीगार झाडी, जिथे सरोवरातून विहार चालतो, तिथे दोन्ही बाजूला दाट झाडी आणि देखणी वास्तूशिल्पे! रशियन वीरांच्या युद्ध स्मृती इथेही आहेत. रशियन बनावटीचा माल येथेही मोठ्या प्रमाणावर येतो आणि मार्क्सवाद ही इथली एक प्रमुख विचारप्रणाली आहे.

पुनः एकदा इथल्या स्वातंत्र्याचा प्रश्न समोर आला आणि भाषेचा अडसर आडवा! पण पोलंडपेक्षा इथले समाजजीवन गुणात्मक दृष्ट्या अधिक उंच आणि मोकळे वाटत होते! संप करण्याचा हक्क इथे आहे. आपले मत कोणत्याही विषयावर मांडण्याच्या हक्काला इथे प्रतिबंध नाही आणि निवडणुकीत लोकशाही प्रक्रियेने सहभागी व्हायला कोणताही नियम प्रतिबंध

करीत नाही. पोलंडच्या तुलनेत पोलिसांचा ससेमिरा इथे खूपच कमी वाटला. युरोपातील एका प्रगत, संपन्न राष्ट्राचे आपण नागरिक आहोत या आत्मविश्वासाचे, अभिमानाचे दर्शन येथील स्त्री– पुरुषांच्या वावरण्यात होत होते ! मुगल सरोवरातून बोटीने विहार करताना अनेक वृद्ध जर्मन ज्या थाटात कॅमेरा क्लिक करीत होते. ते दृश्यच मोठे सुंदर होते ! अनेक वृद्ध महिला आणि पुरुष या बोटीत मजेत बसले होते आणि बिअर किंवा आईस्क्रीमची गोडी चाखत खालच्या वरच्या डेकवर भटकत होते ! काही तरुणी आपल्या बच्चे कंपनीला खालच्या डेकवर बसवून वरच्या डेकवर सिगारेट पेटवून मनमुरादपणे ज़लविहाराचा आनंद घेत होत्या, तर बोटीच्या बाजूने काही छांदिष्ट मोटार लॉंच वेगाने नेत सर्वांना हॅलो करून पुढे जात होते ! जर्मनीला आज काय हवंय, त्याचं प्रतीक रूप त्या तीन तासांच्या जलविहारात थोडंस दिसू शकलं. या जलविहाराजवळच रशियन वीरांची युद्धस्मृती आहे. हा सगळा परिसरच घनदाट अरण्याचा आहे. इथले रस्तेही उंचच उंच वाढलेल्या इंग्लिश ओक वृक्षाच्या सावलीत पसरले आहेत !

आज बर्लिनला, जर्मनीला अशीच सावली हवी आहे ती केवळ विश्रांतीसाठी नव्हे ! तर अथक परिश्रम करून प्रगतीचा, विकासाचा हिमालय गाठण्यासाठी ! पोलंड आणि पूर्व जर्मनी येथून परतताना सतत वाटत होतं की, राष्ट्रउभारणीचा त्यांच्यासारखा आत्मनिर्धार आपण का करू शकत नाही.

□ □

# *आता युद्धाचे नावही नको!*

"आता पुनः कधीही युद्धाचे वातावरण जर्मनीत निर्माण होणार नाही. त्यादृष्टीने आमच्यावर असलेल्या ऐतिहासिक जबाबदारीचे क्षणमात्रही विस्मरण आम्हाला होणार नाही. कोणत्याही देशाविरुद्ध लष्करी कारवाई आम्ही करणार नाही. कोणत्याही देशाविरुद्ध प्रदेश बळकावल्याचा दावा आम्ही करणार नाही. अण्वस्त्रे बनवणार नाही आणि आमची लष्करी ताकदच आम्ही इतकी कमकुवत ठेवली आहे की, कोणत्याही देशाविरुद्ध आम्ही युद्धासाठी प्रवृत्तच होऊ शकणार नाही!"

पूर्व जर्मनीच्या (जर्मन डेमोक्रेटिक रिपब्लिक– जी. डी. आर) परराष्ट्र मंत्रालयातील अधिकारी आमच्याशी बोलत होते, तेव्हा जणू साऱ्या युरोप खंडाचंच मनोगत ते व्यक्त करीत होते!

शांतता प्रस्थापनेच्या या प्रयत्नात पूर्व जर्मनीने पश्चिम जर्मनीचेही सहकार्य मागितले आहे. ऑगस्ट १९८४ मध्ये पूर्व जर्मनीचे प्रमुख एरिक हचोनेकर यांनी पश्चिम जर्मनीला भेट दिली होती आणि दोन्ही देशांनी मिळून शस्त्रास्त्र स्पर्धा आणि अण्वस्त्राविरुद्ध ठाम भूमिका घेण्याचा निर्धार केला होता.

ज्यांच्या दोन पिढ्या दोन महायुद्धांत गारद झाल्या आहेत; त्या प्रत्येक जर्मन माणसाला युद्धाबद्दल निश्चित संताप आहे, चीड आहे, आणि मोर्चे, निदर्शने, चर्चा अशा विविध मार्गांनी तो आपल्या भावना, मते प्रगट करीत असतो. जून महिन्यात पश्चिम बर्लिनला भेट देण्यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रेगन आले होते. तेव्हा शेकडो तरुणांनी अण्वस्त्रासंबंधीच्या त्यांच्या धोरणाचा निषेध म्हणून निदर्शने केली. निदर्शकांवर पोलिसांनी लाठीमार केला. यातून एकच गोष्ट स्पष्ट झाली आहे व ती म्हणजे पश्चिम जर्मनीचा तरुण असो वा पूर्व जर्मनीचा, सर्वांना जगाच्या कोणत्याही भागात युद्ध नको आहे. सर्वदूर शांतता नांदावी यासाठी लोकमत तयार व्हावे म्हणून जर्मनीत सगळीकडे शांतता आंदोलने आकार घेत आहेत. तिसरे महायुद्ध होऊ नये म्हणून शांतता

प्रस्थापनेच्या या आंदोलनात त्यांना आपले प्राणही गेले तरी चालणार आहेत ....

कारण ... दुसरं महायुद्ध संपून चाळीस बेचाळीस वर्षे झाली आहेत! जपानवर पडला तसा अणुबॉम्ब जर्मनीतल्या शहरावर पडलेला नाही! पण तरीही ... नाझींनी केलेल्या नरसंहाराच्या भीषण कहाण्या सांगणारे 'सक्झनहौझन कॉन्सन्ट्रेशन कॅम्प' सारखे अनेक कॅम्प जर्मनीने शाबूत ठेवले आहेत! या कॅम्पमधून फिरताना, बराकी पाहताना, गॅस चेंबर्स पाहताना हृदयाचा थरकाप होतो आणि माणसावरचा विश्वासच उडून गेल्यासारखं होतं!

पूर्व बर्लिन शहरापासून पोट्सडॅमकडे जाताना वाटेत आम्ही ' ' सक्झनहौझन कॉन्सन्ट्रेशन कॅम्प' साठी थांबलो. तीन ते चार चौरस किलोमीटरच्या परिसरातील हा कॅम्प म्हणजे दुसऱ्या महायुद्धातील अमानुष कहाणीचे रक्तरंजित पान आहे! दारावर प्रवेशिका घेऊन आम्ही निघालो तेंव्हा कॅम्पमधील एक मार्गदर्शक आमच्यासमवेत आले आणि आम्ही चाळीस वर्षे मागे गेलो!

आज हा कॅम्प 'नॅशनल मेमोरिअल' (राष्ट्रीय स्मृतिस्थळ) म्हणून जतन करण्यात आला आहे. आणि आमच्या आठवडाभराच्या जा. डी. आर मधील मुक्कामात ज्या हिटलरचे नाव ऐकायला मिळाले नव्हते; त्याची सारी भुतावळ या कॅम्पमध्ये खदखदा हसत होती! आम्ही चरकून जात होतो. हिटलरने जे नाझींचे सामर्थ्य उभे केले, ते सारे जर्मन तरुणच होते ना? पण चाळीस वर्षांपूर्वीचे जर्मन तरुण आणि आजचे जर्मन तरुण यांच्या रक्तात इतका फरक कसा? आमचा मार्गदर्शक मित्र पीटर मे याच्या मते याचे कारण केवळ युद्ध हेच आहे! या कॅम्पच्या थिएटरमध्ये आम्ही नाझींनी केलेल्या अत्याचाराची आणि कॅम्पमधील भीषण संहाराची कहाणी पाहिल्यानंतर बाहेर पडलो, तेव्हा सारेचजण बधिर झालो होतो! तेव्हा पीटर म्हणाला की, अशा फिल्म्समुळे युद्धाची भीषणता समजते आणि शांतता का हवी याचे उत्तर मिळते! असे चित्रपट जर्मनीत सर्वत्र दाखवले जातात आणि ते पाहता पाहता प्रत्येक जर्मन तरुण अंतर्मुख होऊन शांती स्थापनेच्या आंदोलनाचा कट्टर समर्थक बनतो! पीटर म्हणाला, हे आज आमचे राष्ट्रीय स्मारक आहे खरे, पण आम्हाला जी हिटलरची स्मृतीही नकोशी वाटते, ती मात्र अशा कॅम्पमुळे उलट लोकांना पुन्हा स्मरते! पण आता त्याला इलाज नाही!

१९३६ च्या ऑलिंपिक स्पर्धा बर्लिन शहरात ऐन बहरात असतानाच त्या जागेपासून काही मैल अंतरावर या कॅम्पची उभारणी झालेली होती आणि तिकडे जर्मन खेळाडूंच्या गळ्यात पदके पडत होती, तर इकडे ज्यू कैदी ठार मारण्यात येत होते! एका माहितीनुसार या कॅम्पमध्ये दोन लाखांहूनही अधिक युद्धकैदी युद्धकाळात डांबून ठेवण्यात आले होते. त्यातील एक लाखांहूनही अधिक कैदी नाझींच्या विविध प्रकारच्या अत्याचारांनी मरण पावले! दुसऱ्या महायुद्धाच्या ६ वर्षांच्या काळात हिटलरने युरोपातील जो भाग जिंकला होता; त्या सर्व भागातील कॉन्सन्ट्रेशन कॅम्पसचे मुख्यालय या सक्झन हौझन कॅम्पमध्ये होते. त्यामुळे सर्वसामान्य कैद्यांबरोबरच विविध क्षेत्रांतील नामवंतांनाही या कॅम्पमध्ये डांबण्यात आले आणि त्यांची क्रूरपणे हत्या करण्यात आली. एके दिवशी ३३ पोलिश देशभक्तांना गोळ्या घालून ठार मारण्यात आले तर दुसऱ्या दिवशी ८१ डच पोलिसांना मारण्यात आले; इतक्या भीषण तऱ्हेने इथे नरसंहार चालू होता!

'सक्झनहौझन कॅम्प' ने सर्वसामान्य हजारो कैदी मारताना पाहिले, तसेच समाजाच्या विविध क्षेत्रांत ज्यांनी वरचे स्थान मिळवले आहे, अशांची भीषण अखेरही पाहिली! हंगेरीचा श्रमिकांचा नेता अल्पारी याला येथे गोळ्या घालून ठार मारण्यात आले. जॉर्ज ह्यूमन, बर्नहार्ड बास्तेलिन, मार्टिन झान्तेस, विल्यम गुडर्फ, मार्टिन वेस, गुस्ताव ब्रुहन, फ्रॅन्झ जेकब, अर्नेस्ट ट्रेनलर, मथाईस थीजन्, आंद्रे बगॅरॉन अशा अनेक जर्मन, रशियन, फ्रेंच नामवंतांना इथे क्रूरपणे ठार करण्यात आले.

कॅम्पमध्ये कैदी आल्यानंतर त्याचे हालहाल करून, त्याचा छळ करून, त्याला ठार करायच्या भीषण पद्धती नाझी एखाद्या सैतानासारखे राबवीत होते! या कॅम्पभोवतीच्या भिंतीला १८ टॉवर्स होते आणि प्रत्येक टॉवरवर ३ ते ४ शिपाई रात्रंदिवस मशीनगन घेऊन पहारा देत असायचे. याच्याच जोडीने तारेचे जे कुंपण होते, त्यातून वीजप्रवाह सोडलेला होता! चुकून कोणी बाहेर जायचा प्रयत्न केला तर तो साहजिकच मरण पावायचा! या प्रयत्नातही शेकडो कैदी मरण पावले! हे कुंपण आजही पाहता येते. आणि स्वातंत्र्यासाठी धडपडणाऱ्या त्या अनामिक लोकांची काय स्थिती होत असेल याची कल्पनाही करणे अशक्य होते!

हजेरी घेण्याच्या निमित्ताने येथील एका भागात सर्व कैद्यांना एकत्र उभे करण्यात येई. त्यात वृद्ध असत, तरुण असत, पण कोणाची दाद घेता यायची नाही. एखादा कैदी जर पळून गेला असेल तर तो सापडेपर्यंत सर्वांना या भागात उभे केले जायचे. १९४० मधील नोव्हेंबर महिन्यात एके दिवशी अतिशय प्रतिकूल वातावरणात कॅम्पमधील सर्व कैद्यांना सतत २० तास उभे राहावे लागले होते ! याच ठिकाणी सार्वजनिकरीत्या फासावर लटकावण्याची शिक्षा अंमलात येत असे.

यापेक्षाही भीषण पद्धत होती ती खडबडीत रस्त्यावरून कैद्यांनी अनवाणी जायची ! आम्ही कॅम्पच्या त्या रस्त्यावरून चाललो होतो, की ज्या रस्त्यावर शेकडो कैद्यांच्या रक्ताचे सिंचन झालेलें होते ! आमच्या पायात बूट–मोजे होते ! आणि त्यांच्या ? आमच्या गाईडने सांगितले की, हा आहे नाझींनी तयार केलेला 'शू टेस्टिंग ट्रॅक' दररोज सुमारे १५० कैद्यांना या रस्त्यावरून चालत जावे लागायचे आणि जवळपास ४० किलोमीटर त्याने चाललेच पाहिजे असा दंडक होता ! हा रस्ता कसला होता ? सिमेंट, निखारा, वाळू, फोडलेला दगड, काचा, अंगालाही टोचतील असे जाडे भरडे दगड यांचा हा रस्ता होता. आणि ह्या रस्त्यावरून चाळीस–चाळीस किलोमीटर चालत जाण्याची जीवघेणी शिक्षा त्यांना भोगावी लागायची !

१९४४ साली या शिक्षेत आणखी भर घालण्यात आली. या ट्रॅकने चालणाऱ्या माणसाच्या पाठीवर २० किलो वाळू भरलेले पोते देण्यात येऊ लागले आणि कॅम्पमधल्या बळींची संख्या वाढतच गेली !

नरसंहाराचे विभिन्न स्वरूपाचे भीषण मार्ग शोधणाऱ्या नाझींनी १९४३ साली या कॅम्पमध्ये गॅस चेंबर सुरू केले ! गॅस चेंबरची जागा आम्ही पाहिली, तेव्हा शरमेने आम्ही खाली माना घातल्या ! गाईडने सांगितले की, एकेकावेळी ४/५ जणांना चेंबरची जागा कशीबशी पुरत असे ! पण नाझी या अरुंद कोठड्यात ८-१० जणांना ढकलत असत ! त्यांच्यासाठी केलेली दफनाची जागाही शेजारीच होती ! आम्ही सर्वजण त्या अनामिक युद्धकैद्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी थोडा वेळ स्तब्ध उभे राहिलो आणि पुढे निघालो !

बराकीतून आम्ही फिरू लागलो, तेव्हा तिथल्या निष्कृष्ट व भीषण राहणीमानाची कल्पना आली. ज्या बराकीत जेमतेम १५० लोक राहू शकतील,

तिथे ५०० कैदी डांबून ठेवले जात होते ! यात हिटलरच्या वंशश्रेष्ठत्वाचे बळी असलेले ज्यू तर बहुसंख्य होतेच, पण युरोपातील जवळपास सर्व देशांतील युद्धकैदी आपली मृत्युघंटा ऐकत अडकून पडले होते ! यातल्या काही बराकी या आजारी कैद्यांसाठी होत्या खऱ्या, पण त्यांना आजारातून मुक्त करण्याऐवजी कायमचेच मुक्त करण्यात येत असे ! १९४२ साली हिवाळ्यात या आजाऱ्यांच्या बराकीतले १२२९ कैदी उपचारांअभावी, कमालीच्या निष्काळजीपणामुळे मरण पावले !

या बराकींच्या शेजारच्या भागात दुसऱ्या महायुद्धासंबंधीचे छायाचित्र प्रदर्शन होते. त्यात पहिल्यांदाच हिटलर, मुसोलिनी यांचे फोटो दिसले. ज्यूंचा नाझींनी कसा छळ केला; त्याचे थरकाप उठविणारे काही फोटो होते. कैद्यांना कपडे कोणत्या दर्जाचे मिळायचे; त्याचे नमुने कपाटात टांगलेले होते. जे आम्ही कधी अंशतःही अनुभवलं नाही; त्याच्या दाहक खुणा असलेल्या एका मोठ्या केंद्रात आम्ही फिरत होतो.

हा कॅम्प सोविएत सैनिकांनी १९४५ मध्ये मुक्त केल्याची कथाही भीषण आहे ! सोविएत सैन्य आगेकूच करीत बर्लिन शहरात येत आहे अशी माहिती नाझींना लागल्यानंतर त्यांनी एक भयानक डाव रचला. जवळपास ३० हजारांहून अधिक युद्धकैद्यांना कॅम्पमधून बाहेर आणण्यात आले. ( २१ एप्रिल ४५ ) ५००/५०० च्या गटाने हे कैदी चालत निघाले. या कैद्यांना बाल्टिक समुद्रापाशी न्यायचे, तेथे जहाजात कोंबायचे आणि मग हे जहाजच समुद्रात ढकलायचे अशी ही योजना होती. आपले प्राण अक्षरशः तळहातावर घेऊन हे युद्धकैदी निघाले तेव्हा जणू एखाद्या सैतानाचेच साम्राज्य सुरू झाले असावे ! कारण सतत चालण्यामुळे कोणी एखादा चक्कर येऊन, शुद्ध हरपून पडला की त्याला गोळी घालून ठार मारण्यात येई. शेकडो माणसे मरण पावली. बळींची संख्या वाढत चालली.

ब्रॅण्डेनबर्ग आणि मॅक्लेनबर्गच्या रस्त्याने हे सर्व शरणार्थी, असहाय लोक चालले होते. मॅक्लेनबर्गच्या खालच्या बाजूस असलेल्या एका जंगलात सर्व कैद्यांना थांबावे लागले आणि तासाभरातच सोविएत सैन्याने त्या सर्वांना मुक्त केले. ( १ मे १९४५ ) तिकडे कॅम्पही सैनिकांनी ताब्यात घेतला होता. सुमारे ३००० रुग्ण कैदी ( त्यात १४०० महिला ) तिथे उरले होते. सोविएत आणि

पोलिश डॉक्टरांनी त्यांच्यावर लागलीच उपचार सुरू केले!

आम्ही शेवटी कॅम्पमधून बाहेर आलो, तेव्हा अनेक युरोपीय मुले-मुली हातात पुष्पगुच्छ घेऊन कॅम्पमध्ये प्रवेश करीत होती! त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव जणू सांगत होते, आता पुनः कधीही 'सक्झन हौझन कॅम्प' नको! ही केवळ स्मृती राहावी, भविष्य नाही!

जिथे 'सक्झन हौझन कॉन्सन्ट्रेशन कॅम्प' ची भीषण कहाणी संपते; त्यानंतर लगेच सुरू होते पोट्सडॅम येथील शांतीचे पर्व. आम्ही आता पोट्सडॅमकडे निघालो होतो हिरव्यागार आणि प्रासादांच्या नगरीकडे, दुसरे महायुद्ध संपल्यानंतर जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी इंग्लंड, अमेरिका आणि रशियाच्या प्रमुखांनी जेथे ऐतिहासिक करार केला; त्या शांती नगरीत आम्ही प्रवेश करीत होतो.

पोट्सडॅममधील सिसिली राजवाड्यात हा ऐतिहासिक करार झाला. छोट्या वाटा, मोठे रस्ते गर्द वृक्षांनी झाकलेले आणि या ऐतिहासिक वास्तूभोवती रंगी-बेरंगी फुलांचे ताटवेच बहरलेले! या राजवाड्याचा काही भाग पर्यटकांसाठी वापरण्यात येतो. पुन्हा कधी येथे आलात तर या भागात राहा, असे जाता-जाता पीटरने सुचविले. पण परत यावे अशीच ही वास्तू आहे.

इंग्लंडचे युद्धकाळातील पंतप्रधान सर विन्स्टन चर्चिल, युद्धोत्तर काळातील पंतप्रधान ॲटली, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रूझवेल्ट आणि ट्रूमन, रशियाचे प्रमुख स्टालिन यांच्या चर्चा आणि बैठका ज्या राजवाड्यात झाल्या, तो परिसर आम्ही पाहत होतो. विसाव्या शतकाच्या इतिहासात ज्यांची नावे अढळ आहेत, असे हे सारे कर्तबगार नेते जिथे बसत होते; तो हॉल आम्ही पाहत होतो.

या राजवाड्याभोवती अनेक अगम्य, परस्परविरोधी घटनांचा इतिहास गुंफलेला आहे. सिसिलीच्या या राजवाड्याचा एके काळचा राजपुत्र विल्यम हा हिटलरच्या आगमनासाठी प्रयत्नशील राहिला होता. त्याने हिटलर निवडून यावा म्हणून प्रयत्न केले आणि नाझींचा उदय हा या प्रिन्स विल्यमने हिटलरमागे उभे केलेल्या जनमताचाही लक्षणीय असा परिणाम मानला जातो. त्याच या राजवाड्यात नाझींविरोधी शक्तींचा तीन मोठ्या राष्ट्रांचा फॅसिझमला संपविणारा ऐतिहासिक करार करण्यात आला. हिटलरविरोधी फळी उभारण्याचा


६९६ २६९.०५ ३/७/८०

आंतरराष्ट्रीय स्तरावरचा प्रयत्न १९४३ मध्ये पहिल्यांदा झाला आणि त्याची फलश्रुती पोट्सडॅम करारात झाली.

सिसिली राजवाड्यातील ३६ खोल्या कराराच्या संदर्भात येणाऱ्या या तीन राष्ट्र- प्रमुखांच्या दिमतीसाठी सजविण्यात आल्या होत्या. पोट्सडॅममधील सुरक्षित राहिलेल्या अन्य काही सुप्रसिद्ध राजप्रसादांमधून उत्तम दर्जाचे फर्निचर या राजवाड्यात आणण्यात आले होते. तिन्ही राष्ट्र– प्रमुखांची व त्यांच्या बरोबरच्या शिष्टमंडळाची राहण्याची व्यवस्था पोट्सडॅमधीलच शाही प्रासादात करण्यात आली होती.

१७ जुलै ते २ ऑगस्ट या दरम्यान करारासंबंधी बैठकी चालू होत्या. सुरुवातीस या कराराचे वर्णन ' थ्री पॉवर्स कॉन्फरन्स ऑफ बर्लिन ' असे केले जात होते. पण पुढे इतिहासात ' पोट्सडॅम कॉन्फरन्स ' असे नोंदविण्यात आले. दुसरे महायुद्ध सुरू होण्याची पार्श्वभूमी, त्यामुळे झालेली प्राणहानी, वित्तहानी आणि पोट्सडॅम करारापर्यंतची वाटचाल दाखविणारी छायाचित्रे या राजवाड्यात पाहताना त्या इतिहासाची पानेच उलटली जात असतात ! एका ठिकाणी फलकावर पोलिश, जर्मन, रशिया, अमेरिकन, इंग्रज, जपान, फ्रेंच यांचे किती सैन्य युद्धात मरण पावले याची ठळक नोंद दिलेली आहे. २० हजार भारतीय सैनिक मरण पावल्याची नोंद इथेच आहे. सैनिक आणि नागरिक मिळून ११ कोटी मृत्यू झाल्याची ही नोंद म्हणजे जगाच्या इतिहासातले सर्वांत भीषण रक्तरंजित पर्व म्हटले पाहिजे. यात रशियातील बळी सर्वाधिक म्हणजे तिथले २ कोटी लोक मृत्युमुखी पडले आहेत. पोलंडमधील ६० लाख लोक यात मेले, त्यातील ३० लाख ज्यू होते.

जर्मनीच्या अस्तित्वाचाच प्रश्न खरं तर या कराराच्या चर्चेत केंद्रबिंदू ठरला होता. इंग्लंडचे पंतप्रधान चर्चिल यांनी हा करार करण्यासाठी पुढाकार घेतला होता. त्यांनी आणि पुढचे पंतप्रधान ॲटली यांनी, तसेच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट यांनी जर्मनीच्या विभक्तीकरणाची वेगवेगळी योजना मांडली होती. परंतु स्टालिन यांनी ती फेटाळली आणि जर्मनीचे असे तुकडे केले जाऊ नयेत तर एक स्वतंत्र, लोकशाही राष्ट्र म्हणून ते उभे केले जावे अशी भूमिका घेतली. ही त्यांची भूमिका जर्मनीसंबंधीच्या प्रश्नाबाबत अमेरिका व इंग्लंडच्या दोनही प्रमुख नेत्यांनी करारात मान्य केली.

हा करार करण्यापूर्वी तिन्ही राष्ट्रप्रमुखांच्या एकूण १३ बैठकी झाल्या. १७ ते २५ जुलैपर्यंतच्या बैठकीत चर्चिल पंतप्रधान म्हणून सहभागी झाले होते. या काळात ॲटली त्यांच्यासमवेत निरीक्षक म्हणून बसायचे. २८ जुलै रोजी ॲटली हे सत्तारूढ मजूर पक्षाचे नेते म्हणून निवडले गेले आणि कराराच्या वेळी इंग्लंडच्या वतीने त्यांनी स्वाक्षरी केली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट होते; त्यांच्या जागी आलेले हॅरी ट्रूमन यांनी अमेरिकेच्या वतीने करारावर स्वाक्षरी केली. ते या बैठकीचे अध्यक्षही होते. रशियाच्या वतीने आरंभापासून ते स्वाक्षरी करेपर्यंत स्टालिन होते.

स्टालिन यांच्याबरोबर असलेल्या शिष्टमंडळातील एकाचा फोटो गाईडने आम्हाला दाखविला व त्याने विचारले, हे कोण माहिती आहे काय ? आम्ही डोके खाजविले आणि उत्तर सापडले, आंद्रे ग्रोमिको! रशियाचे दिवंगत परराष्ट्रमंत्री ग्रोमिको त्या फोटोत तरूण आणि थोड्या किरकोळ प्रकृतीचे दिसत होते. अमेरिकन शिष्टमंडळाबरोबर रशियाचे राजदूत म्हणून ते काम पाहत होते.

२ ऑगस्ट १९४५ रोजी या राजवाड्यातील 'ग्रेट हॉल' मध्ये टेबलावर पोट्सडॅम करारावर तीन बड्यांनी स्वाक्षऱ्या केल्या. या काळात फ्रान्सचे प्रतिनिधी एक निरीक्षक म्हणून उपस्थित होते. फ्रान्स सरकारने पोट्सडॅम करार मान्य असल्याचे ७ ऑगस्ट १९४५ रोजी जाहीर केले. ज्या टेबलावर करार झाला; ते टेबल आज या हॉलमध्ये सुरक्षित व सुंदर जपून ठेवण्यात आलेले दिसते. इंग्लंड, अमेरिका, रशिया या तिन्ही देशांचे ध्वज गोलाकार टेबलाच्या बरोबर मध्यभागी आहे. हॅरी ट्रूमन, स्टालिन आणि ॲटली ज्या खुर्च्यांवर बसले होते; त्या तशाच ठेवण्यात आल्या आहेत. या हॉलच्या डावीकडील भिंतीवर या तिघांचा एक हसरा ग्रुप फोटोही टांगलेला आहे. उंच छताला असलेली झुंबरे, नक्षीदार सुबक अशा स्वरूपाचे सर्व छत, भिंती, दरवाजे यामुळे या हॉलचे सौंदर्य नजरेत भरणारे आहे.

कराराची पूर्वतयारी म्हणून तिन्ही राष्ट्रांची शिष्टमंडळे या राजवाड्यातील एकेका स्वतंत्र दालनात चर्चेसाठी बसत असत. ही तिन्ही दालने उत्कृष्ट प्रकारच्या फर्निचरने सजविलेली होती. आजही ती पाहताना भान हरपते, इतकी त्याची कलात्मकता उच्च दर्जाची आहे. रशियन शिष्टमंडळ ज्या दालनात बसत होते; तेथील फायरप्लेसभोवतीची टाईल्स हॉलंडहून आणून बसविलेली

होती. या फायरप्लेससमोरील टेबलाशी बसून स्टालिन आपले काम करीत असत. तीनही देशांच्या दालनात जी लायब्ररी आहे; ती येथील मूळचीच आहे, असे गाईडने सांगितले. ट्रूमन ज्या दालनात बसत, तेथून कराराच्या 'ग्रेट हॉल' मध्ये जाण्यासाठी सरळ रस्ता होता. जर्मनीचे विभक्तीकरण कसे करता येईल, याचे नकाशेच या दालनात लावलेले होते. आजही ते लक्ष वेधून घेतात.

साऱ्या जगाचे लक्ष घेणाऱ्या या कराराचे वृत्त टिपण्यासाठी जे पत्रकार आले होते; त्यांतील दोघांची नोंद जगाच्या इतिहासात सन्मानाने झाली आहे. एक म्हणजे रशियाचे नामवंत लेखक बोरिस पेप्लिवॉय आणि दुसरे म्हणजे अमेरिकेचे भावी राष्ट्राध्यक्ष जॉन एफ्. केनेडी.

नाझी गुन्हेगारांना कडक शासन देण्याची मागणी करणारे, विस्कळीत झालेल्या जर्मन लोकसंख्येची एकसंध व्यवस्था करण्यासाठी प्रयत्न करणारे असे विविध स्वरूपाचे उपाय योजून पोट्सडॅम करार झाला खरा; पण त्यामुळे सारे काही आलबेल थोडेच होते ?

जागतिक सत्तास्पर्धेतील एक भीषण डाव या करारानंतर खेळला गेला. दुसरे महायुद्ध संपविण्यासाठी अणुबॉम्ब वापरावा लागला, असे प्रतिपादन अमेरिकेच्या बाजूने करण्यात येत असले तरी आपले सामर्थ्य दाखविण्यासाठी हिरोशिमावर अणुबॉम्ब टाकण्यात आला, असेही म्हटले जाते. पोट्सडॅम कराराच्या दुसऱ्या दिवशी अणुबॉम्ब टाकण्यासंबंधीचा आदेश ट्रूमन यांनी याच शांतिनगरातून दिला. तीन लाख लोक या स्फोटात मरण पावले! साऱ्या जगाला जणू पुन्हा नव्याने शांततेचे महत्त्व पटले आणि दुसऱ्या महायुद्धाची धुगधुग अखेर या तीन लाखांच्या बलिदानाने संपली!

सक्झन हौझन कॉन्सन्ट्रेशन कॅम्प आणि पोट्सडॅम या दोन्ही ठिकाणी घडलेला इतिहास पूर्व जर्मनीच्या दृष्टीने मोठा मार्गदर्शक ठरला आहे आणि म्हणूनच या छोट्या परंतु कर्तबगार देशाने शांतता आणि पर्यावरण यांची सांगड घातली आहे.

जी. डी. आर च्या मंत्रिमंडळातील पर्यावरण संरक्षणमंत्री डॉ. हान्स रेइश्लेट यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना म्हटले,

‘‘सर्व जगात तणाव निर्माण झालेला असताना निसर्ग आणि पर्यावरणाचे रक्षण म्हणजेच शांततेची हमी, असे आम्हाला वाटते. पर्यावरण रक्षण व संवर्धनाच्या धोरणाचा अंमल करण्यासाठी आम्हाला हवी आहे शांतता. आज मानवी जीवन, आपले आरोग्य, आपली संस्कृती, पर्यावरण या सर्वांवर शस्त्रास्त्र– स्पर्धेमुळे दबाव येत आहेत. अंतराळ– युद्धाच्या वल्गना केल्या जात आहेत. क्षेपणास्त्रे आणि अण्वस्त्रे आपल्या निसर्गाचा नाश करण्यासाठी तयार आहेत ! रासायनिक अस्त्रे वापरून माणसाला जगणे असह्य करून सोडले जात आहे. अण्वस्त्रांचा वापर हा आपल्या जगाचा सुंदर लॅण्डसकेप, भस्मीभूत करणारा महत्त्वाचा कारक ठरेल. त्यासाठी आताच परस्पर सहकार्य करून संभाव्य विनाश टाळला पाहिजे.’’

मंत्रिमहोदयांचं हे विधान थोडसं प्रचारीही वाटण्याची शक्यता आहे. पण पूर्व जर्मनीतील बर्लिन, लाईपझिंग आणि पोट्सडॅम या शहरांची सफर केली तर या देशाने पर्यावरणाचे किती आदर्श रूप साकार केले आहे, याची कल्पना येते आणि शांतता प्रस्थापनेच्या त्यांच्या आग्रही प्रतिपादनाचा अर्थ निश्चितच उमगतो; इतकं हे सारं स्पष्ट आहे.

## ‘आज मी मूक राहूच शकत नाही’

आज मी मूक राहूच शकत नाही
आनंदानं माझं हृदय उचंबळून आलंय इथं...
ह्या अवस्थेतसुद्धा मी मूक राहू शकत नाही.
कारागृहाच्या ह्या भिंतींना भेदून जाणारा माझा आनंद....
सगळं वातावरणच आनंद संगीतानं भारलंय आज मी साऱ्या जगाला ओरडून सांगू इच्छितो ‘‘तुम्ही या, आणि ऐका. आम्ही तुमच्या अगदी जवळ आहोत.’’
ह्या यातनाघरातही माझा आतला आश्वासक आवाज मला ग्वाही देतोय.
‘‘बाहेर जग सुखरूप आहे. स्वतंत्र आहे.’’
माझ्या आवाजाचा क्षीण प्रतिध्वनी त्यांच्यापर्यंत लवकर पोहोचू दे. कारण, आता आम्ही विझत आलोय.
पण.....

आपल्या शत्रूला आम्ही नामोहरम केलंय. संपवलंय.
मी मूक कसा राहू ?
....कारागृहाबाहेर वसंत फुललाय....
रशियात... माझ्या 'मायभूमीत हिरवी शेतं बहरली असतील अन्
तरुण-तरुणी त्यात राबत असतील
आता... आमच्यासाठीही स्वच्छ प्रकाश पसरलाय,
ऊर्ध्वदिशेकडे नेणारा

(१९५८ मध्ये 'सक्झनहौझन कॉन्सन्ट्रेशन कॅम्प' मध्ये ४० कवितांची एक वही सापडली होती. ज्या रशियन कैद्याची ही वही होती, तो अजून अज्ञातच आहे. जर्मन भाषेत असलेल्या या कवितेचे अभिजात व अभिव्यक्ती सावरकर यांनी केलेले हे रूपांतर. त्या कवीचे नाव आजही अज्ञात असले तरी या कवितेतील भावना विश्वव्यापी आहेत, वेदनेची प्रतीती देणाऱ्या आहेत.)

□ □

# पर्यावरणाचे अभंग ‘लॅण्डस्केप’

बर्लिन ते लाईपझिंग ह्या सुमारे अडीचशे किलोमीटरचा आणि ॲमस्टरडॅम ते स्वित्झर्लंड हा सुमारे साडेआठशे किलोमीटरचा बसने केलेला प्रवास आजही माझ्या स्मरणात आहे तो दोन–तीन कारणांमुळे. एकतर या संपूर्ण प्रवासात एकदाही हॉर्न वाजवावा लागला नाही आणि दुसऱ्याही गाड्यांचे हॉर्न ऐकू आले नाहीत.

ॲमस्टरडॅमहून गाडी निघाल्यानंतर साधारणतः निम्मे अंतर कापल्यावर आम्ही जेवणासाठी थांबलो, तेव्हा बहुतेकांच्या मनात प्रश्न आला या गाडीला हॉर्न आहे की नाही, पण गंमत म्हणून देखील ड्रायव्हरने हॉर्न वाजविला नाही.

अतिशय गुळगुळीत सडका, प्रत्येक अर्ध्या एक किलोमीटरवर दिशा, पुढील गाव, पेट्रोल पंप, उपाहारगृहे, स्वच्छतागृहे, पार्किंग एरिया यांची माहिती देणाऱ्या पाट्या दर्शनी भागात लावलेल्या असत. छोट्या मोटारी, प्रवासी बसेस, दुचाकी वाहने यांना रस्त्यातील विशिष्ट लेनमधूनच जावे लागे. त्यामुळे सातत्याने वेग एकच ठेवता येई आणि ओव्हरटेक करून जाण्याचे पराक्रमही त्यामुळे होत नव्हते.

आपल्या पुण्यातील ८-१० किलोमीटरच्या प्रवासात घरून ऑफिसला जाताना आणि परतताना रिक्षा, बस, टेम्पो, स्कूटर्स, गाड्या यांचे अखंड वाजणारे कर्णकर्कश हॉर्नचे आवाज ज्यांनी ऐकले आहेत आणि सहन केले आहेत अशा आमच्यासारख्या अनेक भारतीयांना पूर्व आणि पश्चिम युरोपातील शेकडो किलोमीटर्सच्या प्रवासात हॉर्न ऐकू आला नाही याचे खरोखरच नवल वाटले.

या प्रवासात पदोपदी जाणवत होतं की, आपण भारतात प्रवास करीत नाहीये. विद्यापीठ रस्त्याने दहा-पंधरा मिनिटे स्कूटरवरून जाण्याची एखादा आठवणही अंगावर शहारे आणणारी असायची! मेहेंदळे गॅरेजवरून गणेशनगरपर्यंत आपण रोज कसा जीवघेणा प्रवास करतो याचं तर या प्रवासात

मला कोडंच पडलं होतं.

हा संपूर्ण प्रवास संस्मरणीय ठरला तो आणखी एका कारणामुळे. आम्ही ज्या रस्त्यावरून जात होतो, शेकडो वाहने ज्या रस्त्यांवरून पळत होती, ते रस्ते आणि भोवतालचा निसर्ग याचं एक नातं होतं. हे सुंदर रस्ते सर्व बाजूंनी सौंदर्याचा पिसारा फुलविणाऱ्या निसर्ग पक्ष्याचे जणू पंख झाले होते. इतके लांबलचक आणि चौपदरी रस्ते असूनही विश्वकर्म्याच्या 'लॅण्डस्केप'वर ओरखडा उठला नव्हता. बर्लिन ते लाईपझिंग या प्रवासात हे लॅण्डस्केप जितकं सुंदर वाटलं, दिसलं त्याहूनही त्याचं अनोखं सौंदर्य स्वित्झर्लंडच्या प्रवासात डोळ्यांनी टिपलं आणि खऱ्या अर्थानं साऱ्या विश्वाशी प्रत्येक प्राणिमात्राचे जे एकसंध असे अनुबंध असतात ना, त्याचा साक्षात्कार आम्हाला या प्रवासात होत होता.

प्रत्येक स्थानिक भागात तेथील लोकांना मोकळ्या वेळेत फिरायला मिळावे, आनंद मिळावा म्हणून काही बागा, सुंदर ठिकाणे तयार करण्याचे प्रयत्नही येथे यशस्वी झाले आहेत आणि त्याचा उपभोग सर्वजण घेत आहेत.

कोणत्याही देशाशी युद्धाचा विचारही न करता, शेजाऱ्याशीही न भांडता येथील लोकांनी आपली सारी ताकद निसर्गाच्या संवर्धन, समृद्धीत एकवटली आहे. येथील शिक्षणपद्धतीतदेखील पर्यावरणाचा समावेश करण्यात आला आहे. निसर्गाचे प्रेम फुलण्यासाठी, रुजण्यासाठी लहाणपणापासून अनेक स्वयंसेवी गट इथे कार्यरत असतात.

त्यादृष्टीने 'सेंट्रल ट्रेनिंग एस्टॅब्लिशमेंट फॉर नेचर कॉन्झर्वेशन' ही जी. डी. आर. मधील संस्था युरोपात असाधारण महत्त्व असलेली आहे. दरवर्षी हजारो निसर्गरक्षकांसाठी ही संस्था प्रशिक्षण कार्यक्रम राबवीत असते. हे कार्यकर्ते खेडेगावात राहतात, काम करतात. शाळांमधून, कारखान्यांमधून ते जातात आणि पर्यावरणाचे महत्त्व पटवून देतात. या कार्यकर्त्यांचा कामाचा पुरावा उपलब्ध आहे. १९४५ मध्ये १४० वने होती, तिथे आता सुमारे ८०० वने निर्माण झाली आहेत. त्यांच्याच प्रयत्नातून प्राण्यांच्या आणि वनस्पतींच्या नवनव्या जातीही उजेडात आल्या आहेत. पर्यावरण धोरण कायद्यातील तत्त्वे समोर ठेवून निसर्गरक्षणाच्या नवनव्या मोहिमा हे कार्यकर्ते सुरू करून लोकांना त्यात सहभागी करून घेतात.

येथे मॉंटेसरीच्या वर्गापासून पर्यावरणरक्षणाचे महत्त्व बालमनावर बिंबविणारे उपक्रम राबवले जातात. निसर्गरक्षणाचे महत्त्व सांगणारे पाठ मुलांना सांगितले जातात. शिवाय पर्यावरण कसे महत्त्वाचे आहे याचे सूचन असणारे खेळही अभ्यासाचा भाग म्हणून खेळले जातात. शाळेत जाणाऱ्या मुलांसाठी वनस्पतिशास्त्र, भूगोल, स्थानिक इतिहास, पदार्थविज्ञान, तांत्रिक शिक्षण या विषयांच्या अभ्यासात पर्यावरण, निसर्गरक्षण हे भाग त्या त्या विषयाशी एकरूप करून शिकवले जातात. शिवाय शाळेतील उद्यानात मुलांना प्रत्यक्ष काम करण्याची संधी मिळते आणि अभ्यासाहून असा हा प्रत्यक्ष अनुभव मोलाचा ठरतो.

निसर्गविज्ञान आणि तंत्रज्ञानाची आवड असणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांसाठी काही हौशी मंडळेही काम करीत असतात. या उपक्रमाचा एक भाग म्हणून ११ वी व १२ वीतल्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षक आणि या सोसायटचांचे कार्यकर्ते यांच्या मार्गदर्शनाखाली छोटे छोटे संशोधनप्रकल्प आखले जातात. असे संशोधन प्रकल्प या मुलांचे वैकल्पिक अभ्यासविषय असतात. त्यात स्थानिक भागातील एखाद्या कारखान्यात किंवा शेतावर जाऊन पर्यावरण संरक्षण करण्याबाबतचा प्रत्यक्ष अनुभव ही मुले घेऊ शकतात.

इंजिनिअरिंग, औद्योगिक, आर्थिक, शेतीविषयक शिक्षण देणाऱ्या शाळा–कॉलेजामधून पर्यावरणाची मूलतत्त्वे शिकविली जातात. त्यातही उद्योग–धंद्यातील टाकाऊ घटक पुन्हा कसे उपयोगात आणायचे यासंबंधी विशेष मार्गदर्शन करण्यात येते. पर्यावरण संरक्षण आणि व्यवस्थापन शिकविणाऱ्या शाखा सर्व विद्यापीठांत आणि तांत्रिक विद्यालयांत कार्यरत आहेत. ड्रेसडेन येथील तांत्रिक विद्यापीठ आणि मॅसबर्ग येथील तांत्रिक विद्यालय येथे दोन वर्षांचा पर्यावरण अभ्यासक्रम शिकविला जातो. ड्रेसडेनमध्ये तर शाळेतील विद्यार्थी दरवर्षी सुटीत जंगलात फिरतात आणि झाडांवरची पक्ष्यांची घरटी घट्ट बांधतात, जी मोडकळीला आली असतील तिथे नवी बांधून ठेवतात.

या संपूर्ण खंडात दळणवळणाच्या प्रचंड सोयी आहेत. रस्त्यावर ट्राम्स धावत असतात. रस्त्याखाली मेट्रो आहेत, सरोवरे, तलावातून जलविहाराचा आनंद देणाऱ्या सफरी आहेत. आणि हे सर्व असूनही निसर्गाचं संतुलन ढळलेलं

नाही. रेल्वे असो, मोटारींची गर्दी असो, कुठेही धुराचे लोट नाहीत, कुठेही कलकल नाही आणि हॉर्न सतत वाजवून पादचाऱ्याला दम देणारे आपल्यासारखे वाहनवीरही नाहीत! जणू जगातल्या शांततेला आपल्या अशा हॉर्न वाजवण्यानं हानी पोहोचेल, अकारण कलकल होईल इतक्या पातळीवर विचार करूनच इथले सारे वाहनचालक वाहने चालवीत असावेत, असं अनुभवाला येत होतं!

धूर नाही, हॉर्नचा आवाज नाही, लोकांची गडबडगर्दी नाही असं केवळ स्वप्नच पाहणाऱ्या आम्हा भारतीयांना युरोपातल्या या सर्व प्रवासात ते स्वप्न रोजच्या जीवनात साकारल्याचं प्रत्यक्ष डोळ्यांनी दिसत होतं. बर्लिनमधून वाहणारी स्प्री नदी, पॅरीसमधील सीन आणि लंडनमधील थेम्स नदी ... या सर्व नद्या आपला डौल कायम ठेवून वाहत होत्या. जिनिव्हातली सरोवरे तर जणू साऱ्या शहराला प्रदक्षिणा घालताहेत अशीच पसरली होती! या सरोवरातून बोटीने फिरण्याची मौज काही आगळीच! ॲमस्टरडॅमला बरेच हौशी लोक स्वतः होड्या घेऊन फिरतात! खुद्द बर्लिनमध्येही जलविहार करणारे हजारोंनी आहेत! स्वतःच्या बोटी किंवा मोटारलाँच घेऊन जलविहार करणाऱ्यांची नोंदणीसंख्या ५० हजारांच्या वर एकट्या बर्लिन शहरात आहे.

वीकएण्डला सुंदर निसर्गरम्य ठिकाणी जाण्यासाठी हजारो युरोपियन तत्पर असतातच! स्वतःच्या गाड्या घेऊन, मुलाबाळांना, मित्र–मैत्रिणींना घेऊन लाईपझिगच्या दिशेने जाणाऱ्या आणि स्वित्झर्लंडच्या दिशेने जाणाऱ्या या लोकांना पाहताना खरंच त्यांच्या भाग्याचा हेवा वाटला. ही सुंदर माणसं निसर्ग सुंदर राहावा, त्याचं सौंदर्य वर्धिष्णू व्हावं म्हणून खरंच प्रयत्नशील आहेत!

बोटीने जलविहार करताना कोणीही पाण्यात थुकणार नाही, रस्त्याने जाताना कोणीही पिचकारी मारणार नाही, चालत्या गाडीतून बेजबाबदारपणे जळती थोटके फेकण्याचे धाडस कोणी करणार नाही . . आणि म्हणूनच इथलं पर्यावरण एक आदर्श रूप आहे! इथला हिरवेपणा इथल्या जीवनात रुजला आहे, बहरला आहे!

पूर्व जर्मनी आणि पश्चिम जर्मनी यांचे राजकीय संबंध घरोब्याचे नसले तरी शातता प्रस्थापना आणि पर्यावरण या मुद्द्यावर त्यांनी सहकार्य करण्याचे

नुकतेच एका करारान्वये ठरविले आहे. पूर्व जर्मनीचे पर्यावरण धोरण आणि त्याची सफाईदार अंमलबजावणी पाहिली की, आपल्याही देशाने या चिमुकल्या देशापासून याबाबतीत वस्तुपाठ घेतला पाहिजे असे वाटू लागते.

राष्ट्रीय पातळीवर पर्यावरण धोरण आखणारे आणि त्याची अंमलबजावणी करणारे मंत्रालय पूर्व जर्मनीच्या सरकारने (जर्मन डेमॉक्रॅटिक रिपब्लिक–जी.डी.आर.) १९७१ मध्ये सुरू केले. व्यापक पातळीवरील आणि दीर्घकालीन असे पर्यावरण संरक्षण प्रकल्प या मंत्रालयाने आखले आणि कामाला आरंभ केला. जी.डी.आर.ने या प्रकल्पांची युद्धविरोधी, अण्वस्त्रविरोधी शांतता आंदोलनाशी गाठ बांधली आणि पर्यावरणविषयक धोरणाला व्यापक परिमाण प्राप्त करून दिले. मार्क्स आणि लेनिन यांच्या विचारप्रणालींचा आधार घेऊन राष्ट्रीय पर्यावरण धोरण आखण्यात येऊन शांतता आंदोलनाला पूरक स्थिती निर्माण करण्याची पावले उचलण्यात आली. सरकारने यासंबंधी कायदा करताना लोकांचा सहभाग घेतला. पर्यावरणविषयक १६०० सूचना आणि प्रस्ताव यांचा विचार करून जी.डी.आर. सरकारने पर्यावरण धोरण कायदा अंमलात आणला.

या कायद्याची अंमलबजावणी काटेकोरपणे केली जाते. त्यासाठी 'राष्ट्रीय पर्यावरण तपासणी प्राधिकरण' (नॅशनल एन्व्हॉयरॉनमेंटल इन्स्पेक्शन ॲथॉरिटी) स्थापन करण्यात आले. या प्राधिकरणाच्या प्रत्येक परगण्यात शाखा असतात. त्या काम पाहतात. ज्या कारखाने किंवा कंपन्यांनी आपले उत्पादनातील उत्सर्जित घटक योग्य प्रकारे बाजूला टाकले नाहीत व त्यामुळे प्रदूषणाला निमित्त झाले तर त्यांना ५० हजार मार्क इतका (जी.डी.आर.चे चलन) दंड या कायद्याने आकारला जातो. यातही जी व्यक्ती नेमकी जबाबदार असेल तिला १० हजार मार्क इतका जबरदस्त दंड भरावा लागतो. यामुळे साहजिकच कारखाने याबाबत अतिशय दक्ष असतात. खाण व्यवसाय करणाऱ्यांनाही जेवढा भूभाग ते यासाठी वापरतात, तेवढाच भूभाग त्यांना ठराविक काळात विकसित करून द्यावा लागतो आणि हे जर केले नाही तर दर हेक्टरी ७५०० मार्क त्यांना द्यावे लागतात.

पर्यावरणाचा विचार केवळ मंत्रालयापुरता वा अंमलबजावणी प्राधिकरणापुरता जी.डी.आर.च्या सरकारने ठेवलेला नाही. समाजाच्या सर्व

घटकांमध्ये त्याची चर्चा होते, सर्वांनी हा विचार आपला मानला आहे आणि आपल्या देशाच्या, जगाच्या भवितव्याशी त्याचा धागा जोडला आहे.

राष्ट्रव्यापी असलेली ' चेम्बर ऑफ टेक्नॉलॉजी ' ही इंजिनिअरांची संघटना कारखान्यांमुळे प्रदूषणात वाढ होऊ नये याची काळजी घेते. त्यासाठी वीज, पाणी आणि कारखान्यागणिक आवश्यक असणारा कच्चा माल याच्या वापराबद्दलही दक्षता घेण्यात येते. हे करत असताना ध्वनिप्रदूषण होणार नाही याकडेही लक्ष पुरविण्यात येते. ट्रेड युनियनचे कार्यकर्ते या सर्व कामात सहकार्य करीत असतात.

' लीग ऑफ कल्चर 'चा एक विशेष विभाग असलेल्या ' दि सोसायटी फॉर नेचर ॲण्ड एन्व्हायरॉनमेंट 'चे सर्व वयोगटातील सुमारे ५५ हजार सभासद पर्यावरणविषयक चर्चेत सतत सहभागी होत असतात. वृक्षवेली, कीटक, दुर्मिळ आणि विशिष्ट भागात सापडणाऱ्या माशांच्या जातींचे रक्षण, उद्यानविद्या, भुईछत्री वनस्पती, पाण्याची निगा, शहरातील पर्यावरण अशा विविध विषयांवर १५०० हून अधिक गटागटांतून चर्चा चालू असते, विचारांची, नव्या कल्पनांची देवाण-घेवाण सुरू असते. बर्फ आणि वादळामुळे जेथे हानी पोहोचली असेल अशा जंगलात, एखाद्या भागात हे कार्यकर्ते पर्यावरण कार्यक्रमाचा भाग म्हणून नवी झाडे लावणे, घाण दूर करणे यासाठी प्रयत्नशील राहतात. लीग ऑफ कल्चरच्या वतीने स्थानिक पातळीवरील पर्यावरण प्रश्नांची चर्चा आयोजित करण्यात येते आणि औद्योगिक पट्टा, गाव आणि इतर यात पर्यावरण कसे संरक्षित ठेवता येईल याचा विचार केला जातो.

या चर्चेत निवडून आलेले लोकप्रतिनिधी, सरकारी अधिकारी, कारखान्यात काम करणारे कर्मचारी, शास्त्रज्ञ, आणि विविध सार्वजनिक संघटनांचे प्रतिनिधी सहभागी होतात. पाणी, जमीन आणि जंगले या नैसर्गिक साधनसंपत्तीचा विनियोग पर्यावरणाचे महत्त्व लक्षात घेऊन कसा करायचा याचा आराखडा अशा चर्चांमधून तयार केला जातो. परगण्याप्रमाणे पर्यावरणाच्या विशिष्ट गोष्टी कशा संरक्षित करायच्या याचीही दखल या चर्चांमधून घेतली जाते.

' हेल्दी फॉरेस्टस् ' ही जर्मनीतल्या तरुणांच्या संघटनेची पर्यावरण-धोरणाला सक्रिय पाठिंबा देणारी मोहीम आहे. या संघटनेच्या २

लाख तरुणांनी १९८१ ते १९८५ या पाच वर्षांत वादळ आणि बर्फामुळे उद्ध्वस्त झालेल्या ३७ हजार हेक्टर क्षेत्रावरील जंगलाची पुनर्भारणी केली ! या तरुणांना हे माहीत आहे की, फॉरेस्ट हेल्दी राहिले तरच आपली सोसायटी हेल्दी होणार आहे !

दुसऱ्या बाजूने नॅशनल फ्रंट या संघटनेने वस्ती – वस्तीमधून पर्यावरण कसे महत्त्वाचे आहे आणि त्यासाठी आपल्या घरापासून कशी सुरुवात केली पाहिजे याचे दिग्दर्शन केले आहे. आपण राहतो तो फ्लॅट सुंदर कसा राहील याची काळजी सर्व लोक घेतात, असे आम्हाला दिसत होते. प्रत्येक फ्लॅटच्या बाल्कनीत गुलाबाची फुललेली सुंदर फुले लक्ष वेधून घेत होती. हिरवळीचीही त्यांनी जोपासना केली आहे. फुलांचे ताटवे बहरलेले आणि हिरवळीने आच्छादलेली मैदाने हे एक चित्र या दौऱ्यात आम्हाला सतत दिसत होते. आपली वस्ती, आपले घर सुंदर दिसावे, फुले, हिरवळीने घराभोवतीचे अंगण बहरलेले असावे यासाठीही लोक प्रयत्नशील राहतात. सुंदर हिरवळ आणि फुले, जिथे शेती आहे, जंगल आहे अशी हजारो एकर जमीन हे सारं पाहताना बोडक्या जमिनीचा तुकडाही इथल्या हजारो किलोमीटरच्या प्रवासात दृष्टीला पडत नाही.

दरवर्षी उत्पादनप्रक्रियेत टाकाऊ ठरलेल्या घटकांचा प्रश्नही जी.डी.आर.मध्ये नमुनेदार पद्धतीने सोडविण्यात आला आहे. वाया जाणाऱ्या सर्व घटकांचा पुनर्निर्मितीच्या प्रक्रियेत उपयोग केला जातो आणि हे चक्र अखंड चालू राहते. भंगार, केर – कचरा, रद्दीकागद, बाटल्या या सर्वांचा पुन्हा उपयोग करून घेण्याचा इथे प्रयत्न आहे. जवळजवळ ४२ टक्के नवे उत्पादन हे अशा वाया जाणाऱ्या घटकांमधून मिळू शकते, परंतु फाटलेले टायर, वाया जाणारे तेल, खाण कामातून बाहेर आलेली घाण माती यांचा वापर करण्याबाबत अजून निश्चित दिशा सापडलेली नाही. मात्र सर्व कारखाने, फर्म यांनी हे टाकाऊ पदार्थ कसे वापरावयाचे याबद्दल निश्चित सूचना, मार्गदर्शक तत्त्वे सतत सांगण्यात येतात.

कागदाच्या निर्मितीत या तत्त्वांचा फार चांगला उपयोग जी.डी.आर.ने केला आहे. वाया गेलेल्या कागदांचा इथे कागदाच्या पुनर्निर्मितीसाठी उपयोग होतो. आज या प्रकारे ५० टक्के कागदनिर्मिती ही रद्दी कागदापासून केली

जाते. त्यामुळे झाडांवरचे आक्रमण वाचते. जपानसारख्या प्रगत औद्योगिक देशानेही आता या पद्धतीचा अवलंब केला आहे. प्लॅस्टिक निर्मितीच्या बाबतीतही जी.डी.आर.मध्ये हेच अनुकरण केले जाते. घरोघरी बाटल्या, पॅकिंगसाठी जे प्लॅस्टिक वापरून फेकले जाते, त्याचा प्लॅस्टिकच्या पुनर्निर्मितीसाठी उपयोग केला जातो. यामुळे प्लॅस्टिकला जो कच्चा माल लागतो; तो केवळ १५ टक्के एवढा आणि साहजिकच पर्यावरणाला या निर्मितिप्रक्रियेची झळ पोहोचत नाही.

पाणी ही राष्ट्रीय संपत्ती म्हणून तिच्या वापरावर जी.डी.आर.मध्ये साहजिकच मर्यादा आहेत. उद्योगधंदे वाढत असताना पाणी एकेक थेंब वाचवता कसे येईल आणि त्याचा अपव्यय थेंबभरही कसा होणार नाही याचा इथले पर्यावरणतज्ज्ञ नेहमीच विचार करीत असतात. नद्या आणि सरोवरातून वाहणारे पाणी खते आणि रसायनातील घटकांमुळे दूषित होणार नाही याचीही पुरेपूर काळजी घेतली जाते. बाल्टिकचा समुद्रकिनारा प्रदूषणमुक्त ठेवण्याचीही या सरकारची धडपड आहे. मासेमारीसाठी या किनाऱ्याचे विशेष जतन जी.डी.आर.ने केले आहे. त्याबरोबर शेकडो पर्यटकांना एक सुंदर स्थळ म्हणूनही या किनाऱ्यावर सोयी देण्यात आल्या आहेत. बाल्टिकच्या किनाऱ्यावर पाण्याची गुणवत्ता आणि नवनव्या पक्षी, जलचरांच्या जाती शोधण्यासाठी अनेक संशोधनप्रकल्प आखण्यात आले. त्यांचे निष्कर्ष पर्यावरण कार्यक्रमाला बळकटी आणणारे ठरले. मुख्यतः बाल्टिकच्या पाण्यात जाणाऱ्या दूषित रसायन पदार्थांत घट करण्यात यश मिळाले आहे.

शांततेचा ध्यास घेणाऱ्या या देशात ध्वनिप्रदूषणाविरुद्ध युद्धपातळीवर प्रयत्न केले जात आहेत. कोणतीही मोठमोठी यंत्रे असणाऱ्या कारखान्यातही ती मुख्यतः घरघर न करणारी, आवाज नसणारी अशीच आहेत. मात्र जिथे आवाज कमी करणे शक्य नसेल तिथे यासंबंधी आवाजाची पातळी किमानपक्षी राखली जाईल असा प्रयत्न होतो. जिथे मर्यादेपेक्षा आवाजाची पातळी वाढत असेल त्या कारखान्याच्या अधिकाऱ्यांना ध्वनि–पातळी कमी करण्यासाठी आपण काय उपाय योजतो आहोत याचा अहवाल द्यावा लागतो. मात्र ज्यांना खूप मोठा आवाज असलेल्या यंत्रावरच काम करायचे आहे, त्यांची आरोग्यतपासणी

नियमित घेतली जाते. कानाला संरक्षक अशी साधने त्यांना मोफत दिली जातात.

ध्वनिप्रदूषण टाळायची हीच काळजी प्रमुख नगरांमधून आणि वाहतुकीच्या प्रमुख रस्त्यांबाबत घेतली गेली आहे. ध्वनि–पातळी किती असावी याचे दिग्दर्शन करणारे नकाशे मुख्य रस्त्यांवर लावलेले असतात. वाहने पार्क करण्यासाठी निवासी भागात किंवा पादचारी फिरतात अशा विशिष्ट भागात फार निर्बंध असतात. गाडी पार्क करताना चुकूनही इंजिन चालू ठेवून जाता येत नाही. वेळेचाही भाग यात महत्त्वाचा आहे. खुशाल गाडी पार्किंग एरियात लावून बिनधास्त जाता येत नाही. शहराच्या मध्यवस्तीपासून ठराविक अंतरावर मुख्य हमरस्त्यांवर अनेक ठिकाणी पार्किंग एरिया असतात.

आणि या सर्व पर्यावरणविषयक विचारात इथे रस्त्यावरून पायी चालणाऱ्या माणसाचे सुख जपण्याचा प्रयत्न आहे. पोट्सडॅम, लाईपझिग आणि बर्लिन या आम्ही पाहिलेल्या तिन्ही शहरांमध्ये पादचाऱ्यांसाठी खास विभाग करून तिथे वाहनांच्या वाहतुकीला पूर्ण बंदी आहे. आम्ही शांतपणे चौकाचौकातील सुंदर, प्रशस्त ऐतिहासिक व नव्या इमारती पाहात चाललो होतो. लाईपझिगला सेंट थॉमस चर्चच्यासमोर रेस्टारंटच्या बाहेरच्या बाजूस जर्मन तरुण–तरुणी आरामात आईस्क्रीम चाखत बसले होते. पोट्सडॅमच्या एका सुंदर प्रशस्त रस्त्यावरून छोटी मुले बाबागाडीतून फिरत होती. दोन्ही बाजूंच्या दुकानात लोक खरेदी करत होते आणि वाहनांचा आवाजही नसल्यामुळे शांतपणे, प्रसन्नतेने या सर्व परिसरात मुक्तपणे फिरत होते! बर्लिनमध्येही ' अलेक्झांड्रा प्लेस ' हा असा खास पादचाऱ्यांसाठी राखलेला आहे. तिथे मधोमध असणाऱ्या सुंदर कारंज्याभोवती सुंदर जर्मन तरुण–तरुणी ऊन खात, गप्पा मारीत, कारंजाच्या पाण्याने गोरे पाय ओले करीत फिरत होते, भटकत होते! हे सारेच दृश्य लोभसवाणे होते. पादचाऱ्यांची एवढी गर्दी या सर्व भागात होती, पण कागदाचा कपटा किंवा साधे थोटूकही पडलेले नव्हते, इतके रस्ते आणि हा परिसर पारदर्शी दिसत होता!

समाजाच्या सर्व घटकांचा सहभाग घेऊन जी.डी.आर.ने पर्यावरणाचे एक आदर्श रूप साकार केले आहे. आज तरी युरोप खंडात जी.डी.आर.चे

उदाहरण पर्यावरण संरक्षण व संवर्धनाच्या बाबतीत नमुनेदार मानले गेले आहे. आपल्या खंडप्राय देशालाही त्यापासून खूप शिकण्यासारखे आहे.

बालकवींची 'हिरवे हिरवे गार गालिचे। हरित तृणांच्या मखमलीचे।' ही कविता या साऱ्या प्रवासात आठवत होती आणि ही कविता ज्या देशातून मी घेऊन आलो होतो, तेथे परत आल्यानंतर काय दिसले ? दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरत असताना पिवळ्या गवतांचे पुंजके आणि पडीक जमीन दिसत होती. वाटलं, आपलं विमान आता याच जमिनीवर उतरणार काय ? जेव्हा धावपट्टीवरून विमान निघालं तेव्हा आजूबाजूला शेकडो एकर कोरडी जमीन दिसत होती ! बालकवींच्या कवितेतले हिरवेगार गालिचे भस्म होऊन जावेत असं ऊन बाहेर होतं आणि लाईपझिग, पोट्सडॅम, बर्लिनच्या स्मृती तेवढ्या मनात तरळत होत्या.....

□ □

# देखणे युरोप

पूर्व जर्मनी आणि पोलंड या दोन्ही पूर्व युरोपीय देशांत नखालाही न दिसलेली जाहिरातबाजी ॲमस्टरडॅमच्या शिपोल विमानतळावर मोठ्या रंगेल स्वरूपात प्रवाशांचे स्वागत करीत होती. आम्ही आता पश्चिम युरोपात आलो होतो. मुक्त अर्थव्यवस्था असणाऱ्या आणि खुली व्यावसायिक स्पर्धांची बाजारपेठ असलेल्या देशांमधून आम्ही आता फिरत होतो. विविध स्वरूपाच्या तांत्रिक करामतीने कोणाचेही चित्त वेधून घेणाऱ्या आकर्षक जाहिराती हे इथल्या आर्थिक रचनेचे एक बोलके चित्र होते.

**जाहिरातींची दुनिया**

जाहिरातींची ही दुनिया ॲमरटरडॅमपासून जी खुली झाली ती लंडनपर्यंत सर्वत्र पसरून राहिली होती. कॅमेरा फिल्म, कपडे, शाम्पू, गोळ्या, साबण, खाद्यपदार्थ, क्रीम, परफ्यूम्स आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर काम करणाऱ्या टेलिकॉम कंपनीच्या सुद्धा जाहिराती होत्या. 'रेल्वेने प्रवास करताना तिकीट काढून प्रवास करा' अशी सूचना देणाऱ्या जाहिराती रेल्वेनेही विविध ठिकाणी प्रसृत केल्या होत्या.

पण तरीही या जाहिराती अंगावर येणाऱ्या, बटबटीत अशा नव्हत्या. रस्त्यावरची होर्डिंग बऱ्याच प्रमाणात एका विशिष्ट आकारात, विशिष्ट अंतरावर दिसत होती. झुरिच, ॲमस्टरडॅम, पॅरिस आणि लंडन या शहरांमध्ये होर्डिंगच्या जाहिराती मोठ्या प्रमाणात होत्या. त्यातही स्लाईडस् बदलल्याप्रमाणे एकाच होर्डिंगवर ३–४ जाहिराती चलत्चित्राप्रमाणे बदलून आलटून–पालटून प्रदर्शित करण्याची सुविधा वापरली आहे.

लंडनच्या मेट्रोने प्रवास करताना समोरच्या भिंतीवर ब्रिटिश रेल्वेने प्रसृत केलेली एक जाहिरात बघितली. 'इज धिस् युवर नेक्स्ट स्टॉप ?' असा प्रश्न ठळक स्वरूपात विचारणारी ही जाहिरात साधीच होती. या प्रश्नाखाली एका चौकटीत 'मॅजिस्ट्रेट कोर्ट' असे लिहिले होते आणि सर्वांत खाली

तुम्ही तिकीट काढून प्रवास करा आणि जेथे पोहोचायचे तेथेच जा असा सल्ला दिला होता. या जाहिरातीत एक सुसंस्कृतपणा जाणवत होता. आपल्याकडे या पद्धतीच्या जाहिरातीत प्रवासी हा गुंड, मवाली प्रवृत्तीचाच आहे असे गृहीत धरून शिक्षांची यादी दरडावून सांगणारा मजकूरच दिसतो. म्हणून ब्रिटिश रेल्वेची ती जाहिरात मला विशेष आवडली.

अर्थातच जाहिरातींच्या मागोमाग आणखी एक भाग नकळत येतो तो म्हणजे किंमतीचा. ॲमस्टरडॅमहून स्वित्झर्लंडच्या दिशेने निघाल्यावर वाटेत पश्चिम जर्मनीच्या प्रदेशातील एका हॉटेलात आम्ही दुपारचे जेवण घेतले. दोन फळे, मांस, साधा ब्रेड आणि केक, दूध या पदार्थांचे बिल सुमारे १५० ते १९५ रुपये इतके झाले आणि प्रत्येकाची भूकच हरपली ! इंग्लंड, फ्रान्स, बेल्जियम, हॉलंड आणि स्वित्झर्लंड या आम्ही प्रवास केलेल्या पाचही देशातील खाद्यपदार्थांपासून ते सर्व वस्तूंचे दर प्रचंड महागच होते. रंगीत फोटोचा रोल जो भारतात ५० ते ५५ रुपयांना मिळतो तो इथे ७० रुपयांच्या पुढे मिळाला. पॅरिसला हाच रोल १०० रुपयांना, लंडनला ८८ रुपयांना तर जिनिव्हात ७० ते ७५ रुपयांपर्यंत मिळाला. खेळणी, कपडे, काही आकर्षक वस्तू, चॉकलेटस् यांचेही दर भारतीय रुपयांच्या तुलनेत महागच वाटायचे. त्यामुळे एखादा कप कॉफी घेताना किंवा वस्तू खरेदी करताना पौंड, डॉलर, गिल्डरमध्ये रक्कम देताना भारतीय रुपयातला हिशेब अगोदर लक्षात घेतला जाई आणि मग पुढचे काम होत असे. त्यासाठी आमच्या काही पत्रकार मित्रांनी खिशात बसतील असे अगदी छोटे कॅल्क्युलेटर विकत घेतले होते आणि त्यावर डॉलरचे पौंड पौंडाचे रुपये असे विनिमयाचे हिशेब सतत चालू असायचे.

स्वित्झर्लंड हे घड्याळांसाठी तर पॅरिस हे परफ्यूम्ससाठी प्रसिद्ध. पण या दोन्ही ठिकाणी या वस्तूंच्या किंमती खूपच महाग होत्या. पॅरिसमध्ये तर आपल्या भाषेत सगळ्याच वस्तूंचे भाव आभाळाला भिडलेले! बटाटे १६ रुपये किलो आणि साधा ब्रेड ८ – ९ रुपयांना ! चांगल्या परफ्यूम्ससाठी किमान १०० रुपये तरी हवेतच !

एक गोष्ट मात्र खरी की, भारतीय रुपयात किंमत केल्याने ही जाणवणारी महागाई सोडली तर या वस्तू त्यांचा दर्जा, अन्न किंवा खाद्यपदार्थांचा दर्जा यात मात्र फसवणूक नव्हती. सुंदर, आकर्षक पॅकिंग प्रत्येक वस्तूला असायचं.

हॉटेलात खाद्यपदार्थ देताना काळजीपूर्वक त्याचं वाटप व्हायच आणि हा पाहुणा इथे वारंवार आला पाहिजे अशा भावनेचं अगत्य असलेली सर्व्हिस असायची.

बऱ्याच ठिकाणी चहा, कॉफी, ज्यूस, चॉकलेटस्, सिगारेटस्, स्वयंचलित यंत्रांवर मिळतात. ठराविक किंमतींचे नाणे टाकले की, चहा, कॉफीचा मग त्या यंत्रांतून बाहेर पडत असे आणि दूध, साखरही तशीच मिळे. आपण केवळ खटका दाबण्याचे काम करायचे. चॉकलेटस्ची अशी यंत्रे अनेक स्टेशनवर आहेत. उरलेले पैसेही पुन्हा मिळतात. मोठ्या हॉटेलांतून, उपाहारगृहांतून देखील अशा स्वयंचलित यंत्रांतून पदार्थ मिळतात. ही यंत्रे आणि ग्राहक एकमेकांना कधीच फसवत नाहीत, असा अनुभव आम्हालाही आला.

पूर्व युरोपात समाजजीवन जसे सुसंस्कृत, निरोगी दिसले, त्यांचेच भाईबंद याही पश्चिम टापूत दिसत होते. युरोपातील स्त्री-पुरुष संबंधाबद्दल आपल्याकडे सॉलिड गैरसमज आहेत. कोणत्याही स्त्रीबरोबर कोणताही पुरुष मन मानेल तेव्हा मौज करतो, फ्री-सेक्सचा स्वीकार त्यांनी केला आहे, असे अनेक लोकांना वाटते. खरं सांगायचं तर त्यात तथ्य नाही. शिष्टसंमत असा मोकळेपणा तिथल्या स्त्री-पुरुषांच्या वावरण्यात असतो. चुंबन किंवा आलिंगन देणे ही गोष्ट युरोपियन काही आक्षेपार्ह समजत नाहीत. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणी-बागेत, बसस्टॉपवर, दुकानात, रेल्वेने प्रवास करताना– प्रेयसीला, पत्नीला चुंबन देणे, आलिंगन देणे या बाबी त्यांनी सहजपणे मान्य केल्या आहेत. आपल्याकडे तर आजही एखाद्या स्त्रीने पुरुषाशी बोलणे (आणि त्यातही तो परपुरुष असेल तर विचारूच नका!) म्हणजे एका नव्या भानगडीचा जन्मच समजला जातो, इतके आपले नीतिनियम कठोर आहेत!

**जेफ्री आर्चरचे उदाहरण**

नीतीच्याच कसोटीवर पाहायचे तर सार्वजनिक जीवनात वावरणाऱ्याने आपले चारित्र्य धुतल्या तांदळासारखे ठेवले पाहिजे, असा इथे जणू दंडकच आहे. आम्ही या दौऱ्यात असताना लंडनमध्ये जेफ्री आर्चर या नामवंत कादंबरीकाराने 'स्टार' या वृत्तपत्राविरुद्ध आपली अब्रुनुकसानी केल्याचा दावा दाखल केला होता, त्याची सुनावणी चालू होती. आर्चरने एका वेश्येबरोबर रोमान्स केल्याची कहाणी या वृत्तपत्राने प्रसिद्ध केली होती आणि त्याविरुद्धच

आर्चरने दावा दाखल केला होता. त्याची पत्नीसुद्धा या दाव्याच्या सुनावणीच्या वेळी रोज उपस्थित राहात होती. तिचीही साक्ष झाली. ज्या वेश्येशी आर्चरने रोमान्स केला, असे म्हटले गेले, तिचीही साक्ष झाली आणि २५ जुलै रोजी ज्युरींनी निकाल दिला तो जेफ्री आर्चरच्या बाजूने! 'स्टार' वृत्तपत्राने नुकसानभरपाई म्हणून लाख पौण्ड आर्चरला द्यावेत, असे निकालपत्रात म्हटले होते. आर्चरची पत्नी तर आनंदातिशयाने वेडी झाली होती! आपल्याकडच्या सार्वजनिक जीवनात कितीएक लोक असे आरोप सतत करीत असतात. पण कसोटी देण्याची कितीजणांची तयारी असते? जेफ्री आर्चरचे उदाहरण आपल्याच नव्हे तर सर्व ठिकाणच्या समाजजीवनातील नैतिकतेचा मानदंड म्हणून उजवे ठरते. २५ जुलैच्या गार्डियन, लंडन टाईम्स, टेलिग्राफ, लंडन डेली न्यूज, इंडिपेन्डंट या बहुतेक सगळ्या वृत्तपत्रांनी म्हणूनच आर्चरने खटला जिंकल्याच्या बातमीचे मेनफिचर केले होते!

सार्वजनिक शिष्टाचाराचा भाग म्हणून स्त्री-पुरुषांनी हस्तांदोलन करणे, स्वागताच्या विशिष्ट प्रथेप्रमाणे पुरुषांच्या गालाचे किंवा स्त्रियांच्या गालाचे चुंबन घेणे याही गोष्टी सहजपणे स्वीकारण्यात आल्या आहेत.

**टी शर्ट, जीनची पँट**

कपड्यांच्या निवडीबाबत तर येथील सर्वच समाज खूप चोखंदळ आहे. मोकळे, सैल कपडे घालणे बहुतेक सर्वांनाच आवडते. स्त्री-पुरुषांच्या कपड्यांत लक्षणीय फरक आढळला नाही. टीशर्ट आणि जीनची पँट हा जणू इथल्या तरुण-तरुणींनी युरोपीय खंडाचाच पोशाख म्हणून निवडला असावा असे दिसते आणि 'जातीच्या सुंदराला काहीही शोभते' या न्यायाने विविध प्रकारचे कपडे सर्वांनाच शोभत होते, आकर्षक दिसत होते. मुली तर विविध प्रकारची, आकाराची सोन्याची कर्णफुले कानात घालून मिरवताना दिसायची. मोत्याच्या पांढऱ्याशुभ्र माळाही अनेक गौरांगनांच्या गळ्यात असायच्या. पिवळेधमक सोन्याचे सरही कित्येक युवतींचे सौंदर्य खुलवत असायचे.

'फ्री सेक्स' म्हणून जो उल्लेख सतत केला जातो, त्याही बाबतीत युरोपियन समाज सुरक्षित भावना जपणारा दिसला, इथे मुलामुलींना 'डेटिंग' सारख्या प्रथेमुळे स्वतंत्रपणे भटकायला मिळतं. आर्थिक स्वातंत्र्यही मिळतं. त्यामुळे

पौंगडावस्थेत लैगिंक संबंधाचा अनुभव येतो हे खरं, पण त्या सर्वच प्रकरणात केवळ मजा होते आणि पुन्हा ही मुलं–मुली दुसरी जोडीदार शोधतात असं निश्चितच होत नाही. पौंगडावस्थेतलं प्रेम टिकून पुढे त्यांतले बरेच लग्नही करतात आणि स्वतःचा संसार सुरू करतात! एक गोष्ट अगदी खरी आहे. बहारदार निसर्गाच्या संगतीत, आरोग्यदायी वातावरणात इथली मुलं–मुली फार वेगानं तरुण होतात! आणि त्यांचं तारुण्य काळाच्या भाषेत आपल्याकडच्या तारुण्याच्या काळापेक्षा निश्चितच दुप्पट काळ तरी टिकतं! बर्लिनमधला आमचा मार्गदर्शक मित्र पीटर मे याला जेव्हा कुतूहलानं आम्ही त्याचं वय विचारलं, तेव्हा त्यानं उत्तर दिलं, पन्नास! आम्ही अतिशय आनंदानं त्याचं मनःपूर्वक अभिनंदन केलं! कारण आम्हाला तो तीस-बत्तीसचाच वाटत होता!

इथल्या प्रत्येक मुक्कामात आमचे गैरसमज गळून पडत होते. अत्याधुनिक तंत्रज्ञानाने त्यांनी केलेली प्रगती त्यांच्या चिकाटी आणि परिश्रमाचा आदर्श दाखवीत होती. परपरा, इतिहास आणि आधुनिकता यांचा एक परिपक्व वास इथल्या सर्वच जीवनात आहे.

**ब्रिटिश पार्लमेंट**

राजेशाहीची परंपरा आणि लोकशाहीचा पाया मजबूत करणारी मानवी मूल्ये यांची एकसंध रूपे लंडनच्या वास्तव्यात दिसत होती. लेडी डायना आणि प्रिन्स चार्लस, प्रिन्स फिलिप आणि राणी एलिझाबेथ यांचे आकर्षक फोटोग्राफस् विकणारी दुकाने इंग्लंडच्या संसदभवनाबाहेर जशी होती, तशीच हे ससदभवन पाहणाऱ्या नागरिकांचीही राग आत जाण्यासाठी उत्सुक होती, उंच-उंच मनोरे आणि आकर्षक वास्तुशिल्प यामुळे इंग्लंडचे संसदभवन दुरूनही लक्ष वेधून घेते.

ब्रिटिश पार्लमेंटच्या या ऐतिहासिक भव्य वास्तूंच्या आवारात क्रॉमवेल, किंग जॉर्ज यांचे पुतळे दिमाखात उभे आहेत. एक अखंड असं या संसदेचे वास्तुशिल्प एका फेरीत नीट पाहता येत नाही. प्रदक्षिणा घातल्याप्रमाणे आडव्या लांब पसरलेल्या या वास्तूचे दर्शन घेण्यासाठी फिरावे लागते.

मुळात हा आहे राजवाडा. 'वेस्ट मिन्स्टर पॅलेस' नावाचा. १५४७ मध्ये हा राजवाडा संसदेला देण्यात आला. त्याची पुनर्बांधणी १८३२ मध्ये करण्यात

आली. व्हिक्टोरियन शैलीचे हे बांधकाम त्याच्या असाधारण वास्तुशिल्पाची महती सांगणारे आहे. 'हाऊस ऑफ लॉर्डस्' आणि 'हाऊस ऑफ कॉमन्स' ही दोन्ही सभागृहे येथे शेजारी शेजारी आहेत. जी. बर्कस नावाचा ब्रिटिश संसदेतील एक उमदा व विनोदी शैलीचा उच्चाधिकारी आम्हाला संसदभवन दाखविण्यासाठी आला होता. तेराव्या शतकातील 'मॅग्ना चार्टा'पासून सुरू झालेली आणि १९२८ मध्ये महिलांना मतदानाचा हक्क देऊन परिपूर्ण झालेली, जगातील लोकशाहीची जननी मानल्या गेलेल्या ब्रिटिश लोकशाहीची उद्गाती वास्तू आम्ही पाहात होतो. बर्कस् साहेबांच्या खुसखुशीत निवेदनाने संसदेतला हा फेरफटका अतिशय अर्थपूर्ण आणि रोचक होत होता.

आम्ही जेथून संसदेत प्रवेशत होतो, त्याला 'सॉवरिन एन्ट्रन्स' म्हटले जाते. याच भागात इंग्लंडच्या गेल्या शतकातील माजी पंतप्रधानांचे अर्धपुतळे चारही बाजूंना बसवलेले आहेत. रशिया, अमेरिका या महासत्तांचे प्रमुख याच दाराने संसदेत येतात, असे बर्कस् यांनी सांगितले.

'हाऊस ऑफ लॉर्डस' मध्ये जाण्यापूर्वी असलेल्या 'रॉयल गॅलरी'त आम्ही सुंदर सुंदर पेटिंग्ज पाहीली. ही पेटिंग्ज केवळ सुंदर, प्रेक्षणीय म्हणून महत्त्वाची नव्हती. तर इंग्लंडच्या लोकजीवनातील, राजकीय वाटचालीतील महत्त्वाचे टप्पे चितारणारी म्हणून महत्त्वाची होती. या गॅलरीशेजारीच १८१४ मध्ये बांधलेला 'रॉयल पॅलेस' हा भागही आम्ही बघितला. अतिशय प्रचंड मोठ्या आकारातील दोन मोठी पेंटिंग्ज येथे आहेत. ट्रॅफलगारच्या लढाईत इंग्लडचा प्रख्यात दर्यावर्दी ॲडमिरल नेल्सनचा मृत्यू एका पेंटिगमध्ये दाखवला आहे. तर दुसऱ्यात वॉटर्लूच्या लढाईनंतर सेनापतीला भेटायला आलेल्या ड्यूक ऑफ वेलिंग्टनचे आगमन असे दृश्य चितारले आहे. मॅग्नाचार्टा सादर करतानाचा ऐतिहासिक देखावाही याच ठिकाणी आहे. हे सर्वच देखावे आधुनिक जगावरील इंग्लंडच्या प्रभावी ठशाची बोलकी उदाहरणेच आहेत.

या पॅलेस शेजारी लॉर्डस्साठी असलेले अभ्यासदालन आहे. इंग्लंडची प्रख्यात महाराणी व्हिक्टोरियाचा पुतळा याच दालनात आहे. याच दालनात भिंतीवर वरच्या बाजूला इंग्लंडचे राज्ञीपद सांभाळलेल्या भाग्यवान आणि सुंदर राण्यांची रंगीत पेंटिंग्ज आहेत. काही थोडेफार राजेही यात दिसतात. आठवा एडवर्डही येथे दिसला. पुढे ज्याने प्रेमासाठी सिंहासनाचा त्याग केला तोच

हा आठवा एडवर्ड ! सातव्या हेन्रीच्या राण्यांचीही पोर्ट्रेटस् झळकत आहेत. बर्कस् साहेबांनी ती पोर्ट्रेटस् दाखवता दाखवता म्हटले की, इंग्लंडच्या राजघराण्यात मुलांपेक्षा मुलीच जास्त. त्यामुळे राण्यांची संख्या नेहमीच मोठी राहिली आहे ! आणि या राण्याही पुन्हा दीर्घायुषी ! राजपुत्राला सिंहासनावर बसण्याची संधी मग थोडीच लवकर मिळणार ?

आम्ही बोलता बोलता 'हाऊस ऑफ लॉर्डस्'च्या शाही सभागृहात आलो होतो, अक्षरशः सोन्याचे मढविलेले राणीचे सिंहासन आम्ही पाहात होतो ! राणी एलिझाबेथ यांची बसण्याची जागा, प्रिन्स फिलिप, प्रिन्स चार्लस्, लेडी डायना यांच्या बसण्याच्या जागा बर्कस् आम्हाला दाखवीत होते. आता या सभागृहात नोव्हेंबर १९८८ मध्ये राणीसाहेब भाषणासाठी येतील, असे त्यांनी सांगितले. राणीसाहेबांच्या उपस्थितीत इंग्लंडचा पंतप्रधान या सभागृहात बसू शकत नाही. त्याला उभे राहावे लागते. राणीच्या सिंहासनाभोवती मोठे सोनेरी रंगांनी मढविलेले कठडे आहेत. एकूण 'लॉर्डस'ला शोभेल अशीच या सभागृहाची शान आहे. राणीचे पाहुणे आणि पंतप्रधानांचे पाहुणे यांना बसण्यासाठी स्वतंत्र गॅलरी आहे. या सभागृहात सभापतीच्या आसनाच्या डावीकडे विरोधी आणि उजवीकडे सत्तारूढ पक्षाचे सदस्य बसतात. हीच व्यवस्था 'हाऊस ऑफ कॉमन्स'मध्ये आहे. 'हाऊस ऑफ कॉमन्स'च्या सभागृहात जाण्यासाठी आम्हाला सेंट्रल लॉबीतून चालावे लागले.

### चर्चिलचा पुतळा

याच लॉबीत इंग्लंडचे माजी पंतप्रधान चर्चिल आणि ॲटली यांचे पुतळे आहेत. दोन्ही हात कमरेवर ठेवून कोट किंचित मागे सारून थोडा ओणवा झालेल्या स्थितीतील चर्चिलचा हा पूर्णाकृती पुतळा अतिशय बोलका आहे. त्यांचे डोळे, चेहऱ्यावरील भाव जणू आमच्याशी सवाद करताहेत असे भासतात. त्यांच्या तोंडात चिरूट नसल्याने आम्ही बर्कस् यांना त्यासंबंधी विचारले. त्यावर ते म्हणाले, 'स्मोकिंग इज नॉट अलाऊड इन् पार्लमेंट हाऊस ! '

चर्चिलचा पुतळा पाहत असतानाच आमचे लक्ष त्यांच्या पायाकडे गेले. या पुतळ्याचे पाय पिवळेधमक दिसत होते. पायावरचा मूळ धातूंचा रंग मगळा निघून गेला होता. बर्कस्‌साहेबांनी सांगितले की, हजारो इंग्लिश लोकांनी

श्रद्धेपोटी चर्चिलच्या पुतळ्याचे पाय पुसले आहेत. त्यामुळे मूळचा रंग पुसला गेला आहे. आपल्याकडे पंढरपूरच्या विठ्ठलाच्या पायांना लाभणारे अभिवादन चर्चिलच्या पायांना लाभत होते, याचे मोठे कौतुक वाटते. दुसऱ्या महायुद्धात साऱ्या ब्रिटिश बांधवांना चेतना देऊन फॅसिझमविरुद्ध उभा करणारा आणि युद्धकाळात धाडसाने जगायला शिकवणारा हा नेता केवळ इंग्लंडच्याच कशाला, आपल्या भारतीयांच्या कौतुकाचा, औत्सुक्याचाही नक्कीच झाला होता. या कर्तबगार पुरुषाने ब्रिटिश जनतेच्या हृदयात निर्माण केलेली आत्मप्रेरणा साऱ्या मानवजातीच्या आदराचा विषय घेवून राहिली आहे. आम्ही वारंवार चर्चिलच्या पुतळ्याकडे पाहात होतो आणि पुढच्याच क्षणी त्या अर्थस्फुट अशा ओठांमधून काही शब्द का होईना तो आपल्याशी बोलेल असा भास होत होता.

हाऊस ऑफ कॉमन्सचे एक प्रवेशद्वार भारताने तयार करून दिले आहे. दुसरे प्रवेशद्वार पाकिस्तानकडून मिळाले आहे. या सभागृहातील बरेचसे फर्निचर या दोन देशांखेरीज श्रीलंकेनेही दिले असल्याचे बर्कसूसाहेबांनी सांगितले. दुसऱ्या महायुद्धाची झळ या सभागृहाला मोठ्या प्रमाणात लागली होती. ज्या प्रवेशद्वाराच्यावर बॉम्बफेकिच्या खुणेचा काळसर पट्टा होता, त्याच्याच खाली चर्चिलचा पुतळा उभारण्यात आला आहे. हाऊस ऑफ कॉमन्समध्ये चर्चिल कोठे बसत होता, ती जागा आम्ही पाहिली. गंमत म्हणजे या सभागृहात ४४० सभासदच बसू शकतात आणि कॉमन्सचे सभासद आहेत ६६०. त्यातील लवकर जे येतात त्यांना जागा मिळते इतर लेटकमर्सना वर प्रेक्षक गॅलरीत बसावे लागते. या सभागृहातील राजदंड दुसऱ्या चार्लसने भेट म्हणून दिलेला आहे.

या सभागृहाशेजारी असलेली 'वेटिंग रूम' ही ब्रिटिश संसदेची पहिली पाऊलखूण मानली जाते. १५३७ ते १८३४ पर्यंतच्या राजवटीची माहिती देणारी पेंटिंग्ज या भागात आहेत. येथून पुढे लागतो, 'वेस्ट मिन्स्टर हॉल'. दुसऱ्या रिचर्डने बांधलेला हा हॉल जगातील एक उत्कृष्ट वास्तूशिल्प म्हणून ओळखला जातो. पाचवा, सहावा, सातवा किंग जॉर्ज, राणी मेरी यांच्या स्मृतिशलाका येथे जतन करण्यात आल्या आहेत. तेथून आम्ही बाहेर पडलो. ज्याच्या साम्राज्यावर सूर्य कधी मावळत नव्हता. अशा साम्राज्यवाद्यांच्या

लोकशाही रूजवण्याच्या मूल्यांचे, प्रयत्नांचे हे मंदिर सुंदर तर आहेच, पण इतिहासाचे भान देणारे आणि लोकशाही मूल्यांवरचा आपला विश्वास दृढ करणारे आहे.

'डेली टेलिग्राफ'

या समर्थ लोकशाहीचा चौथा स्तंभ मानला गेलेल्या वृत्तपत्र जगालाही आम्ही भेट दिली. 'द डेली टेलिग्राफ' या इंग्लंडमधील सर्वाधिक खपाच्या (साडेबारा लाख प्रती) दैनिकाच्या अत्याधुनिक छपाई विभागाला आम्ही भेट दिली. थेम्सच्या काठावरील एका सुंदर बैठ्या इमारतीत हा विभाग आहे. मिनिट – दीड मिनिटात अल्ट्रा व्हायोलेट किरणांच्या प्रक्रियेने होणारे प्लेटमेकिंग, दर तासाला ६५ हजार प्रतींची छपाई आणि या छपाईसाठी कागदांची रिळे आणणारे रोबो हे सर्व आम्ही थक्क होऊन पाहात होतो. स्वयंचलित पद्धतीने अंकांच्या गठ्ठ्यांचे पॅकिंगही येथे होत होते. या दैनिकाच्या प्रकाशन कंपनीतर्फेच 'लंडन डेली न्यूज' हे 'स्वराज्य' आकारातील दुसरे छोटे दैनिकही प्रसिद्ध होते. प्रामुख्याने लंडन शहराचा चेहरामोहरा टिपण्याचा त्यात प्रयत्न असतो. १२५ वर्षांची परंपरा असलेले 'टेलिग्राफ' हे दैनिक आज वृत्तपत्र जगातील मोठे नाव आहे.

या खंडातील सर्व प्रमुख शहरांमधील उत्तमोत्तम कलाकृतींची संग्रहालये येथील संस्कृतीची अभिरूची आणि कहाणी सांगत असतात. आम्ही गेलो त्या काळात सुटी असल्याने परदेशातील बरेच पर्यटक येत होते. त्यामुळे बहुतेक सर्व संग्रहालयांत गर्दी होती. पॅरिसमधील लुर संग्रहालयात 'लिओनार्दो द व्हिंची'चे 'मोनालिसा' हे जगप्रसिद्ध चित्र पाहण्यासाठी प्रचंड झुंबड उडाली होती. नेपोलियनचा राज्याभिषेक असलेले एक भव्य पेंटिगही याच संग्रहालयात आहे. हात नसलेले व्हेनिसचे जगप्रसिद्ध शिल्पही येथे पाहायला मिळाले. ॲमस्टरडॅम येथे सुप्रसिद्ध चित्रकार व्हिसेंट व्हॅन गॉग याच्या कलाकृतींचे संग्रहालयही मोठे वैशिष्ट्यपूर्ण आहे. तीन मजली अशा वास्तूत त्याची चित्रे लावली आहेत. एखाद्या मंदिरात किंवा पवित्र ठिकाणी गेल्याचा अनुभव ही संग्रहालये देतात.

**पॅरिसमध्ये आता नवे सांस्कृतिक केंद्र**

भारताचे फ्रान्समधील राजदूत एअर मार्शल (निवृत्त) आय. एच. लतीफ

आणि त्यांच्या पत्नी सौ. बिल्किस लतीफ यांची भेट पॅरिसमधील मुक्कामात आनंददायी ठरली. जगप्रसिद्ध आयफेल टॉवरपासून अगदी जवळच श्री. लतीफ यांचे भव्य निवासस्थान आहे. प्रवेशाच्या दालनात गणपतीची मूर्ती ठेवलेली आहे. वरच्या मुख्य दालनात सुंदर झुंबरे आहेत. अतिशय सुंदर असे हे निवासस्थान आहे. भारताचे आणि फ्रान्सचे सांस्कृतिक संबंध अतिशय जिव्हाळ्याचे असल्याचे श्री. आणि सौ. लतीफ यांनी बोलताना सांगितले. हे संबंध दृढ करण्यासाठी लवकरच पॅरिसमध्ये सांस्कृतिक केंद्र सुरू करण्याची योजना आहे, असे श्री. लतीफ यांनी सांगितले. गेल्या वर्षी पॅरिसमध्ये 'फेस्टिवल ऑफ इंडिया' साजरा करण्यात आला होता. या महोत्सवासाठी आयफेल टॉवरसमोरची जागा फ्रान्स सरकारने मुद्दाम दिली होती. ही जागा अशा उत्सवासाठी यापूर्वी कोणत्याही देशाला वापरण्याची परवानगी देण्यात आली नव्हती, असेही श्री. लतीफ यांनी मुद्दाम सांगितले, लता मंगेशकर, रविशंकर, भीमसेन जोशी, किशोरी आमोणकर या लोकोत्तर कलावंतांच्या कार्यक्रमांना फ्रान्सचे रसिक किती गर्दी करून दाद देतात, याचे अनुभव बिल्किस लतीफ यांनी सांगितले. रविशंकर यांची प्रकृती ठीक नसतानाही ३०० फूट उंचीवरील एका सांस्कृतिक केंद्रातील नियोजित कार्यक्रमात ते किती समरसतेने सहभागी झाले याचे वर्णन सौ. लतीफ करीत होत्या. महाराष्ट्राच्या राज्यपालपदी अतिशय चांगले काम करून येथील सार्वजनिक जीवनात सक्रिय सहभागी झालेले आणि आता पॅरिसमध्ये भारताचे राजदूत म्हणून काम पाहणारे श्री. लतीफ आणि सौ. लतीफ फ्रान्सच्या सार्वजनिक जीवनातही तितकेच समरस झाले आहेत, हे जाणवत होते.

**सौंदर्यतीर्थ व शांतिधामही!**

लंडन, पॅरिस, झुरिच, जिनिव्हा या सर्वच शहरांतून फिरताना मोठमोठे पुतळे, प्रासादतुल्य जुन्या सुंदर, आकर्षक वास्तू सर्वत्र दिसतात. रोमन साम्राज्याचे ठसे असणारी ही वास्तुशिल्पे इतिहास, कला आणि सौंदर्य यांचे मनोरम आविष्कार आहेत पण याहूनही केवळ नयनरम्य, स्वप्नमय असे वातावरण आम्ही पाहिले ते स्वित्झर्लंडच्या सफरीत.

आम्ही रस्त्यांवरून जात होतो, त्याच्या दोन्हीकडे सरोवरे वाहत होती. त्या सरोवरांच्या पलीकडे निळ्या, पांढऱ्या रंगाची डोंगरराजी उभी होती.

ही डोंगरराजी जिथे जमिनीला येऊन भिडते, तिथे सुंदर सुंदर घरे वसलेली होती. अवतीभवती सुंदर वृक्षराजी, पुष्पवाटिका दिसत होत्या. जिनिव्हाच्या वाटेवर एखाद्या छोट्या समुद्राची आवृत्ती असलेले ग्रुएर सरोवर पाहताना तर जणू मोत्यांचे सडेच आपण पाहात आहोत असे वाटत होते! ल्यूझर्न, बासेल, झुरिच, जिनिव्हा या सर्व शहरांतून एखाद्या राजहंसासारखी वाहणारी सरोवरे, उंचच उंच वृक्षांच्या गर्द वनातून धावणारी रेल्वे, सरोवरांच्या क्षितिज रेषांपाशी आकाशाकडे झेपावणारे माऊंट ब्लँकसारखे पर्वत आणि मधोमध छोट्या, टुमदार घरांच्या वस्त्या हे सारं दृश्य म्हणजे जणू निसर्गाच्या विलोभनीय रूपाचा स्वप्नील आविष्कारच! जगातल्या सर्वांत सुंदर देशात आपण फिरत असल्याचा प्रत्यय हा निसर्गच आम्हाला देत होता.

स्वित्झर्लंड हे सौंदर्यतीर्थ तर आहेच, पण ते शांतिधामही आहे. आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस संघटना, आंतरराष्ट्रीय कामगार संघटना आणि संयुक्त राष्ट्रसंघाचे ( यूनो ) दुसरे प्रमुख कार्यालय जिनिव्हात आहे. जागतिक आरोग्य संघटना, आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघटना, जागतिक हवामान संघटना, जागतिक व्यापार आणि विकास परिषद मंडळ अशा यूनोच्या विविध कार्यक्रमाधिष्ठित संघटनांची कार्यालये जिनिव्हात आहेत. सरोवरांनी वेढलेल्या या सुंदर नगरात आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या बैठका नेहमीच होत असतात. दरवर्षी जिनिव्हातील युनोचे कार्यालय पाहायला दीड ते दोन लाख लोक येत असतात.

‘ दि पॅलेस देस नेशन्स ’ ही यूनोच्या न्यूयॉर्क खालोखाल महत्त्वाच्या दुसऱ्या मुख्यालयाची वास्तू पंचावन्न एकरांवरील एरियाना पार्कमध्ये उभी आहे. सुंदर वृक्षांनी बहरलेली ही जागा जिनिव्हा शहराला १८९० मध्ये गुस्तेव्ह कुटुंबियांनी दान केली. येथील वास्तूतच पहिल्या महायुद्धानंतर ‘ लीग ऑफ नेशन्स ’ ची स्थापना झाली. नुकतीच या जुन्या वास्तूला एकसंधपणे जोडणारी नवी शाखाही बांधण्यात आली आहे.

सरोवरे, आल्पस् पर्वताच्या रांगा, माऊंट ब्लॅंक् यासाठी पर्यटकांना आकर्षून घेणारे स्वित्झर्लंड बँकांसाठीही प्रसिद्ध आहे. स्वीस बँकांच्या अनेक शाखा आम्हाला जिनिव्हात दिसत होत्या. तुम्हाला कोणाला या बँकेत पैसे ठेवायचे असतील तर अवश्य ठेवा, तुमच्या मित्रांनाही समजणार नाही, असा सल्ला आमची गाईड देत होती.



७२६९५

पूर्व युरोपातील आणि पश्चिम युरोपातील भिन्न राजकीय प्रणालीमुळे राज्यकारभारात आलेला फरक सोडला तर एकूण समाज जीवन, सांस्कृतिक जीवन यांत मूलतः फरक दिसला नाही. सार्वजनिक जीवनातील स्वच्छता, सौंदर्य जोपासण्याची आस्था दोन्हीकडे जाणवली. शेजाऱ्याला, सहप्रवाशाला त्रास होऊ नये याची दक्षता दोन्हीकडचे नागरिक काटेकोरपणे घेताना आढळले. चार–सहाजण जमल्यावरदेखील आरडाओरड, गडबडगोंधळ अजिबात नसायचा. रेल्वेने प्रवास करताना तर गर्दी असूनही कोलाहल माजत नव्हता. शांतपणे प्रवासी चढत–उतरत असायचे. अशा सार्वजनिक वाहनांतून प्रवास करताना धूम्रपानही हे लोक करीत नाहीत. वृद्ध, अपंगांसाठी दारानजीकच्या सीटस् राखून ठेवलेल्या असत. निसर्गाच्या संगतीत बेधुंद होऊन, मुक्त होऊन वावरणारे हे लोक आपल्या जीवनाच्या नियमित चाकोरीत अतिशय शिस्तबद्ध, संयत जीवन जगताना दिसत होते.

अत्याधुनिक प्रगतीची अनेक शिखरे या जगाने जिंकली आहेत. स्वयंचलित यंत्राचा वापर खूप आहे. पण यापाठीमागे या मातीत जगणाऱ्या माणसाचे सुख त्यांना हवे आहे. हे सुख ऐहिक पातळीवरचे आहे हे खरे, पण हे सुख व्यक्तीच्या आणि समाजाच्या विकासासाठी पहिल्या प्रथम आवश्यक आहे असे त्यांना निश्चितपणे वाटते. हे सुख मिळाल्यामुळेच बहुधा एक अतिशय संपन्न, समृद्ध, उद्यमशील आणि निरोगी असा समाज येथे दिसला. एक गंमत सांगितली पाहिजे. जिथे गेलो तिथे अनेक माणसे पाहिली. आम्ही भारतीय तिथल्या वेळापत्रकाशी जमवून घेताना गडबडत होतो. पण तिथे उत्साह मावळलेले, दमलेले असे चेहरे जवळजवळ दिसत नव्हते. इतकंच कशाला जांभई देणारा एखादा युरोपियन पुरुष किंवा स्त्री असा मला आठवतदेखील नाही! कारण जांभई देणारी कोणी व्यक्ती अशी बघितलीच नाही!

□ □

# *युरोपची युगंधरा*

युरोपच्या तीन आठवड्यांच्या अभ्यासदौऱ्यात ज्या अनेक गोष्टी परदेशी प्रवासी आणि पत्रकार म्हणून सतत स्मरणात राहतील, पैकी सर्वांत प्रभावी ठसा आहे तो तेथील आत्मनिर्भर स्त्रीचा. चाळीस–पंचेचाळीस वर्षांपूर्वीच्या महायुद्धातून सावरून ज्या ताकदीने, आत्मविश्वासाने या खंडातली चिमुकली राष्ट्रे उभी राहिली आहेत, त्याची जी महत्त्वाची कारणे आहेत, त्यातीलच एक आहे युरोपियन स्त्री. होय, या स्त्रीची जी विविध रूपे या दौऱ्यात पाहिली, त्यावरून युद्धाने खाक झालेले हे देश याच गौरांगनेने उभे केले असतील, याची खात्री पटते.

'लोट' (Lot) या पोलिश एअरलाईन्सने जाताना आणि येताना केलेला प्रवास मला आठवतो. जाताना आमच्या विमानात फार गर्दी नव्हती पण येताना सुमारे ३५० प्रवासी तरी होतेच आणि पल्ला होता जवळपास बारा तासांहून अधिक लांबचा. या संपूर्ण प्रवासात या सर्व प्रवाशांचे जेवण, नाश्ता, त्यांना झोपण्यासाठी ब्लँकेट देणे, सकाळी ओल्या पाण्याच्या नॅपकिन फ्रेश होण्यासाठी देणे, वृत्तपत्र वाचायला देणे, सूचना देणे ही सर्व कामे केवळ ५ ते ६ एअर होस्टेस करीत होत्या. ज्या तत्परतेने आणि लगबगीने त्यांची कामे चालली होती, ती लगबग कौतुकास्पद होती आणि सर्व प्रवाशांच्या सेवा संपल्यानंतर यांतल्या एकदोघी विमानाच्या शिडीजवळच्या पॅसेजमध्ये घाम पुसत 'हाश हुश्श' करीत बसायच्या. विश्रांती ती तेवढीच. सार्वजनिक सेवेत वावरताना लगबग होणारच, पण त्यात कुठेही गोंधळ नसतो. या एअरहोस्टेस याशिवाय अनेक प्रवाशांच्या व्यक्तिगत काही गोष्टींसाठीही सहाय्यभूत ठरायच्या. कुणाला काही त्रास झाला किंवा एखाद्याला बेल्ट बांधता आला नाही तर या भगिनी तत्परतेनं हजर व्हायच्या!

वॉर्सा, बर्लिन आणि ॲमस्टरडॅम या तिन्ही विमानतळांवर पासपोर्ट तपासणी संपल्यानंतर सामानाच्या तपासणी विभागात आम्ही पाहात होतो, तेथे बहुतेक

ठिकाणी स्त्रियाच काम करीत होत्या. सुरक्षा तपासणीसाठीही त्याच रुबाबात वॉकीटॉकी घेऊन विमानतळाच्या विविध विभागांत फिरत होत्या! प्रवाशांना त्यांच्या बॅगा उघडायला लावून पुनः तपासणी करीत अतिशय शिस्तीत आणि न गोंधळता त्या काम करीत होत्या. आम्ही कलाईस बंदरावरून इंग्लिश खाडीतून बोटीने लंडनला येण्यासाठी डोव्हर बंदरावर आलो, तेथेही तपासणी अधिकारी म्हणून अनेक खिडक्यांवर स्त्रियाच काम करीत होत्या.

विमानतळांवरील ' ड्यूटी फ्री शॉप 'मध्येही जवळपास सगळीकडे महिलाच आहेत. ज्या तत्परतेने, आपुलकीने त्या काम करीत असतात, ते उदाहरण सर्वत्रच नमुनेदार ठरावे. आम्ही पाच–सहा, दहा–दहा वेळा किंमती विचाराव्यात, वस्तू पाहायला मागावी आणि त्यांनी ती सतत हसतमुखानं दाखवावी, किंमत सांगावी असंच चालू होतं.

इंग्लिश खाडीतून ' ड्यूटी फ्री सी शॉप 'मध्ये आम्ही खरेदीसाठी गेलो, तिथेही याच महिला अत्यंत चपळाईनं, उत्साहानं काम करताना दिसत होत्या. बोटीवरच्या रेस्टॉरंटमध्येही त्यांचीच अत्यंत उत्तम सर्व्हिस चालू होती. बर्लिनमधल्या तीन तासांच्या बोटीवरील अविस्मरणीय सफरीतही अनेक वेट्रेस प्रवाशांना गार, गरम पेये, स्नॅक्स देत होत्या. बोटीच्या खालच्या, वरच्या डेकवर मिळून तर शेकडो प्रवासी होते! पण अतिशय नेमकेपणाने त्यांची कामं चालू असायची. डोव्हर बंदरावरून गाडीतळापाशी नेण्यासाठी ज्या बसेस असायच्या, तिथे मार्गदर्शिका म्हणून, ड्रायव्हर म्हणूनही बऱ्याच महिला काम करताना दिसल्या. हे सारंच अनोळखी, आश्चर्यकारक आणि यापूर्वी कधीच न बघितलेलं समाजचित्र मी पाहात होतो.

आमच्या इतिहासातल्या, परंपरेतल्या अनेक महान, धुरंधर स्त्रियांची नावं मला आठवत होती, लक्ष्मी, सीता, मंदोदरी, द्रौपदी या प्रातःस्मरणीय देवींची नावे मी फार पूर्वीच ऐकली होती. जिने शिवबाला स्वराज्याची प्रेरणा दिली ती जिजाबाई माझ्या अभिमानाचा विषय आहे. झाशीची राणी लक्ष्मीबाई माझ्यासारख्यांना आजही स्फूर्तिप्रद आहे. आणि ज्या साध्वीनं नवऱ्याच्या खांद्याला खांदा लावून ज्ञानाची ज्योत समाजानं, धर्मानं नाकारलेल्या स्त्रीजातीपर्यंत नेली, त्या सावित्रीबाईंना तर आज मी मनोभावे वंदन करतो. आपल्या या खंडप्राय देशाची पंतप्रधान इंदिराजींसारखी एक स्त्रीच होती ही

गोष्ट मला गौरवाची वाटते आणि तरीही युरोपातील स्त्रीशक्ती मला या सर्वांहून वेगळी–आगळी वाटत होती, दिसत होती!

थोर, महान स्त्रियांच्या परंपरेचा, कर्तृत्वाचा इतिहास आपला नक्कीच आहे. पण तरीही आपल्या देशाची ५० टक्के लोकसंख्या मुकीच आहे, त्यांच्या शक्तीचा इथे कोठे उपयोग होतो? रुपकुंवर इथे सती जाते आहे आणि 'हुंड्यासारख्या' अनुचित प्रथेमुळे रोज एखादी मायबहीण जाळून मारली जाते आहे! चूल, मूल आणि मरण या चौकटीचा भोगवटा आज माझ्या देशातील बहुसंख्य मायबहिणींच्या कपाळी आहे आणि मी युरोपात पहात होतो, हे सारं चित्र विसरायला लावणारी, स्वतःच्या आत्मसामर्थ्याने, स्वतःच्या ठणठणीत अस्तित्वाने सर्व क्षेत्रांत अनिरुद्ध संचार करणारी विज्ञान युगातली युगंधरा!

होय, मी या स्त्रीला युगंधराच म्हणेन! दोन महायुद्धांत तरुणांच्या दोन पिढ्या खतम झाल्यानंतर युरोप खंडात कोण राहिलं होतं? घरटी एक–दोन, एक–दोन तरुण पुरुष मरण पावले होते! आणि इतिहासाने मोठ्या क्रूरपणे समोर दिलेले आव्हानांच ताट या युगंधरेनं स्वीकारले! हे आव्हान नवनिर्माणाचे होते! राखेतून देश उभा करण्याचे होते! आणि या युगंधरेच्या तर सर्वांगाला महायुद्धातील राखच फासलेली होती! विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सन्मानाने, सामर्थ्याने साऱ्या देशाला जगवण्याचे, उभारण्याचे आव्हान या युगंधरेसमोर होते!

सर्व थरांवरच्या उद्योगक्षेत्रांत, व्यवसायांत त्यानंतर मोठ्या हिमतीने युरोपियन स्त्री उतरली आणि युरोपात मन्वंतर घडले! हे मन्वंतर आम्ही पाहात होतो, अनुभवत होतो. अजिबात न बिचकणाऱ्या, अकारण न संकोचणाऱ्या, सदैव सहकार्यासाठी तत्पर असणाऱ्या अशा महिलांचंच या खंडावर आता राज्य आहे, हे आम्ही पाहात होतो.

असं कुठल्याही क्षेत्र आज सांगता येणार नाही, की जिथं युरोपियन स्त्री दिसत नाही, काम करीत नाही. वॉर्सामधल्या सावा या डिपार्टमेंटल स्टोअरमध्ये तर अक्षरशः सगळ्या महिलाच काम करीत होत्या. त्या तीन–चार मजली अवाढव्य इमारतीत सर्व विभागांतील स्टॉल्स महिलाच चालवीत होत्या. कॅश काऊंटरवर देखील त्याच होत्या! आम्ही ज्या मोठ्या हॉटेलातून मुक्काम केला,

ज्या उपाहारगृहात जेवण घेतले त्या सर्व ठिकाणी (भारतीय उपाहारगृहे वगळून) महिला वेटरच काम करीत होत्या. मोठ्या तारांकित हॉटेलमधून रिसेप्शन काऊंटर, बँक–काऊंटर या सर्व ठिकाणी महिलाच दिसत होत्या. बर्लिन, जिनिव्हा, लंडन या सर्व प्रमुख शहरातील बँकांमध्येही महिलांचे प्रमाण मोठे होते आणि कसलाही गोंधळ न करता, बेपर्वाई न करता लोकांची कामे पटापट होत असायची.

स्वित्झर्लंडमध्ये एका सुंदर सकाळी हॉटेलातल्या बाल्कनीतून मी खाली पाहिले, तो एक स्त्रीच ट्राम चालवीत होती! या खंडात पुरुष नाहीत की काय? असेही प्रश्न काहींच्या मनात येत होते. अगदी लोकसंख्येच्याच भाषेत सांगायचे म्हटल्यास फार तर ३ ते ५ टक्के महिलांची संख्या पुरुषांपेक्षा पूर्व जर्मनी, हॉलंडमध्ये जास्त आहे. पुरुष–स्त्रियांच्या संख्येतील फरक हा यापेक्षा फार मोठ्या प्रमाणात नाही.

येथील महिलांचे आणखी एक क्षेत्र म्हणजे विविध संग्रहालयांतील मार्गदर्शनाचे. अनेक ऐतिहासिक कलाकृती असलेली संग्रहालये आणि भव्य राजवाडे या सर्व ठिकाणी प्रत्येक दालनात मार्गदर्शिका असतात. प्रत्येक दालनातील कलाकृतीची, वस्तूची सुरक्षितता जपण्यासाठी अनेक महिला कामाला असतात. अगदी आत जाताना तुम्हाला संग्रहालयात वापरण्यासाठी स्लीपर देण्यापासून तो बाहेरच्या दारात निरोप देईपर्यंत याच महिला तत्पर असतात. असेच एक क्षेत्र म्हणजे पर्यटकांना 'गाईड' म्हणूनही बहुधा महिलाच असतात. सुप्रसिद्ध ऐतिहासिक वास्तूंजवळ, केंद्राजवळ बऱ्याच ठिकाणी विविध वस्तूंची दुकाने (सॉवेनियर शॉप) असतात. हॉटेलमध्येही अशा प्रकारची दुकाने असतात. या दुकानांची देखभाल, विक्री महिलाच करीत असतात. तेथेही महिलाच काम पाहतात. शेकडो ग्राहक दुकानात फिरत असतात. पण या महिलांची कार्यक्षमता तसूभरही ढळत नाही. मोठमोठ्या हमरस्त्यांकडील या पद्धतीची आकर्षक दुकाने महिला चालवीत असतात. अतिशय पटापट किंमती सांगून, वस्तूंचे आकर्षक पॅकिंग करून हसतमुखानं त्या ग्राहकाच्या स्वाधीन वस्तू करतात, तेव्हा खर्चाचे काही वाटत नाही! एखादी परवडणारी वस्तू शोधण्याचा ग्राहक प्रयत्न करीत असेल तर त्यासाठीही त्याला त्या मदत करतात.

केवळ दुकानदारी, विक्री, व्यवसाय यातच ही स्त्री नाही, तर अतिशय मोठ्या जबाबदारीच्या जागेवरही ती दिसते. पूर्व जर्मनीच्या परराष्ट्र मंत्रालयातले उच्च अधिकारी आमच्याशी बोलत होते. तेव्हा एक स्त्रीच इंटरप्रीटर ( दुभाषा ) म्हणून तडफेनं काम करीत होती. राजकीय, आर्थिक विषयावरचं या अधिकाऱ्यांचं भाष्य, कुशलतेने ती इंग्रजीत रूपांतर करून सांगत होती. यंत्रापेक्षाही वेगाने आणि अचूक असं तिचं काम चालू होतं.

चॉकलेटस्च्या, खेळण्यांच्या, भेटकार्डांच्या दुकानांत आणि टपाल कचेऱ्यांतही याच युरोपियन स्त्रीने आपले स्थान असेच ठेवले आहे. आपल्यासारख्या परदेशी प्रवाशाचा गोंधळ त्या समजून घेतात आणि•मदतही करतात. त्यात कुठेही अहं नसतो. दर्प नसतो. असते केवळ निव्वळ सहकार्याची वृत्ती !

मला वाटतं याचं स्त्रीनं या साऱ्या खंडातील स्वच्छता, सौंदर्याची जपणूक केली आहे. केवळ माझं पोट किंवा कुटुंबाचा चरितार्थ ही एकमेव प्रेरणा या स्त्रीची नक्कीच नाही. आपल्या देशाचं नाव मोठं करणारी, देशाला मोठं करणारी आणि त्यासाठी धडपडणारी ही स्त्री आहे. तिच्या या प्रयत्नाला पुरुषांची साथ आहे, सरकारचं हार्दिक सहकार्य आहे त्यामुळं ती जेव्हा गर्भवती राहते तेव्हा तिला सुटी भरपूर मिळते. बाळंतपणाचा तिचा काळ सुखमय व्हावा म्हणून अनेक चांगल्या सुविधा सरकार पुरवते आणि हे मातृत्वाचं तेज घेऊन आपल्या दीड–दोन महिन्यांच्या तान्हुल्याला बाबागाडीतून घेऊन ती जेव्हा बाहेर फिरायला निघते, तेव्हा रस्ता ओलांडतानाही शेकडो किलोमीटर वेगाने जाणाऱ्या मोटारी ती पलीकडे जाईपर्यंत थांबून राहतात. देशाच्या भवितव्याची जणू ही मजबूत पायाभरणीच असते !

जीनचा शर्ट, पँट पेहरून, मस्तपैकी सोनेरी केस उडवीत कानात वॉकमन अडकवून जाणारी तरुणी जशी लंडनच्या पार्लमेंटसमोर पाहिली, तशीच आपल्या प्रियकराला आवेगात आलिंगन देणाऱ्या प्रेयसींची गर्दी आयफेल टॉवरच्या परिसरात पाहिली ! जगण्याचा प्रत्येक क्षण मनमुराद भोगण्याचा हा सर्वांचाच प्रयत्न होता. आणि प्रौढ असलेले स्त्री–पुरुष अगदी आपली मुलंबाळं बरोबर घेऊन खरेदीच्या सामानाच्या पिशव्या घेऊन झकासपैकी मेट्रोने, ट्रामने जाताना आम्ही पाहात होतो ! एखादे पिताजी आपल्या लाडक्या

लेकीचा हात धरून चालत असायचे तर त्यांची बायको तान्ह्याला बाबागाडीत घेऊन सोबतीला असायची.

पाश्चात्त्य देशातले आणि आपल्याकडचेही समाजशास्त्रज्ञ तिथल्या कुटुंबजीवनाबद्दल चिंता व्यक्त करताना दिसतात. कारण घटस्फोटाचं, पौगंडावस्थेतील कुमारी मातांचं प्रमाण हे विलक्षण आहे. पण यातून सावरून निघून स्वतःच्या पायावर भक्कमपणे उभी राहणारी तिथली स्त्री आहे. वर सांगितलेल्या समस्या गंभीर आहेत हे खरे, पण त्यामुळे त्या स्त्रीच्या जीवनाची वाताहत होत नाही. कारण सामाजिक जीवन हे त्यादृष्टीने खूप प्रगत, एकसंध आहे. देशावरील निष्ठेशी ते जोडलेले आहे. आपल्या व्यक्तिगत दुःखाचा बाऊ करून रोजच्या दैनंदिन व्यवहारावर, कामावर परिणाम करायचा नाही या वृत्तीचे इथले स्त्री–पुरुष आहेत. त्यामुळे घराघरांत जरी मतभेद असले, मने दुभंगत असली तरी देशाच्या एकात्म रूपाला तडे जात नाहीत!

आमच्या या छोटचा प्रवासात व्यसनाने त्रस्त असलेल्या व्यक्ती दिसल्या नाहीत. मद्यपान, धूम्रपान हे इथल्या स्त्री वर्गातही मोठ्या प्रमाणात चालते. पण सार्वजनिक ठिकाणी मात्र या गोष्टी बहुधा टाळल्या जातात. त्यामुळे पिऊन पडलेला कोणी आढळला नाही. एक अत्यंत संपन्न, निकोप तन–मनाचा समाज सर्वत्र दिसत होता आणि या समाजाची भाग्यविधाती आहे ती इथली स्त्रीच!

'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाचा उद्धार करी' असं एक सुभाषित लहानपणापासून मी ऐकत आलो आहे. खरं असं आहे की, जिच्या हाती पाळण्याची दोरी आहे, तिला स्वतःचा उद्धार करण्याची एवढीशीही संधी आपल्या समाजव्यवस्थेत नाही! जे काही तिला करावं लागतं ते मानेवरचं जू म्हणून. स्वतःचा आत्मसन्मान म्हणून निश्चितच नाही! 'मुकी बिचारी कुणी हाका' अशीच जणू आपल्याकडच्या बहुसंख्य स्त्रीची अवस्था. वर दिलेलं सुभाषित सार्थ वाटावं असं स्त्रीचं स्थान आणि सामर्थ्य मला युरोपात सर्वत्र दिसत होतं आणि मी परतीच्या प्रवासात याच विचारानं अंतर्मुख झालो होतो.

## दि थेम्स बॅरिअर

युरोपच्या प्रवासात मेट्रोसारखी आश्चर्यकारक अशी वाहतुकीची सुविधा पाहायला मिळाली. अनेक ठिकाणी रस्त्यांवरही दोन-चार किलोमीटर लांबीचे भुयारी मार्ग आम्ही ओलांडून पुढे जात होतो. लंडनच्या अशाच एका प्रवासात नवल घडले. 'दि थेम्स बॅरिअर' पाहून आम्ही डेली टेलिग्राफच्या छपाई विभागाला भेट देण्यासाठी एका भुयारी मार्गातून निघालो आणि आमचे मार्गदर्शक असलेले ब्रिटनचे एक माहिती अधिकारी पीटर रिया म्हणाले, "मित्रांनो, आपण आता थेम्सच्या खालून जात आहोत. वर थेम्स वाहते आहे. !" आम्हाला खरोखरच नवल वाटले. थेम्स ही लंडनमधून वाहणारी मोठी नदी. लंडनच्या नावाशी तिचं नातं फार जुनं आहे.या नदीवर उभारलेले पूरप्रतिबंधक ( दि थेम्स बॅरिअर ) पाहण्यासाठी आम्ही थेम्स फ्लड बॅरिअर व्हिजिटर्स सेंटरला भेट दिली. या केंद्राचे व्यवस्थापक एस. ग्लिसन यांनी जगातलं आठवं आश्चर्य मानल्या गेलेल्या या थेम्स बॅरिअरची आम्हाला माहिती दिली.

आम्ही थेम्सच्या दक्षिण तीरावर उभे होतो आणि श्री. ग्लिसन आम्हाला थेम्सच्या प्रवाहात होडीच्या शिडाप्रमाणे उभे असलेले बॅरिअर्स दाखवीत होते. गेली अनेक वर्षे लंडन शहर पुराच्या संकटाने वेढलेले असायचे. प्राणहानी, वित्तहानी मोठ्या प्रमाणावर व्हायची. इ.स. १०९९ पासून प्रचंड पुराने लंडनमधील जनजीवन विस्कळित झाल्याच्या, नुकसान झाल्याच्या नोंदी आहेत. या शतकातील १९२८ आणि १९५३ या दोन वर्षांतील भयानक पुराचे अनुभव तर लंडनवासियांच्या मनात तसेच आहेत. या पुरामुळे गॅस, वीज आणि पिण्याचे पाणी यांचा तुटवडा कसा पडला याचे अनेक वृत्तांत त्यावेळी टाईम्स,टेलिग्राफने प्रसिद्ध केले होते. याच काळात लंडनवासियांना न परवडणारी गोष्ट झाली ती म्हणजे अंडरग्राऊंड रेल्वेची वाहतूकही बंद पडली होती. संपूर्ण दैनंदिन जीवन विस्कळित करणाऱ्या, अनेकदा ठप्पच करणाऱ्या थेम्सच्या पुरापासून लंडनला वाचविण्यासाठी थेम्स बॅरिअर उभारण्यात आले, असे श्री. ग्लिसन म्हणाले.

लंडन शहराची उभारणी ज्या पिवळ्या चिकणमातीवर झाली आहे, त्यामुळेही अगदी सावकाश का होईना, पण ते खचते आहे. श्री. ग्लिसन यांच्या माहितीप्रमाणे दर शंभर वर्षांमध्ये हे शहर खचण्याचे प्रमाण १।१०० सें.मी. आहे. अटलांटिक समुद्राला येणाऱ्या भरतीचा लोंढा या थेम्सकडेच येतो आणि नदीचे पाणी प्रचंड वाढते. हिमनगांच्या वितळण्यात मोठी वाढ झाल्यामुळे जगातील सर्वच समुद्राच्या पाण्यातील भर वाढली असून त्याचा परिणाम भरतीचे प्रमाण वाढण्यातही साहजिकच झाला आहे. गेल्या शतकभरात या भरतीच्या प्रमाणात ६० सें.मी. वाढ झाली असल्याचे स्पष्ट दिसते.

थेम्सच्या पुराच्या प्रपातापासून लंडन शहराला संरक्षित करण्यासाठी लंडन बंदर • प्राधिकरण, लंडन महानगर परिषद (ग्रेटर लंडन कौन्सिल – जी.एल.सी.) आणि थेम्स अँग्लियन अॅण्ड सदर्न वॉटर अॅथॉरिटी यांनी चर्चा करून निश्चित योजना तयार केली. १९७० मध्ये यासंबंधीची सर्व जबाबदारी जी.एल.सी.ने स्वीकारली. रेण्डल, पाल्मर आणि ट्रिटॉन या इंजिनिअर्सकडे हे काम सोपविण्यात आले. चर्चेच्या दरम्यान अॅलन प्राइस या लंडन बंदर प्राधिकरणातील एका इंजिनिअरने हलत्या बॅरिअरची कल्पना मांडली. त्यांच्या मते यामुळे जहाजांना नदीतून वाहतूकही करता येईल आणि भरतीच्या लाटांना थोपविणेही शक्य होईल. या सूचनेबरोबरच बॅरिअरच्या निर्माण कार्यात असलेल्या इंजिनिअर्सनी विविध प्रकारच्या हलत्या बॅरिअर्ससंबंधी विचार केला.

मात्र बॅरिअरचा अंतिम आराखडा या कामात असलेल्या इंजिनिअर्सपैकीच असलेले एक चार्लस् ड्रेपर यांना अचानक सुचला. स्वयंपाकघरात गॅस बंद करण्यासाठी त्यांनी बटण फिरवले व त्यांना या बॅरिअरच्या आराखड्याची कल्पना सुचली. गॅस सुरू, बंद करण्याच्या बटनाप्रमाणेच बॅरिअर्सची ही गेटस् आहेत. भरती आली की प्रतिबंधक गेट ती थोपविते.

यातून १९७५ मध्ये प्रत्यक्ष काम सुरू झाले. १९८३ मध्ये बॅरिअर्सचे काम संपून पहिली चाचणी घेण्यात आली आणि ती यशस्वीरीत्या पार पडली. ८ मे १९८४ रोजी राणी एलिझाबेथ यांनी या आश्चर्यकारक आणि मानवी

कल्पकता, बुद्धी, अत्याधुनिक तंत्रज्ञान यांचा असामान्य अविष्कार असलेल्या या थेम्स बॅरिअरचे औपचारिक उद्घाटन केले.

या संपूर्ण पोलादी बांधणीच्या बॅरिअरच्या उभारणीसाठी ५०० मिलियन पौंडस् ( ११०० कोटी रुपये ) इतका खर्च आला. केंद्र सरकारने यातील ७५ टक्के खर्च केला. उरलेला लंडन महानगर परिषदेने केला. या बॅरिअरच्या देखभालीचा, कामाचा खर्च दरवर्षी तीन मिलियन पौंडपेक्षाही ( ६ कोटी ६० लाख रुपये ) जास्त येतो.

या अभूतपूर्व प्रकल्पाच्या उभारणीत इंग्लंडचे ४००० स्त्री–पुरुष ८ वर्षे कार्यरत होते. जगातील सर्वोत्कृष्ट असे पूरप्रतिबंधक म्हणून या प्रकल्पाचा तज्ज्ञांनी गौरव केला आहे. 'कॉन्क्रीट सोसायटी अँड फॉर स्ट्रक्चरल स्टील डिझाईन' या संस्थेचे विशेष पारितोषिक या प्रकल्पाला मिळाले आहे.

थेम्सच्या दक्षिण तीरावर दहा मजली उंचीचा या बॅरिअर्सचा नियंत्रण मनोरा आहे. जनरेटर आणि वर्कशॉप येथेच आहे. पोलादी अस्तर असलेल्या छताखाली हा नियंत्रण विभाग आहे. अवघे ६५ लोक या विभागात काम करतात आणि संपूर्ण थेम्स बॅरिअरचा प्रकल्प कार्यरत ठेवतात. या बॅरिअर्सना प्रत्येकाला स्वतंत्र नियंत्रण कक्ष आहे. जेव्हा या मनोऱ्यावरील नियंत्रण विभागात बिघाड होईल तेव्हा हे स्वतंत्र नियंत्रण कक्ष उपयुक्त ठरतात. प्रकल्प नियंत्रण मनोऱ्याशी वुलविच रेडिओ केंद्राचा संपर्क असतो. लंडन आणि पलीकडील बेटांमधून येणारी जहाजे, तेथील हवामानातील ठळक बदल यांची पहिली माहिती या रेडिओ केंद्रामार्फत बॅरिअर्सच्या नियंत्रण कक्षाला मिळते. जहाजांसाठी मार्ग खुला असल्याचा हिरवा कंदील मग दिला जातो. या बॅरिअर्समधील मुख्य प्रवेशद्वार ६१ मीटर रुंदीएवढे मोठे आहे. जेव्हा मार्ग खुला होतो तेव्हा बॅरिअर्स थेम्सच्या प्रवाहाखाली जातात. सर्वसाधारण हवामान असताना जहाजांच्या वाहतुकीला अडथळा होत नाही. वुलविच रेडिओ केंद्राशी संपर्क असल्याने वातावरणातील बदलाची पूर्वसूचना मिळते आणि जहाज वाहतुकीसाठी त्याचा उपयोग होतो. उत्तर स्कॉटलंडपर्यंत हवामान कसे आहे, भरती येते की नाही याची पूर्वसूचना या केंद्रामार्फत नियंत्रण कक्षाला मिळते व बॅरिअर्सचे काम सुरू होते. वातावरणातील बदलाच्या या सूचना

सुमारे १२ तास अगोदर मिळतात. प्रत्यक्ष पूरप्रतिबंधक दरवेळी कार्यान्वित व्हायला केवळ २० मिनिटे इतका वेळ पुरतो. ८ एप्रिल १९८४ रोजी याची एक चाचणी घेतली तेव्हा ११ मिनिटे लागली होती. एकूण अनुभव असा की, १० मिनिटे या कामासाठी पुरतात. दरवाजे उघडायचे की बंद करायचे, हवामान कसे आहे, वादळ येणार की नाही या सर्व सूचना नियंत्रण कक्षाला पुरेशा अगोदर मिळतात व बॅरिअर्सची उपयुक्तता किती आहे याची साक्ष पटते. आता लंडन पुरापासून सुरक्षित आहे. कारण ' थेम्स बॅरिअर ' तेथे आहेत !

□ □

# बर्लिनची भिंत इतिहासजमा होईल ?

पूर्व जर्मनी, पोलंड, इंग्लंड, हॉलंड, बेल्जियम, स्वित्झर्लंड आणि फ्रान्स या देशांचा धावता दौरा करून आम्ही परतलो; तेव्हा त्या स्मृती बऱ्याच काळ रेंगाळत होत्या.

आता पुनः एकदा पूर्व युरोपीय देशांत जे बदल होत आहेत; त्यामुळे काही आठवणी जाग्या झाल्या आहेत. १९८७ च्या ऑगस्टमध्ये भारतात जेव्हा दौऱ्यावरून आम्ही परतलो; तेव्हा अनेकांनी आम्हाला विचारले होते की, परत परदेशी जाण्याची संधी मिळाली तर तुला कोणत्या देशाला जाणे आवडेल ?

मी क्षणाचाही विलंब न करता उत्तर दिले होते, 'पूर्व जर्मनी!'.

त्याची कारणेही तशीच होती. मला ती पटत होती. पण इतरांना पटतीलच असे मी म्हणणार नाही.

बर्लिन भिंतीमुळे त्याचे पूर्व आणि पश्चिम बर्लिन असे दोन भाग पडले आहेत. या भिंतीच्या अलीकडे पूर्व बर्लिन व पलीकडे पश्चिम. पूर्व बर्लिनमध्ये अनन्वित अत्याचार सुरू आहेत आणि सगळे तरुण पश्चिम बर्लिनमध्ये जायला उत्सुक आहोत असे चित्र खूप रंगविण्यात आले आहे. ही भिंत बांधली त्याच्या आरंभीच्या काळात यात तथ्य होते. आम्ही तिथे होतो त्या काळात यात खूपच फरक पडलेला होता. आमच्या गाईडने तर याबाबत खूपच गंमतीदार माहिती दिली. या भिंतीच्या सीमेजवळ असणाऱ्या नद्या, तलाव यातून अनेकदा पूर्व आणि पश्चिम बर्लिनचे तरुण- तरुणी होड्या फिरवत फिरवत संचार करीत असतात. त्याची फारशी दखलही घेतली जात नाही. याहून एक गंमतीदार अनुभव आम्हालाही आला. बर्लिनच्या (अर्थातच पूर्व) अलेक्झांड्रा प्लेस भागात आम्ही चलन- विनिमय करायला गेलो होतो. जवळच एक सुंदर स्त्री-शिल्प कारंजांच्या तुषारांनी न्हात होते. त्या शिल्पाचे फोटो घ्यावेत म्हणून आम्ही जवळ गेलो. तिथे चार जर्मन तरुण डोक्यावर हॅट,

पँट, कोट खास शाही वेषात होते. या शिल्पाशेजारी ऐटीत उभ्या असलेल्या त्या चौघांचा आम्ही फोटो घेतला. त्यांना सहज विचारले, तुम्ही कुठून आलात म्हणून. तर त्यांनी उत्तर दिले– पश्चिम जर्मनीतून. याचा अर्थ स्पष्ट आहे, बर्लिनची भिंत भावनिक नात्याला कायमचा बांध घालू शकत नाही.

जर्मन म्हणून बर्लिनच्या दोन्ही बाजूच्या नागरिकांना एकमेकांबद्दल आस्था आहे, प्रेम आहे आणि ओढही आहे. सध्या जे नवे प्रवाह पूर्व युरोप आणि कम्युनिस्ट देशांत वाहत आहेत; ते विचारात घेता हा भिंतीचा अडसर नक्कीच दूर होणार आहे ! रशियातील ग्लासनोस्तचे प्रवर्तक मिखाईल गोर्बाचेव आहेत; तोपर्यंत यासंबंधीच्या निर्णय झाल्याशिवाय राहणार नाही अशी आशा प्रत्येक जर्मन माणूस बाळगून आहे. शेवटी असे होणे हे स्वाभाविकच आहे.

गेल्या ऑक्टोबर महिन्यात पूर्व जर्मनीने आपला चाळिसावा वर्धापन दिन साजरा केला. गोर्बाचेव यांच्या प्रमुख उपस्थितीत जर्मन नागरिकांनी या वर्धापन दिनाचा सोहळा साजरा केल्याच्या बातम्याही आता शिळ्या झाल्या आहेत

पण गेल्या दोन महिन्यांत पूर्व जर्मनीत जे घडते आहे; त्याकडे तिथल्या कट्टर कम्युनिस्ट राजवटीचे, नागरिकांचे गोर्बाचेव निश्चितच लक्ष वेधून घेणार आहेत; ते काही प्रश्नांनी.

'टाईम' सारखी आंतरराष्ट्रीय मासिके पूर्व जर्मनीतून पश्चिम जर्मनीकडे निघालेल्या नागरिकांच्या मुलाखती प्रसिद्ध करीत आहेत. हंगेरीतून या जर्मन लोकांना पश्चिम जर्मनीत पाठवण्याचा मार्ग खुला झाला आहे. पश्चिम जर्मनी सरकारने या आपल्या भावांचे स्वागत केले आहे. मुक्तीचा मार्ग सापडल्यासारखे हजारो पूर्व जर्मन स्त्री– पुरुष भिंत ओलांडून हंगेरीमार्गे ऑस्ट्रियातून पश्चिम जर्मनीत चालले आहेत. वॉर्सा कराराचा भंग झाल्याचा आरोप हंगेरीवर केला जात आहे. गेल्या महिन्यापर्यंत १४ हजार पूर्व जर्मन पश्चिमेकडे आले आहेत. ८९ च्या अखेरीपर्यंत व लाखाहून अधिक पूर्व जर्मन पश्चिमेकडे स्थलांतर करण्याची शक्यता 'टाईम' ने व्यक्त केली होती. १९६१ साली बर्लिन विभागणारी भिंत बांधल्यानंतर पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणावर पूर्वेकडून स्थलांतरांचा लोंढा पश्चिमेकडे गेला आहे. आणि म्हणूनच पश्चिम जर्मनीतल्या तपासणी नाक्यापाशी येताच या तरुणांनी शॅम्पेनच्या बाटल्या फोडून आनंद व्यक्त केल्याच्या बातम्या आहेत.

'अखेर आम्ही मुक्त झालो!' या शब्दांत पूर्व जर्मनीतून आलेल्या या नागरिकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. या प्रत्येकासाठी स्वतंत्र पासपोर्ट, १२५ डॉलर्स, कमी व्याजदराने पाच हजार डॉलर्सचे कर्ज, बेकार आणि आरोग्य भत्ता, तसेच मोफत भोजन– निवासाची सुविधा पश्चिम जर्मनीने उपलब्ध करून दिली आहे. ज्या हंगेरीने पश्चिम जर्मनीचे दरवाजे त्यांना खुले केले; त्या देशाच्या कम्युनिस्ट पक्षाचे एक धुरीण इमरे पॉझ्गाय (IMRE POZSGAY) यांनी हंगेरीने मानवी हक्कांच्या उच्चतम तत्त्वांशी असलेल्या निष्ठेपोटीं हे पाऊल उचलल्याचे स्पष्ट केले आहे. याच मार्गाने पश्चिम जर्मनी आणि इतर युरोपीय राष्ट्रांशी व्यापार– उद्योगाचे संबंध बळकट करण्याची अपेक्षा बुडापेस्टच्या मनात आहे. ही त्याची सुरुवात आहे.

या पार्श्वभूमीवर म्हातारे झालेले हयोनेकर (वय ७७) यांना आता नीटसे दिसूही शकत नाही ही वस्तुस्थिती समोर आली आहे. पण त्यांची जागा घेणारे इगॉन क्रेन्झ् (५२) आणि गुंथर मितांग (६२) हे पॉलिट ब्युरोचे दोन नेते जुन्या विचारांच्या प्रभावाखालचे म्हणूनच मानले जातात. हयोनेकर जाऊन हे आले तरी पूर्व जर्मनीच्या सद्यःस्थितीत अजिबात फरक पडू शकत नाही, असे बॉन आणि पश्चिम बर्लिनच्या 'टाईम' प्रतिनिधींचे प्रतिपादन आहे.

अशी स्थिती असताना रशियाची काय भूमिका राहील? अलीकडचे चित्र असे दिसते की, पूर्व युरोपात होणाऱ्या अंतर्गत बदलाबद्दल क्रेमलिनने हस्तक्षेप करायचा नाही; अशी स्वच्छ भूमिका घेतली आहे. रशियन कम्युनिस्ट पक्षाच्या केंद्रीय समितीच्या आंतरराष्ट्रीय विभागाचे प्रमुख व्हॅलेंटिन फॅलीन यांनी अलीकडेच सांगितले की, क्रेमलिनमधून देण्यात आलेला सल्ला पूर्व जर्मनीच्या सत्ताधाऱ्यांनी सरळ सरळ धुडकावून लावला आहे! येत्या वर्षभरात पूर्व जर्मनीत त्या सरकारला आवरता न येणारा जनक्षोभ उसळेल असेही भाकित त्यांनी केले आहे.

पण पूर्व जर्मनीच्या स्थलांतरितांचा प्रश्न चर्चेला जात असतानाच हयोनेकर यांचे उजवे हात समजले जाणारे मितांग म्हणाले आहेत की, 'लोकांच्या भल्यासाठी आम्ही जो मार्ग पत्करला होत; त्यापासून कोणीही आम्हाला परावृत्त करू शकत नाही म्हणून!'

पण सोविएत रशियातील फॅलिनसाहेबांचे म्हणणे खरे होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. लाईपझिग शहरातील देखण्या आणि प्राचीन कालीन निकोलस चर्चमधून प्रार्थना संपवून लोक परत बाहेर पडले आणि त्यांनी मोर्चा काढला. रस्त्याने ते गाणी गात, घोषणा देत निघाले होते! त्यातल्या पन्नास जणांच्या एका समूहाला पोलिसांनी अटक केल्याची बातमी नुकतीच वाचली.

खरंच घडतंय का हे? की पाश्चिमात्य वृत्तपत्रांच्या मक्तेदारीतून पूर्व जर्मनीतले हे एवढेच चित्र रंगवले जातेय? ते काहीही असो; पण बदलाचे वारे वाहू लागले आहेत. आणि मला मार्क्स, एंगल्सच्या आणि देश उभा करणाऱ्या जर्मन तरुणांच्या जिद्दी वृत्तीचा प्रतीक असलेला पूर्व जर्मनी प्यारा वाटतो आहे....

हिटलर काळाची आठवणही न काढणारा पूर्व जर्मनी हा देश आज एक प्रगत आणि सुंदर देश आहे. मुलांसाठी, स्त्रियांसाठी विविध योजना तिथे राबवल्या जात आहेत. बार्लेन, लाईपझिग आणि पोट्सडॅम ही शहरे आम्ही पाहिली आणि मंन तृप्त होऊन गेले; डोळे सुखाने भरुन आले.

बर्लिनचे स्थान जर्मनी आणि युरोपच्या इतिहासात असाधारणच असे आहे. आज ७५२ वर्षे वयाचे असलेले हे शहर शांतता आणि युद्ध, पुरोगामी आणि प्रतिगामित्व यांच्यातल्या संघर्षाचे अनेकवेळा प्रमुख केंद्र बनले आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या वणव्यातून ज्या महिलांनी जिद्दीने बर्लिन शहर वाचवण्याचा प्रयत्न केला; अशा एकेक महिलेचा दरवर्षी सत्कार तिथे केला जातो. आतापर्यंत १३७ महिलांचा या रितीनें सत्कार बर्लिनच्या महापौरांच्या हस्ते झालेला आहे. या महिला चांगले जीवन जगत आहेत ना; याची काळजीही घेतली जाते.

आज उभे असलेले बर्लिन हे शांततेचे प्रतीक मानले गेले आहे. शांतता आंदोलन हे साऱ्या जर्मनीचेच एक नित्याचे कर्तव्य बनले आहे. 'द पीस कॉन्सिल' त्यासाठी सर्वांना एकत्र आणते. अमेरिका आणि रशिया या दोन महासत्तांनी अण्वस्त्रविरोधी भूमिका घेतली त्याला पूर्व जर्मनीने हार्दिक पाठिंबा दिला आहे. रिकूजविक परिषदेत त्यावेळचें अमेरिकेचे अध्यक्ष रोनाल्ड रेगन यांना गोर्बाचेव्ह यांनी इ.स. २००० च्या अखेरीपर्यंत संहारक अण्वस्त्रे व. क्षेपणास्त्रे नष्ट करण्याचा जो नियोजनबद्ध कार्यक्रम सुचवला; त्यालाही या शांतीप्रिय जर्मन लोकांनी पाठिंबा दिला आहे.

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एंगल्स या दोन तत्वज्ञांचे बर्लिनशी विशेष नाते आहे. साम्यवादाची शास्त्रीय तत्वप्रणाली कम्युनिस्ट लीगची स्थापना करून मार्क्सने येथेच पहिल्यांदाच ठोसपणे प्रतिपादन केली. १८४४ साली बर्लिनमधल्या कामगारांनी संपाचे पहिल्यांदा हत्यार उचलले त्यावर मार्क्सच्या विचारांचाच पगडा होता. ऑक्टोबर १९३६ मध्ये मार्क्सने कायदद्याचा विद्यार्थी म्हणून बर्लिन विद्यापीठात प्रवेश घेतला. तत्वज्ञान आणि इतिहास हेही त्याच्या अभ्यासाचे विषय होते. हेगेलच्या तत्त्वज्ञानाने तो प्रभावित झालेला एक बुद्धिमान विद्यार्थी म्हणून बर्लिनमध्ये तेव्हा प्रसिद्ध होता. एदुआर्द गॅन्स हे कायदा विषयाचे प्राध्यापक आणि प्रागतिक वृत्तीचे वकील म्हणून विद्यापीठात मान्यता पावले होते. त्यांची लेक्चर्स ऐकून मार्क्सला त्यांच्याविषयी अपार आदर वाटू लागला. १९३८ साली गॅन्स सरांच्या वाढदिवसानिमित्त विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी भरवलेल्या मेळाव्यात त्याने भाग घेतला होता. प्रशियन राजवटीत बर्लिनमध्ये समाजाचे जे परस्परविरोधी चित्र त्याला दिसत होते; त्यातून त्याने सैद्धांतिक विचार प्रणालींचा अभ्यास आरंभला. त्याचा प्रबंध परमेश्वराच्या अस्तित्वासंबंधी शंका घेणारा, समाजापुढील प्राधान्यांच्या प्रश्नांचा विचार करणारा होता. बर्लिन विद्यापीठात तो सादर करून गुंतागुंत वाढवणे त्याला शक्य नव्हते. म्हणून जेना विद्यापीठात त्याने प्रबंध सादर केला. आणि तत्त्वज्ञानातील डॉक्टरेटची पदवी मिळवली. ( १५ एप्रिल १८४१ ) यावेळी तो अवघा २४ वर्षांचा होता.

हेगेलच्या विचारांचा प्रभाव असणाऱ्या तरुण मंडळात आणि बुद्धिजीवींच्या वर्तुळात मार्क्सला त्याच्या वैचारिक शक्तीमुळे लौकरच नेतेपद मिळाले. 'डॉक्टर क्लब' म्हणून हे वर्तुळ ओळखले जात होते. यातले अनेक तरुण मार्क्सला हेगेल, रूसो, व्हॉल्टेअर या सर्व तत्वज्ञांचे सम्यक् रूप समजू लागले होते. एक गोष्ट स्पष्ट होती व ती म्हणजे बर्लिनमध्ये प्रस्थापित सरंजामशाहीविरुद्ध जे वातावरण तयार झाले, नंतर ज्या चळवळी झाल्या त्याला पहिले वैचारिक अधिष्ठान मार्क्सनेच दिले. त्याचेच पडसाद नंतर सर्व युरोपात उमटले. अशा या थोर तत्वज्ञाच्या शहरात फिरताना खूप समाधान आम्हाला होत होते.

लाईपझिग शहरात तर मार्क्सचे एक आडव्या आकाराचे प्रचंड शिल्प आम्ही एका शिक्षण संस्थेच्या दर्शनी भागात पाहून थक्क झालो. त्याने सर्व कामगारांना एक होण्याची घातलेली साद किती समयसूचक होती; हे आम्ही त्या प्रगत देशात पाहात होतोच.

आज जे बर्लिन आम्ही पाहिले; त्याला रशियातल्या १९१७ च्या ऑक्टोबर क्रांतीने पहिला आधार दिला. कारण त्यानंतर १९१८ मध्ये तिथे खलाशांनी बंड केले आणि जर्मनीच्या कम्युनिस्ट पक्षाची स्थापना १९१९ साली झाली. यानंतरच्या काळात श्रमिक चळवळी आणि संघटना तेथे मार्क्स आणि लेनिन प्रणाली आदर्श मानून उभ्या राहिल्या. एका बाजूने ही बांधणी होत असतानाच फॅसिझमची शक्ती हिटलरने अतिरेकी वंशाभिमानातून उभी केली; त्याचे सर्वात जास्त मोल बर्लिनवासियांना दयावे लागले.

बर्लिन पासून जवळच असणाऱ्या एका छळ छावणीला भेट देऊन परतताना आम्ही सुन्न झालो होतो. बरोबरचा जर्मन गाईड मला म्हणाला, आम्हा जर्मनांची हिटलरमागे जाण्यात मोठी चूक झाली; ही गोष्ट कबूल केली पाहिजे. ( आपल्याकडे मात्र यंदा हिटलरच्या आठवणीने कितीकांना तरी गहिवरून आले होते ! )

भारताच्या संदर्भात मला पूर्व जर्मनीतील घरबांधणीची मोहीम अनेकदा आदर्श वाटली. आम्ही तिथे होतो त्यावेळी त्यांची या संदर्भातली १९९० पर्यंतची योजना निश्चित झालेली होती. १९९० पर्यंत सुमारे ११ लाख घरे नवी बांधून देणे आणि दुरुस्त करणे अशी ही योजना आहे. आम्ही बर्लिनमध्ये फिरत असताना घरबांधणी व दुरुस्तीच्या कामाला किती अग्रक्रम दिला जातो आहे; हे पाहायला मिळत होते.

बर्लिन नतर आम्ही जर्मनीतल्या उद्योग – व्यापार – कलेचे केंद्र असलेल्या लाईपझिग शहरात भटकून आलो. तिथल्या एका दैनिकाच्या संपादकांनी दुपारच्या जेवणासाठी आम्हाला निमंत्रित केले होते. दर दोन वर्षांनी आंतरराष्ट्रीय व्यापार मेळा येथे भरतो. ८२० वर्षांची परंपरा असलेले देखणे लाईपझिग पाहताना तिथून पायच निघत नाही !

त्या सुंदर दुपारी आम्ही लाईपझिगमधल्या पाचशे वर्षे जुन्या असलेल्या एका कॉफी हाऊसमध्ये जेवायला गेलो. तीच जुनी पेंटिंग्ज भिंतींना

लटकावलेली. जुन्या फर्निचरचे काही देखणे नमुनेही तिथे पाहायला मिळाले. लांब प्रशस्त रस्ते, आकर्षक भांडारे, जागोजागी भिन्न प्रकृतीची शिल्पे, त्यांना न्हाऊ घालणारी कारंजी. एका रेस्टॉरंट समोर तर महाकवी गटेचा पुतळा पाहिला. तर एका ठिकाणी जुने चर्च पाहिले. सारे विलक्षण सुंदर, देखणे !

यापेक्षाही आम्ही भारावून गेलो ते प्रशांतनगर 'पोटस्डॅम' पाहताना ! दुपारचे जेवण करुन आम्ही निघालो. सर्वांना डुलक्या लागल्या होत्या. आणि पारंब्यांच्या, वृक्षांच्या सावलीच्या तळहातावरून चालत आम्ही या नगरीत आलो. पोटसूडॅम राजवाडा दाखवणारा गाईड होता, त्याने आम्ही भारतीय म्हटल्यावर रवींद्रनाथ टागोरांचे नाव घेतले. हा राजवाडा इंग्लंड, रशिया आणि अमेरिका यांचे प्रमुख युद्धबंदीचा करार जर्मनीशी करण्यासाठी वापरत होते. पोटस्डॅममध्ये 'न्यू पॅलेस' नावाचा असाच दुसरा सुंदर प्रासाद आहे. तिथे आगळे संग्रहालय आहे. हा प्रासाद म्हणजे उत्कृष्ट वास्तुशिल्पाचा नमुनाच म्हटला पाहिजे. दुसऱ्या फ्रेडरिकच्या इच्छेप्रमाणे पोटस्डॅमला येणाऱ्या शाही पाहुण्यांसाठी या प्रासादाची उभारणी करण्यात आली. ( १७६९ ). देखणी आणि रुबाबदार अशी बारा शिल्पे या प्रासादाच्या दर्शनी भागात छताच्या बाजूने बसविण्यात आली आहेत.

'न्यू पॅलेस'च्या आतील दालनातून जी रंगीत पेंटिंग्ज जतन करण्यात आली आहेत, ती १७७३ पासूनची आहेत. सोळाव्या ते अठराव्या शतकातील अव्वल दर्जाच्या इटालियन आणि डच चित्रकारांची २५९ पेंटिंग्ज इथे आपले चित्त वेधून घेतात. कलावंतांचा–प्रतिभा स्पर्श झालेल्या अनोख्या रंगसंगतीने आणि शिल्पांच्या अस्तित्वाने न्यू पॅलेस देखणा झाला आहे. जवळपास ७२ खोल्या असणाऱ्या या देखण्या वास्तूत राजपुत्र आणि राजकन्येची शयनगृहे लाजबाब अशीच आहेत ! नक्षीदार उंची वस्त्रातला पडदा, संगमरवराचा कुशल वापर, आरसेमहालाची याद यावी तसा आरशांचा वापर आणि पलंग तर एखादया चांदीच्या शिल्पासारखा– असे हे शयनगृह आम्ही थक्क होऊन पाहातच राहिलो ! खालच्या व वरच्या दालनातील संगीत–समारंभाचे विभाग, एक प्रेक्षागृह, याच्याच जोडीला संगमरवरी हॉलही आहे. या हॉलमध्ये डच शिल्पकार बी.एगर्सने तयार केलेले १२ संगमरवरी पुतळे बसवण्यात आले आहेत.

पोटस्‌डॅमहून परतताना आम्हाला खरंच फार उदास वाटत होतं. तिथे दुपारी आम्ही एका वाहतूक–मुक्त भागात चक्कर मारली. काही ठिकाणी वाहने अशा भागापासून दूर ठेवून लोकांनी पायी येऊन खरेदी करावी, पाय मोकळे करावेत, गप्पा माराव्यात अशी व्यवस्था करण्यात आली आहे. पोटस्‌डॅम, लाईपझिग, बर्लिन या शहरांत आम्ही अशा वाहतूक–मुक्त भागात फिरलो, चकाट्या पिटल्या, गप्पा मारल्या. मात्र आपण जर्मन भाषेत बोलू शकत नाही याची खंत वाटली. कुटुंबवत्सल जर्मन लोक मजेत त्या परिसरात वावरत होते. एक भारतीय म्हणून मला त्या सुखी–आनंदी लोकांचा हेवा वाटत होता.

कारण अशा पद्धतीने सुखी–जोडपी मीही भारतात पाहिली होती. पण त्या समृद्ध परिसरात श्रीमंतांची चैनी वृत्ती आणि सभोवार दारिद्र्याने गांजलेले भारतीय बांधव मी नित्यच पाहात होतो. पोटसॅडमच्या त्या प्रशस्त परिसरात मी माझा भारत शोधत होतो. पण ते चित्र केवळ कल्पनेतलेच होते. भारतातल्या समृद्ध–संपन्न रंगावरची दारिद्र्याची काळी सावली मला विसरता येत नव्हती.

आधुनिक जगातले सौख्य प्राप्त करत असतानाच संस्कृती, कला यांची परंपरा जतन करण्याचे जर्मन समाजाचे भान तसेच जागते होते. लाईपझिगमधल्या एका जर्मन दैनिकाला ( पीपल्स पेपर ) आम्ही भेट द्यायला गेलो होतो. तिथे अद्यापिही मोनो ऑपरेटिंगची जुळणी पद्धतच वापरात होती. सर्वत्र महिला ऑपरेटर. कंपोझिटर काम करीत होत्या. जगात सर्वत्र फोटो कंपोझ पद्धत वेगाने अमलात आली असताना इथे ही जुनी पद्धतच कशी; असा आम्हाला प्रश्न पडला. संपादकांनी आम्हाला सांगितले की, आमच्याकडे ही जुनी पद्धत आहे. त्याचे कारण जगातल्या मुद्रणकलेचा उगम हा आमच्या देशात झाला आहे. आमच्या देशाच्याच नाही तर जगाच्या विकासाच्या इतिहासातला एक मौलिक टप्पा म्हणून आम्ही हे मुद्रण जुन्या पद्धतीचेच ठेवले आहे गुणवत्ता आणि अंकांची निर्मिती यावर त्याचा काहीही प्रतिकूल परिणाम होत नाही. त्यांचे हे म्हणणे मात्र आम्हाला पटले. सर्व जुळणी पद्धतीने काम चालत असूनही कोठेही काळे–निळे डाग दिसत नव्हते. एका तरुण कंपोझिटर मुलीने आम्हाला गॅली प्रुफ काढून दाखविले. मोनो यंत्रावर अनेक मुली काम करीत होत्या सर्व विभाग कमालीचे स्वच्छ होते.

अशा या पूर्व जर्मनीतून निघताना त्यामुळे आम्हाला खूप जड गेले. त्यापूर्वी आम्ही पोलंडमध्ये काही काळ होतो. तिथल्या लोकांची रोजचे जीवन जगण्यातली ससेहोलपट बघितल्यावर पूर्व जर्मनीचे जीवन अधिक दर्जेदार आणि उंच वाटले. पोलंडसारखा पोलिस अथवा सैनिकांचा ससेमिराही इथे आढळला नाही. काही ठराविक देशांची उत्पादनेच या दोन्ही देशांत विकली जात होती. पण पोलंडमध्ये डिपार्टमेंटल स्टोअर्समधून जे चित्र ( प्रचंड रांगा असलेले ) आम्ही बघितले; ते पूर्व जर्मनीत दिसले नाही.

पोलंडमधला अल्पकाळचा मुक्काम म्हणजे छोटीशी सफरच होती. त्यानिमित्ताने तिथले बद्द झालेले चलन आम्हाला पहायला मिळाले. आमच्या सर्व दौऱ्यात ज्या देशाच्या चलनाला सर्वात कमी किंमत होती ती म्हणजे पोलंडच्या. जीवनाचे त्यांचे प्रश्न गुंतागुंतीचे व कठीण आहेत; हे जाणवत होते. पण त्याचे सावट या लोकांच्या वावरण्यात नव्हते. किंबहुना शरीरयष्टीने धडधाकट असे पोलिश स्त्री–पुरुषांचेही व्यक्तिमत्त्व होते.

मी एका चर्चेत लेक वॉलेसांबद्दलचा प्रश्न विचारला. तेव्हा गडान्स्क बंदरात ते सुस्थिर आहेत, त्यांच्या सॉलिडॅरिटीचे व आमचे सामंजस्य प्रस्थापित झाले आहे; असे अधिकाऱ्यांनी उत्तर दिले होते.

मी गाईडला हा प्रश्न विचारला तेव्हा त्याने उत्तर दिले होते, रस्त्यात तुम्हाला कोणी लूटमार करीत असेल तर तुम्ही काय कराल ? त्या क्षणाची प्रतिक्रिया हीच सॉलिडॅरिटी निर्माण होण्याचे कारण आहे.

आपल्याकडे भाकरी आणि स्वातंत्र्य याचा वैचारिक चर्चेत आणीबाणी काळात उहापोह झाला होता. त्यानंतर पाच वर्षांनी पोलंडमध्ये सॉलिडॅरिटीने हाच प्रश्न मांडला. आज चित्र किती बदलले आहे ! सॉलिडॅरिटीच्या ताब्यात पोलंडचे राजकारण आहे. त्यांचाच माणूस तिथे पंतप्रधान झाला आहे ! पण पोलिश जनतेपुढचा खरा प्रश्न संपला आहे काय ? नवे सरकार सत्तारूढ होण्यापूर्वीच्या तिथल्या बातम्या वाचताना एक गोष्ट लक्षात आली. लोकांचे म्हणणे होते, आम्हाला पंतप्रधान नको, पाव हवा !

जी गोष्ट पोलंडमध्ये अवघड होती; ती पूर्व जर्मनीत साध्य झाली होती. नवे तंत्रज्ञान, नवे विज्ञान आणून तिथल्या कम्युनिस्ट प्रणीत हद्योनेकर राजवटीने निश्चितच संपन्न चित्र निर्माण केल्याचे आम्ही पाहात होतो. तिथला बुद्धिमान,

ताकदवान तरुण देश सोडून जाऊ नये यासाठी पूर्व जर्मनीने केलेले पद्धतशीर प्रयत्न आम्हाला दिसत होते.

आणि तरीही अलीकडे पूर्व जर्मनीतून बाहेर पडणाऱ्यांची संख्या मोठी असल्याचे वृत्त आपण रोज वाचत आहोत. पूर्व बर्लिन व पश्चिम बर्लिन, आणि पूर्व व पश्चिम जर्मनी असा तुकडा दुसऱ्या महायुद्धाच्या भीषण परिणामांचा भाग आहे. हे भावनिक, नैसर्गिक नात्याचे विभाजन आहे. त्यामुळे पूर्व जर्मनीतून पळून जाणाऱ्यांची संख्या मोठी असली तरी पश्चिम जर्मनीत मुक्त अर्थव्यवस्थेच्या परिणामांचे त्यांना निश्चितच काही मोल द्यावे लागणार नाही असे थोडेच आहे ?

पोलंड, पूर्व जर्मनीचा दौरा सपवून आम्ही जेव्हा पश्चिम युरोपीय देशांमध्ये गेलो. तेव्हा वाढलेल्या किंमती, जाहिरातबाजी, रंगीली दुनिया यांचे दुसरे टोकच दिसत होते. एक भारतीय म्हणून मला पूर्व जर्मनीची पद्धत आदर्शवत् वाटत होती. उलट पश्चिम युरोपीय देशांमध्ये भाव प्रचंड होते. ग्राहक आणि उत्पादक यांच्या नातेसंबंधाचाच विचार दिसत होता. पूर्व युरोपात न दिसलेले भिकारी पॅरिस, लंडनला आम्हाला दिसले. गंडवणारे गाईडही याच भागात आम्ही पाहिले. आणि म्हणूनच मला असे प्रामाणिकपणे वाटले की, पूर्व जर्मनीची जीवन पद्धती (आर्थिक–सामाजिक संबंधातली) आपण जाणीवपूर्वक लक्षात घेतली पाहिजे.

गोर्बाचेव जे नवे पर्व आणू पाहात आहेत; ते व्यक्तिगत स्वातंत्र्याची ऊर्मी दाबणारे वाटत नाही. 'ग्लासनोस्त' (खुलेपणा) मधून ज्या स्वरूपाची 'पेरेस्त्रोईका' (पुनर्रचना) निर्माण करायची आहे; ती पूर्व आणि पश्चिम युरोपच्या भिन्न पद्धतींचा समन्वय साधणारी असेल असे मला वाटते. लोकशाहीची ऊर्मी न दडपता समष्टीच्या कल्याणाचा मार्ग सुखद करणारी जीवनपद्धत जर कम्युनिस्ट राष्ट्रात निर्माण झाली तर ते आदर्श पाऊल ठरेल. आज भारतातही हेच समन्वय करणारे चित्र निर्माण होण्याची गरज नाही का ? ज्या भांडवलशाही प्रधान देशाचे अनुकरण आपण करू पाहतो; त्या अमेरिकेत सर्व आलबेल अशी स्थिती आहे का ? न्यूयॉर्क आणि हॉलिवूडच्या काही भागात रात्रंदिवस गुन्हेगारी अंमली, मादक पदार्थांच्या व्यवहारात गुंतलेल्या

अतिरेकी टोळ्यांच्या कारवायांनी तिथल्या समृद्ध जीवनाचे दुसरे रूप उघड केले आहे.

असे असताना आपण आज कोणता मार्ग स्वीकारणार आहोत? उदारमतवादी साम्यवाद भारतात रुजू शकणार नाही? मी कोणत्या विशिष्ट पद्धतीचा आग्रही मुळीच नाही. पण ४५ कोटी निरक्षर जनता असणाऱ्या, कलाहांडी, कोरापुट येथे शेकडो भूकबळी नित्य जाणाऱ्या आणि विभिन्न संस्कृती – समाज असणाऱ्या, बहुसंख्य दारिद्र्यात असणाऱ्या या माझ्या देशाचे 'लोक – कल्याणकारी स्वरूप' खरेखुरे कधी प्रगट होईल? कारण आज तरी ते फक्त घटनेतच नमूद आहे. इथे लोकशाही आहे, पण लोकांच्या हक्कांचे रक्षण किती सहजसाध्य आहे? इथे स्वातंत्र्य आहे; पण कोणत्या वर्गासाठी? दलित, आदिवासी, दारिद्र्याने गांजलेल्या मुलांचे चेहरे मला जर्मनीत फिरताना दिसत होते. सतत वाटत होतं, तिथल्या सशक्त, रूबाबदार मुलांसारखी भारतातली मुलं कधी होतील? भविष्याचं वरदान त्या मुलांच्या हसऱ्या चेहऱ्यावर लिहिलेलं मी पाहात होतो. आणि इथे प्रचंड काळोख मला रोज पाहायला मिळतो. गोर्बाचेव यांनी जे मूलभूत बदल कार्यवाहीत आणायला सुरुवात केली आहे. त्याचे पडसाद सोविएत रशियात उमटू लागले आहेत. बाल्टिक राष्ट्रांनी फुटून निघण्याची भाषा सुरू केली आहे. त्यांच्यापुढचे आव्हान अभूतपूर्व आहे. १९१७ नंतर ७० वर्षांनी पोलादी भिंतीआडच्या हालचाली सर्व जगाला समजू लागल्या आहेत. मैत्री, शांतता वाढवून आणि संहारक अस्त्रांपासून मानवजातीला दूर नेण्याचे स्वप्न गोर्बाचेव वास्तवात आणू पाहात आहेत. अमेरिकेलाही त्यांच्या मागे जाणे भाग पडत आहे.

आणि म्हणूनच पोलंडमध्ये बिगर कम्युनिस्ट सरकार सत्तारूढ होताना कम्युनिस्ट गटाला धोका असल्याची भीती गोर्बाचेवना वाटली नव्हती! पूर्व – पश्चिम बर्लिन व जर्मनी यांच्यातील कृत्रिम भिंती कोसळून सारे जर्मन जवळ आले तर ते त्याचे स्वागत करतील!

आणि मला वाटतं; ती वेळ फार दूर नाही! पूर्व – पश्चिम बर्लिन आणि जर्मनी यांचं मनोमीलन होणं हे भौगोलिक एकसंधतेपेक्षा कितीतरी पटीनं महत्त्वाचं आहे, ऐतिहासिक आहे! जी गोष्ट या शतकाअखेरही होणार नाही;

असं आम्हाला सांगण्यात येत होतं; ती गोष्ट आता किती जवळच्या टप्प्यात आलीय!

कदाचित पुढच्या वर्षी एकसंध बर्लिनचा ७५३ वा वर्धापन दिन साजरा करायला मी बर्लिनमध्ये गेलो असेन! आणि अपेक्षा—एकच बर्लिनच्या अलेक्झांड्राला प्लेसपासून सुसाट वेगानं गाडी घेऊन लाईपझिग गाठायचं! तिथून परत माघारी यायचं आणि दोन वर्षापूर्वी जे पश्चिम बर्लिन पाहिलं नव्हतं, ते पाहायला परत सुसाट निघायचं!

जर्मनी पुनः एक झाला तर युरोपला नवे सामर्थ्य मिळणार आहे! संस्कृती आणि विकासाच्या वाटेवर युरोपातल्या अशा अनेक राष्ट्रांनी मोलाची कामगिरी केली आहे! आपल्या खूप मागे असलेल्या पोलिश जनतेला जर्मन नागरिक सहकार्याचा हात देतील, त्यांना आत्मनिर्भर करतील आणि खरंच एक मानवी इतिहासातलं एक नवं पर्व सुरू होईल!

या पर्वाची वाट कदाचित बुशसाहेब पाहात नसतील. पण आता आपल्या वैचारिक पोथ्यांच्या कोषांतून बाहेर येऊन सन्मानाने स्वतःची वाट शोधू पाहणाऱ्या रशियाचे गोर्बाचेव निश्चितच ही वाट पाहात आहेत!

त्यांच्याचप्रमाणे जर्मन, पोलिश, हंगेरियन नागरिकही त्या पर्वाची वाट पाहात चालू लागले आहेत!

आणि हे पर्व जवळून पाहण्यासाठी पूर्व बर्लिनमधल्या इंटरनॅशनल इन्स्टिटय़ूट ऑफ जर्नालिझम मध्ये पुनः एक चक्कर मारावी अशी अपेक्षा मीही बाळगून आहे.

आणखी एक अपेक्षा माझ्या मनात आहे. ती म्हणजे ब्रॅण्डेनबर्ग गेटजवळचा पहारा उठेल आणि बर्लिनची भिंत इतिहासजमा होईल!

भिंत नसलेल्या अखंड बर्लिनचा फोटो काढण्यासाठी मी खरंच उत्सुक आहे!

□ □

# ताजा कलम : 'नवा युरोप'

शेवटी ज्याची वाट आपण सारे बघत होतो; ती गोष्ट ९ नोव्हें. १९८९ रोजी घडली आणि युरोपच नव्हे तर जगाच्या इतिहासात त्याची नोंद झाली. होय मी बर्लिन भिंतीसंबंधी बोलतो आहे !

पूर्व आणि पश्चिम जर्मन नागरिकांना एकत्र आणण्याची अशक्य वाटणारी गोष्ट आता वर्तमानाचा एक ठसठशीत भाग बनली आहे. भिंत कोसळली आहे; ती तोडण्यात आली आहे. ब्रॅण्डेनबर्ग गेटजवळचा 'नो मॅन्स लँड' आता लोकांच्या गर्दीने फुलून गेला आहे. मी दूरदर्शनवर रोज सकाळी पाहात होतो तो बर्लिन, लाईपझिग शहरातील जर्मन लोकांचे जल्लोष, त्यांचा आनंद ! भिंतीवरून ते उड्या मारीत होते, पश्चिमेत जात होते, हात हलवीत, मिठ्या मारीत प्रियजनांपाशी आनंद व्यक्त करीत होते. हातोड्याने, लोखंडी गजाने त्या भिंतीचे चिरे ढासळवण्याचा त्यांचा सर्वांचा प्रयत्न चालू होता. या पुस्तकाचे शेवटचे प्रकरण संपवून हस्तलिखित छापण्यासाठी दिले आणि ते कंपोजला जाण्यापूर्वीच पूर्व जर्मनीत उलथापालथ सुरू झाली ! पूर्व आणि पश्चिम बर्लिनचे लोक जवळ आले, भेटले आणि त्यांनी भिंत इतिहासात जमा करून टाकली ! कोणताही रक्तपात न होता राजकीय चित्र बदलण्याची प्रक्रिया तिथे सुरू झाली. आपण सारेच थक्क होऊन पाहात आहोत !

सुमारे ४२ कि.मी. लांबीची ( २८ मैल ) बर्लिन भिंत १९६१ साली बांधली आणि १९८९ च्या नोव्हेंबर महिन्यात तिचा हेतू संपुष्टात आला. ती असून अस्तित्वहीन ठरली ! या भिंतीची कल्पना त्यावेळचे प्रमुख एरिक ह्योनेकर यांच्या डोक्यातून निघाली. त्यांच्या दृष्टीने ही भिंत म्हणजे 'Anti – Fascist Protection Barrier' होती. पण आता त्यांचीच चौकशी सुरू झाली असून आपल्या घरी ते नजरकैदेतच आहेत. इगॉन क्रेन्झ यांनीही राजीनामा दिला आहे. नवे नेते लोकांपुढे आले आहेत. बर्लिन भिंत

इतिहासजमा होत असताना साऱ्याच दुःखद गोष्टी विसरल्या जाव्यात अशी अपेक्षा असली तरी माणसाला त्या विसरता येत नाहीत.

१३ ऑगस्ट १९६१ रोजी सकाळी जेव्हा पूर्व बर्लिनचे नागरिक जागे झाले; तेव्हा त्यांना समजले की, आपल्या घराचीच विभागणी झाली आहे; तारेची कुंपणे पडली आहेत. जी लौकरच बर्लिन भिंतीचा भाग झाली. पूर्वेकडून मोठ्या प्रमाणात मजूर म्हणून पश्चिमेकडे जाणाऱ्यांचा लोंढा असायचा. तो रोखण्याचा व भांडवलशाही राष्ट्राच्या हस्तक्षेपाचा धोका टाळण्यासाठी भिंत बांधण्यात आली असल्याचे प्रतिपादन तेव्हा केले गेले होते. पण भिंत बांधली तेव्हाच कसे निसटायचे याचेही तिथे सटकू पाहणाऱ्या जर्मनानी ठरवले असणार. पण त्यात काहींना आपले प्राण गमवावे लागले. १९६२ साली पीटर फ्रेश्टलर या पूर्व जर्मनीच्या गवंड्याला या भिंतीपाशी प्राण गमवावे लागले. गेल्या २८ वर्षांच्या भिंतीच्या इतिहासात सुमारे ७५ जणांना आपले प्राण गमवावे लागल्याची नोंद आहे. शीतयुद्धाचे एक वातावरण सातत्याने या भिंतीमुळे युरोपात होते. जो खंड आपली संस्कृती, समृद्धी आणि इतिहास यामुळे वैशिष्ट्यपूर्ण स्थान मिळवून बसला होता; त्याला एक तडा या भिंतीमुळे गेला होता. आता तो विषय संपला आहे.

युरोप खंडात एक वेगळे वातावरण आता निर्माण झाले आहे. बॅण्डेनबर्ग गेटपाशी येऊन पश्चिम जर्मनीचे माजी चॅन्सेलर विली ब्रॅण्ड यांनी पूर्व बर्लिन नागरिकांचे अभिनंदन केले. त्या गेटपाशी आम्ही अनेक पत्रकारांनी उभे राहून एकमेकांचे फोटो काढले होते; त्याची मला आठवण झाली.

पण आता सारे काही 'आलबेल' झाले आहे का ? पूर्व जर्मनी, पोलंड, हंगेरी, झेकोस्लोव्हाकिया आणि आता रुमानिया या सर्व देशांतील लोक आपल्या आकांक्षा घेऊन पुढे आले आहेत. त्यांना नोकऱ्या हव्या आहेत. केवळ मोकळी हवा नाही ! त्यांना घरे हवीत, चांगले आर्थिक जीवन हवे; केवळ लोकशाही स्थापनेची चर्चा नकोय त्यांना ! दुसरीकडे युरोप १९९२ साली एकसंध बाजारपेठ निर्माण करीत आहे. पूर्व युरोपच्या बाजारपेठेत आपला माल भरपूर खपेल; अशी आशा बाळगण्यात येत आहे.

मला या नव्या बदलाचे स्वागत करताना एक गोष्ट नमूद करावीशी वाटते. पूर्व आणि पश्चिम युरोप जवळ येताना ते आपले सांस्कृतिक संबंध म्हणून

येणार की ग्राहक–विक्रेते म्हणून येणार हा खरा प्रश्न आहे. कारण कम्युनिझमच्या नावाखाली ज्या देशातल्या लोकांना व्यक्तिगत स्वातंत्र्याचा बळी द्यावा लागला त्याच लोकांना पुनः नव्या भांडवलशाही प्रधान अर्थव्यवस्थेत ग्राहक म्हणून शोषण होते आहे हाच अनुभव आला तर ? नवे स्वातंत्र्य हे केवळ बाजारात किती वस्तू मिळतात याच्या उपलब्धतेवरच आधारीत असेल तर त्याची फलश्रुती काय असेल ?

सत्तर वर्षांनंतर मार्क्स कालबाह्य होतोय असे प्रतिपादन केले जात आहे. पण कामगारांची पिळवणूक थांबलेली नाही; त्याचा वर्ग अजूनही पक्केपणी पाया रोवू शकलेला नाही. चळवळ जशी वाढते आहे; तशीच तिची शकलेही होत आहेत. अशा स्थितीत मार्क्सला कालबाह्य ठरवणारे व त्याचे अतिरेकी पूजन करणारे दोन्हीही युरोप काय किंवा भारत काय या दोन्ही देशांतल्या लोकांना काय हवे आहे; याबद्दल दिशाभूलच करीत आहेत. ते कधी थांबणार हाही प्रश्न आहे !

पूर्व जर्मनीत आता निवडणुका होत आहेत. नवी लोकशाही, नवी प्रणाली तिथे स्थापन होईल अशी आशा करू या. आणि गेले काही महिने सतत होणारे बदल हे बाह्यात्कारी न राहता खरेखुरे परिवर्तन करणारे ठरतील अशी माझी अपेक्षा आहे– सर्व युरोपीय लोकांसारखीच !

□ □

# गोर्बाचेव साहेब, सलाम !

युरोपात जे बदल झाले, नवे प्रवाह आले त्याचे श्रेय विचारवंत, राजकीय भाष्यकार हे निःसंशयपणे रशियाचे अध्यक्ष मिखाईल गोर्बाचेव यांना देत आहेत. रशियात त्यांनी 'पेरेस्त्रोईका' व 'ग्लासनोस्त' यांच्या नावाने नवेपणा, खुलेपणा आणला. सर्व जगात या दोन शब्दांनी रशियाची नवी वाट स्पष्ट केली, नवी संस्कृती व्यक्त केली. स्टालिन काळाच्या भीषण खुणा दूर करून, नव्या वाटेवर गोर्बाचेव यांनी रशियाला नेले. एक पक्षीय चौकटीच्या प्रणालीतच त्यांनी मोठे खुले वातावरण निर्माण करून रशियन माणसाला बोलण्याला, भांडण्याला, सरकारवर टीका करण्याला प्रवृत्त केले. आज रशियाची गणना शीतयुद्धाचे वातावरण ठेवणारी महासत्ता म्हणून होत नाही तर शांतता, सहकार्य आणि विकासासाठी आसुसलेल्या देशात होते. साखाराव्हसारख्या जगन्मान्य शास्त्रज्ञांची सुटका झाली व ते सोविएत संसदेचे सन्मानीय सदस्य बनले तेही गोर्बाचेव्ह यांच्या काळातच. जगाच्या राजकारणात साखारोव्ह आणि गोर्बाचेव एकत्र येण्यामुळे परिवर्तनाचे जे प्रवाह येऊ शकत होते; त्याची झलक रशियात दिसत होती. पण साखारोव्ह निधन पावल्यामुळे एक अपूर्व अशी वैचारिक समन्वयता लोप पावली आहे.

आमच्या शालेय जीवनात अमेरिकेचे अध्यक्ष जॉन केनेडी जगभर लोकप्रिय होते. आज हीच गोष्ट गोर्बाचेव यांच्या बाबतीत आहे. ते आणि त्यांची सुहास्यवदना पत्नी रईसा दोघे जगातील प्रमुख कार्यक्रमांना ज्या आनंदाने, धीरगंभीरपणे उपस्थित राहतात; त्याचे कौतुक सर्वांनाच वाटत आले आहे.

या शतकाचे शेवटचे दशक आता सुरू आहे. गेल्या ९० वर्षांत रशियाच्या कोणत्याही प्रमुखाला मिळाला नाही असा आदर व प्रेम गोर्बाचेव साहेबांना मिळाला आहे. 'टाईम' या जगप्रसिद्ध नियतकालिकाने गेल्या दशकातील (१९८० ते ८९) मानकरी म्हणून गोर्बाचेव यांची निवड अलीकडेच जाहीर केली आहे. यापूर्वी असा सन्मान ब्रिटनचे लोकप्रिय व झुंजार नेते विन्स्टन

चर्चिल यांनाच फक्त मिळाला होता. दरवर्षाचा मानकरी ही प्रथा सोडून यंदा 'टाईम' ने दशकाचा मानकरी हा सन्मान गोर्बाचेव यांना दिला आहे.

पूर्व जर्मनी, हंगेरी, पोलंड, झेकोस्लोव्हाकिया, बल्गेरिया आणि रूमानिया या कम्युनिस्ट प्रणाली असलेल्या देशांतील बदलांबाबत गोर्बाचेव यांनी 'लोकच्छेचा आदर' हे सूत्र अवलंबले. कुठेही रशियन राजकीय नेते अथवा सैनिक या देशांमधून घुसले नाहीत. फक्त रुमानियात मात्र जेव्हा रक्तपात भीषण स्वरूपात झाला; तेव्हा तिथे लोकांच्या बाजूने रशियाने भूमिका घेतली आणि चढेल हुकूमशहा सॉसेक्यूची अखेर करण्यात आली. पण पोलंड, हंगेरी इथे तर कम्युनिस्ट पक्षच नको अशी भूमिका घेण्यात आली, ठराव करण्यात आले तरी तिथे नव्या प्रवाहांवर रशियाचा दबाव आहे, वरचष्मा आहे असे दिसले नाही. पूर्व जर्मनीतल्या जुन्या सत्ताधाऱ्यांना तर गोर्बाचेव यांच्या सल्लागारांनी लोकमत पाहून वाट स्वीकारा, असे गेल्या जुलै महिन्यातच सुचवले होते. या देशांवर रशियाचे प्रभुत्व ठेवण्यासाठी भूतकाळात ज्या चुका करण्यात आल्या; त्याचीही चिकित्सा गोर्बाचेवनी केली. १९६८ साली झेकोस्लोव्हाकियातील रशियाचे आक्रमण सर्वस्वी अनैतिक, अयोग्य असल्याची टीका रशियाचे नेते प्रांजळपणे १९८९ मध्ये करीत होते. 'जुने जाऊ द्या मरणालागुनी' असे म्हणून रशियाचा भूतकाळ गाडण्याची गोर्बाचेव यांची इच्छा नव्हती तर त्यापासून धडा देऊन, चुका कबूल करून नवे पर्व सुरू करण्याची तळमळ त्यांना होती. आक्रमणशील, दबावाने वागणारा असा रशिया निर्माण होण्याऐवजी व्यक्तिगत जीवनाची कोंडी न करणारा, विकासाला उत्सुक असलेला शांतिप्रिय रशिया हे त्यांचे स्वप्न आहे. ते साकार होण्यासाठी गोर्बाचेव धडपडत असून १९१७ च्या क्रांतीनंतर ७० वर्षांनी प्रसन्न हिमवर्षावाप्रमाणे परिवर्तनाचे मार्ग शुभंकर होत चालले आहेत.

अशा या परिवर्तनाची चाहूल मात्र भारतातल्या मार्क्सवादी कम्युनिस्टांना लागू नये याचे खरोखरच आश्चर्य आहे. १९८८ साली पुण्यात मार्क्सवादी पक्षाचे अधिवेशन भरले होते तेव्हा व्यासपीठावर लेनिन, माओ, मार्क्स या विचारवंत नेत्यांच्या तसबिरी होत्या. एकही भारतीय विचारवंत नेता मार्क्सवाद्यांच्या या परंपरेत बसू कसा शकत नाही असा प्रश्न मला पडला होता. पण कोणत्याही प्रश्नांची मूलभूत चिकित्सा करण्याचे शहाणपण केवळ

आपणाजवळ आहे; असे मानणारे इथले मार्क्सवादी नेते व कार्यकर्ते गोर्बाचेव यांच्या नव्या वाटचालीबाबत मात्र जवळपास चिडीचूप बसले आहेत. काहींनी तर सॉसेक्यूच्या मृत्यूचा निषेधही केला आहे. गेल्या जूनमध्ये चीनच्या चौकात विद्यार्थ्यांचे जे हत्याकांड झाले; त्याबद्दलही ही मंडळी बोलत नाहीत. वर्गव्यवस्था, वर्णव्यवस्था, असे शब्दप्रयोग करीत सारी परिवर्तनवादी चळवळ आपणच पुढे नेऊ शकतो. अशी दांभिक वल्गना यातले अनेक नेते करतात. तेव्हा त्यांना समजलेला साम्यवाद, मार्क्सवाद कोणत्या प्रतीचा आहे, कोणत्या पायावर आधारीत आहे. याचे आश्चर्य वाटत नाही. कोणत्याही छोटया मोठ्या तात्विक मुद्द्यावर भांडणे करणारी ही तथाकथित मार्क्सवादी– पुरोगामी मंडळी जगात मन्वंतर घडवणाऱ्या घटनेबद्दल चूप बसतात हे काय वैचारिक कुंठितपणाचे लक्षण आहे की हेतुतः स्वीकारलेल्या वैचारिक गुलामीचे ?

पुण्यातल्या एका समारंभात बोलताना मार्क्सवादी चळवळीतले नामवंत कवी नारायण सुर्वे स्पष्टपणे म्हणाले होते, भारतातही जर कम्युनिस्टांनी फुले– आंबेडकर यांच्या विचारांशी नाते आरंभीच जोडले असते तर आज त्यांची जी स्थिती आहे ( लोकांपासून दुरावल्याची ) ती झाली नसती. परंतु अद्यापीही हे नाते दृढ होत नाही ही सत्यस्थिती आहे.

या पार्श्वभूमीवर गोर्बाचेव यांनी जे युरोपात नवे बदल आणले त्यामुळे मी म्हटलेला दुसरा युरोप आता संपेल आणि एकसंध, सामर्थ्यवान युरोप भावी काळात निश्चितच निर्माण होईल. माणसाच्या मूलभूत स्वातंत्र्याच्या ऊर्मी न दडपणारा अस्सल मानवीय साम्यवाद आणण्यासाठी गोर्बाचेव धडपडत आहेत. त्यांना त्यात यश मिळो, ही माझ्यासारख्या ' असाम्यवादी ', ' अमार्क्सवादी ' लेखकाची सदिच्छा आहे.

या नव्या पर्वाचे प्रवर्तक म्हणून गोर्बाचेव साहेब तुम्हाला लाख लाख सलाम !

□ □